# पुष्पदंत



महादेवशास्त्री जोशी

थाकल्पलता : : : : , ७

# पुष्पदंत

२४७८
दा. क्र.

लेखक
पं. महादेवशास्त्री जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे विभाग
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक ....८८३.............. नों: दि ५।५।६०

आवृत्ति पहिली
[ १९५७ ]

REFBK-0009478

ज्ञानराज प्रकाशन, पुणें २

★

मूल्य सव्वा रुपया

प्रकाशक :
सौ. सुधा महादेव जोशी
ज्ञानराज प्रकाशनाकरितां
४२१ शनिवार पेठ, पुणें २

★

अंतर्गत सजावट
भय्यासाहेब ओंकार

★

मुखपृष्ठ :
दलाल आर्ट स्टूडियो

★

सर्व हक्क लेखकाधीन

★

मुद्रक :
श्रीपाद जगन्नाथ गानू,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण पेठ, पुणें २

# परिचय

या पुस्तकांत पांच चरित्रकथा असून त्या सगळ्या कवि आणि ग्रंथकार यांच्या आहेत. हें पुस्तक आणि याच्या मागचीं दोन पुस्तकें— 'दासो दिगंबर' व 'त्यागराज' मिळून भारताच्या विविध भाषांतल्या जुन्या काळच्या १५ कवींची आणि लेखकांची चरित्रात्मक माहिती मीं दिली आहे. आतां यापुढचीं या मालेंतलीं पुस्तकें निराळ्या विषयांवरील गोष्टींची असतील.

पुणें,
महाशिवरात्र
२७।२।५७

— महादेवशास्त्री जोशी

# कथानुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १. | पुष्पदंत | ... ... | १ |
| २. | सूरदास | ... ... | २२ |
| ३. | नरसी भगत | ... ... | ३९ |
| ४. | श्रीहर्ष | ... ... | ५७ |
| ५. | तिरुवल्लुवर | ... ... | ७४ |


* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २१८३५ वि:

# पुष्पदंत

पुष्पदंत हें वररुचि नांवाच्या एका पंडिताचें पूर्वजन्मींचें नांव आहे. पूर्वींचा शिवगण असलेला पुष्पदंतच शापानें मृत्युलोकीं आला आणि वररुचि या नांवाचा मोठा पंडित झाला. हा जसा शास्त्रज्ञ होता, तसाच मोठा राजकारणीहि होता. हा पाणिनीसारखाच महान् वैयाकरण होता. 'प्राकृतप्रकाश' नांवाचा याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्या ग्रंथांत ह्यानें प्राकृत भाषेचें व्याकरण लिहिलें असून हा ग्रंथ पाणिनीच्या अष्टाध्यायी-प्रमाणेंच सूत्ररूप आहे. त्यानें महाराष्ट्री, शौरसेनी, पैशाची, इत्यादि भाषांतल्या ग्रंथांवरून प्राकृताचें व्याकरण निर्माण केलें आहे. संस्कृत शब्दांपासून प्राकृत शब्द कसे बनतात, त्याचें विवेचन वररुचि आपल्या ग्रंथांत करतो. 'तौलनिक व्याकरणाचा संस्थापक' म्हणून डॉ. केतकर ह्यांनीं त्याला गौरविलें आहे. ह्याच्याजवळ पारंपरिक कथांचा साठाहि भरपूर होता. ह्यानें पारंपरिक गीतें आणि लोककाव्यें यांचाहि संग्रह करून त्यांवर कलात्मक संस्कार केले. 'एखादी नवी प्रथा पहिल्यानें सुरू करणाराचें एक तर खूप कौतुक होतें किंवा त्याला आपत्ति भोगाव्या लागतात,' असें श्री. दुर्गा भागवत म्हणतात. वररुचीच्या वांट्याला कौतुक न येतां अपमान आणि आपत्ती ह्याच आल्या. ह्याचा काल इसवी सनापूर्वी सुमारें ४५० वर्षें मानलेला आहे. पाणिनि हा ह्याच्यापूर्वी सुमारें ५० वर्षें होऊन गेला. भारतांत पाणिनि, वररुचि आणि पतंजलि हे तीन महान् व्याकरणकार म्हणून प्रसिद्ध आहेत. व्याकरणाचे पंडित आणि विद्यार्थी ह्या तिघांना 'मुनित्रय' म्हणून वंदन करतात, तो श्लोक असा आहे —

**"वाक्यकारं वररुचिं भाष्यकारं पतंजलिम्
पाणिनिं सूत्रकारं च प्रणतोऽस्मि मुनित्रयम्"**

ह्याच वररुचीची कथा कथासरित्सागराच्या आधारें पुढें दिली आहे—

★ ★ ★

लोकांचें खाजगी बोलणें चोरून ऐकूं नये, असें वाडवडील नेहमींच सांगत आले आहेत. चोरून ऐकण्याचे कित्येकदा दुर्धर आणि गंभीर असे परिणाम ओढवतात. दुसऱ्याचें रहस्य ऐकणें म्हणजे ती एक मोठी चोरीच आहे. त्यांत विश्वासघातहि आहे. आणि म्हणूनच ती गोष्ट अनैतिकहि मानतात.

पण कित्येकदा जाणतीं माणसेंहि अशा मोहाला बळी पडतात. पुष्पदंताचें उदाहरणहि त्यांतलेंच. कैलासावर जे नंदी, भृंगी इत्यादि शिवगण आहेत, त्यांतलाच पुष्पदंत हा एक प्रसिद्ध गण होता. शिवाचें त्याच्यावर प्रेम होतें. तो मोठा चौकस आणि चोखंदळ होता. पण त्याचा हा फाजिल चौकसपणाच त्याच्या अधःपाताला कारणीभूत झाला.

पार्वतीला गोष्टी ऐकण्याचा विलक्षण नाद आणि शिवाकडे गोष्टींचें भांडार भरलेलें. जरा करमेनासें झालें कीं ती शिवाला गोष्ट सांगण्याचा आग्रह करायची आणि शिवानें तिचा हट्ट आनंदानें पुरवायचा; असा क्रम युगानुयुगें चालत आला होता.

त्या दिवशींहि तसेंच झालें. पार्वतीनें गोष्टीबद्दल गळ घातली तेव्हां शिव तिला म्हणाला. 'देवि, आज मी तुला सात विद्याधरांची कथा सांगतों. पण ती गुह्य गोष्ट आहे. तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणीं ती ऐकतां कामा नये. ती षट्कर्णी झाली तर घात आहे. त्यासाठीं तूं नंदीला आश्रमाच्या दारावर पहाऱ्याला बसव. मग आपण स्वस्थपणें त्या कथेचा आस्वाद घेऊं.'

पार्वतीनें तसा बंदोबस्त केला आणि ती शिवाजवळ येऊन गोष्ट ऐकायला बसली. लगेच शिवानें सुरुवात केली. 'आटपाट नगर होतं...' पार्वती हुंकार देऊं लागली. कथेंत हळूहळू रस निर्माण होऊं लागला. वक्ता आणि श्रोता दोघेंहि त्या कथेंतल्या रसगंगेंत न्हाऊं लागलीं. त्यांना बाह्य जगाचें भान उरलें नाहीं.

एवढ्यांत पुष्पदंत त्या ठिकाणीं आला. शिवाचा आवडता असल्यामुळें

तो वेळीं अवेळीं त्याच्याकडे जात असे, बसत असे, बोलत असे. पण आज नंदीनें त्याला अडवलें. तो म्हणाला, 'आंत जायचं नाहीं.' पुष्पदंतानें विचारलें, 'कां रे बाबा?' नंदी म्हणाला, 'कांहीं तरी गुपित आहे.'

पुष्पदंताची जिज्ञासा चाळवली. तो मागें फिरला खरा; पण त्याचें मन मात्र मागें फिरेना. 'असलं कसलं गुपित असेल बरं! आणि जर तें इतकं महत्त्वाचं असेल, तर तें आपल्याला कळायलाच हवं.' असें त्याच्या मनानें घेतलें. पुष्पदंत मोठा हरहुन्नरी होता. त्याला कित्येक विद्या आणि कला अवगत होत्या. अदृश्य रूपानें एखाद्या स्थळीं प्रवेश करणें आणि दुसऱ्याच्या रहस्याचा भेद करणें ही त्यांतलीच एक कला होती. पुष्पदंतानें तिचा आश्रय केला आणि तो शिव-पार्वतीच्या एकांतांत प्रविष्ट झाला. तसें करून ती सात विद्याधरांची कथा पार्वतीबरोबरच त्यानेंहि समग्र ऐकली. त्या कथेनें पार्वती संतुष्ट झाली, तसाच तोहि झाला.

त्याच्या बायकोचें नांव होतें जया. पुष्पदंत घरीं आला आणि त्यानें तीच कथा जयेलाहि ऐकवली. तिला वाटलें कीं, इतकी चांगली कथा आपण आपल्याच मनांत काय म्हणून ठेवायची? नवऱ्यानें आपल्याला सांगितली तशी आपणहि कोणाला तरी ती सांगावी. जयेचें आणि पार्वतीचें बरेंच सख्य होतें. ती पार्वतीची आवडती परिचारिका होती. पार्वतीकडे धावत पळत जाऊन तिनें तिला विचारलें.

"महादेवी, मी तुम्हांला एक छान छान गोष्ट सांगूं?"

पार्वती म्हणाली, 'सांग.' आणि मग जयेनें सात विद्याधरांची ती कथा पार्वतीला आमूलाग्र रसभरित ऐकवली. शिवानें तिला जशी सांगितली होती तश्शी. तीच भाषा, तीच घाटणी अन् तेच प्रसंग. पार्वती ऐकून चकित झाली. जयेला तिथेंच सोडून ती शिवाकडे गेली. कपाळावर आठी आणि डोळ्यांत पाणी आणून शिवापुढें उभी राहिली. शिवानें तिचा तो आवेश पाहिला आणि विचारलें.

"उमे, काय झालं तुला? अशी मुसमुसतेस कां?"

"तुम्हीं मला फसवलंत."

"मीं फसवलं? तें कसं काय?"

"तुम्ही मला म्हणालां होतां कीं, सात विद्याधरांची कथा मला एकट्यालाच ठाऊक आहे आणि ती मी तुला सांगतों."

"मग! खरी गोष्ट आहे ती."

"खोटं! साफ खोटं! ती गोष्ट जयेला माहीत आहे. तिनं ती मला आत्तांच सांगितली. भोळे सांब म्हणवतां अन् मला असं फसवतां होय? मी नाहीं तुमच्याशीं बोलायची."

शिवाला आश्चर्य वाटलें. हा रहस्यभेद कसा झाला तें जाणण्यासाठीं शिवानें ध्यान लावलें. त्या ध्यानांत त्याला कळलें कीं, हा चावटपणा पुष्पदंताचा आहे. त्यानें पार्वतीला तसें सांगितलें. पार्वती रागानें लाल झाली. तिनें पुष्पदंताला बोलावून आणून त्याबद्दल जाब विचारला. पुष्पदंतानं अपराध कबूल केला. पार्वतीनें त्याला शाप दिला कीं, 'तूं मनुष्ययोनींत जन्म घेशील!' त्या शापानें सर्वच शिवगणांना दुःख झालें.

माल्यवान् नांवाचा एक गण पुष्पदंताचा मित्र होता. आपल्या मित्रा-साठीं तो पार्वतीकडे रदबदली करायला गेला. पण पार्वतीनें त्यालाहि तोच शाप दिला. नवऱ्याला मिळालेल्या शापानें जया घाबरली. सहजगत्या केलेल्या गोष्टीचा केवढा घोर परिणाम झाला होता! तिनें जाऊन पार्वतीचे पाय धरले.

"महादेवी, उश्शाप द्या. मला एवढी भिक्षा घाला."

पार्वतीला तिची दया आली. तिनें उश्शाप देऊन म्हटलें.

"पृथ्वीवर काणभूति नांवाचा एक पिशाच आहे. तुझा नवरा हीच गोष्ट जेव्हां त्याला सांगेल, तेव्हां तो परत शिवलोकाला प्राप्त होईल"

त्या शापाप्रमाणें पुष्पदंतानें मानवयोनींत जन्म घेतला. कौशांबी नगरींत एक ब्राह्मण रहात होता, त्याच्या पोटीं पुत्ररूपानें तो जन्माला आला. ब्राह्मणानें वररुचि असें त्याचें नांव ठेवलें. बाप कर्मदरिद्री; त्यामुळें

लहानपणीं त्याची आबाळच झाली. तशांतच एके दिवशीं कांहीं किरकोळ आजार होऊन बापानें इहलोक सोडला. वररुचि त्यामुळें एकदम पोरका झाला. एकट्या आईवर त्याचा भार वाहण्याची वेळ आली. बिचारी चार घरीं कामें करायची आणि मुलाला अन्न घालायची. पुष्कळदा अशीं अनाथ पोरकीं मुलें हुषार निपजतात. वररुचीचेंहि तसेंच झालें. तो बुद्धीनें तल्लख होता आणि तितकाच हूडहि होता. आईला वाटे कीं, आपल्या मुलाला विद्या यावी. त्याच्या हुषारीचें चीज व्हावें. पण ती त्या बाबतींत कांहीं करूं शकत नव्हती.

पुढें एक दिवस वररुचीच्या घरीं दोन ब्राह्मण पाहुणे आले. ते दोघेहि तरुण होते आणि कसल्या तरी मोहिमेवर, कशाच्या तरी शोधार्थ निघाले होते. वररुचीच्या आईनें त्यांचें यथाशक्य स्वागत केलें. त्यांपैकीं एकाचें नांव होतें इंद्रदत्त आणि दुसऱ्याचें नांव होतें व्याडि. ते त्या रात्रीं तिच्याचकडे राहिले. त्यांना कळलें कीं, आज रात्रीं कौशांबींतल्या मंदिरापुढें नाटक आहे. त्यांनीं त्या नाटकाला जायचें ठरवलें. जातांना ते वररुचीलाहि बरोबर घेऊन गेले. सर्वांनीं नाटक पाहिलें. सकाळीं उठून तिघेहि घरीं आले. आईनें वररुचीला विचारलें कीं, ‘ नाटक कसें झालें ? ’ वररुचि म्हणाला, ‘ नाटक ना ? फार छान ! ’

आणि त्यानें तें नाटक अथपासून इतिपर्यंत जसेंच्या तसें स्वरांचे चढउतार आणि मुद्राभिनय यांच्यासह आईला ऐकवलें. आई खुष झाली. ते ब्राह्मणहि खुष झाले. ते ज्या वस्तूच्या शोधासाठीं निघाले होते ती वस्तु त्यांना तिथेंच लाभली. पुढें जाण्याचें कारणच उरलें नाहीं. ते एकपाठी मुलाच्या शोधांत होते आणि वररुचि एकपाठी आहे हें त्यानें कालचें नाटक घडाघड म्हणून दाखवून सिद्ध केलें होतें.

इंद्रदत्त आणि व्याडि या दोघांनाहि विद्या हवी होती. ते अध्ययना-साठीं म्हणून एका गुरूकडे गेले होते. त्या गुरूचें नांव वर्ष असें होतें. हा वर्ष महाविद्वान् होता. खुद्द कार्तिकेयानें त्याला विद्या दिली होती.

आपली विद्या दुसऱ्याला द्यावी, आपला विद्यावंश पुढं चालवावा, अशी त्यालाहि इच्छा होती. पण कार्तिकेयानें त्याला अशी अट घातली कीं, ‘जो एकपाठी असेल, त्यालाच विद्या दे’. व्याडि आणि इंद्रदत्त हे दोघेहि बुद्धिमान् होते. व्याडि दुपाठी होता आणि इंद्रदत्त त्रिपाठी होता. पण त्यांच्यापैकीं कोणी एकपाठी नसल्यामुळें वर्षाला त्यांना विद्या देतां येईना. तो त्यांना म्हणाला.

“एकपाठी मुलगा शोधून आणा; म्हणजे तुमचा कार्यभाग होईल. मी एकदा सांगेन. एकपाठी तें जसंच्या तसं म्हणेल. त्यामुळें व्याडीला तें दोनदा ऐकायला मिळेल. तो दुपाठी असल्यामुळें तो तें जसंच्या तसं म्हणेल. त्यामुळें इंद्रदत्ताला तीनदा ऐकायला मिळेल. तो त्रिपाठी असल्यामुळें तेवढ्यानें त्याचंहि कार्य होईल.”

गुरूची ही कल्पना त्यांना पटली. ते दोघे एकपाठी मुलाच्या शोधासाठीं गांवोगांव हिंडूं लागले. त्या भ्रमंतींत वररुचीच्या रूपानें त्यांचा हेतु सफल झाला. त्यांनीं त्याची आणखी एकदा परीक्षा घेतली. आणखी कांहीं म्हणायला लावलें. त्यांतहि तो तिळमात्र चुकला नाहीं. त्या दोघांना परमानंद झाला. ते वररुचीच्या आईला म्हणाले. ‘तुझ्या मुलाला आमच्याबरोबर पाठव. आम्ही त्याला महाविद्वान् करतों.’

त्याच्या आईला तरी तेंच हवें होतें. ती ताबडतोब कबूल झाली. व्याडि आणि इंद्रदत्त त्याला घेऊन गुरूकडे आले. वररुचीला पाहून वर्षाला संतोष झाला. त्यानें त्याला आणि दुसऱ्या दोघांनाहि आपल्या आश्रमांत ठेवून घेतलें. कांहीं वर्षं तिघेहि त्या आश्रमांत राहिले. त्यांनीं गुरूकडून सकल विद्या यथासांग शिकून घेतल्या. तिघेहि व्युत्पन्न झाले, पंडित झाले.

वररुचि हा आश्रमांतला लाडका विद्यार्थी होता. त्याच्या डोळ्यांत विलक्षण चमक होती. तो बोलण्यांत पटाईत होता. रूपानें देखणा

तसाच चुणचुणीत होता. तो कोणावरहि जातां जातां मोहिनी टाकी. वर्षाची पुतणी उपकोशा हिला तर तो अतिशयच आवडूं लागला. ती नेहमीं त्याच्या मागें मागें असे. त्याच्याशीं बोलण्यांत, त्याच्याबरोबर काम करण्यांत आणि घटका घटका त्याच्याकडे टक लावून पहाण्यांत तिला परम सुख वाटत होतें. थोड्याच दिवसांत तिचें वररुचीवर प्रेम जडलें. वररुचीहि तिच्यावर प्रेम करूं लागला. त्यालाहि ती जिवाआगळी आवडूं लागली. त्यांचा हा परस्पर प्रेमभाव आश्रमांत सर्वांना कळून आला. गुरूला वाटलें कीं, वररुचि चांगला आहे, मुलीला अनुरूप आहे, तेव्हां हा संबंध जुळवायला कांहीं हरकत नाहीं. तो विचार लगेच पक्का झाला. मुहूर्तनिश्चय होऊन ठरलेल्या तिथीवर वररुचि आणि उपकोशा या दोघांचें शुभमंगल झालें. वररुचीला विद्येबरोबरच पत्नीहि मिळाली. तिघांच्याहि विद्या पूर्ण झाल्या.

आतां गृहस्थाश्रम थाटायला कुठें तरी जायचें असें सर्वांनीं ठरवलें. पण आश्रम सोडण्याच्यापूर्वीं प्रश्न आला तो गुरुदक्षिणेचा. वर्ष म्हणाला, ‘ मला एक लक्ष मुद्रा गुरुदक्षिणा म्हणून पाहिजेत. ’

गुरूला लक्ष बोलणें सोपें होतें; पण शिष्यांना तो मिळवणें तितकेंच कठीण होतें. कोण्या तरी राजाला गळ घातल्यावांचून अन् तो राजा उदार झाल्यावांचून लक्ष मुद्रा हातीं लागणें सर्वथा अशक्य होतें. तिघेहि मग आश्रमांतून त्या मोहिमेवर निघाले. कोणाकडे जावें, कोणापुढें हात पसरावा, याची चर्चा-चिकित्सा करीत जात असतां त्यांना मगध देशाच्या नंदराजाची आठवण झाली. नंदाच्या मनांत आलें तर एक लक्ष सुवर्ण-मुद्रा त्याला कःपदार्थ आहेत असें त्यांनीं ठरवलें. त्या कल्पनेनें त्यांना मोठा हुरूप आला. ते नंदाच्या राजधानीच्या मार्गानें झपाझप प्रवास करूं लागले.

पण दैवयोग मोठा चमत्कारिक होता. हे तिघेहि वेशींतून पाटलिपुत्र नगरांत शिरतात; तर सारें नगर विषण्ण आणि शोकमग्न. नगरांतले नगारे,

चौघडे मुके. बाजारपेठा बंद. कोणाच्या दारापुढें रांगोळी नाहीं, कीं दारांत मंगल कलश नाहीं. सगळ्या नगरावर काळी छाया पसरलेली. प्रत्येकाचें तोंड बावलेलें.

काय झालें होतें असें त्या नगरांत? दुसरें काय होणार? त्या राज्याचा अधिपति खुद्द नंदराजाच मरण पावला होता. एकाएकीं, तडकाफडकीं त्याचें हें मरण ओढवलें होतें आणि त्यामुळें नगरावर दुःखाचा पूर लोटला होता. व्याडि, इंद्रदत्त, वररुचि या तिघांनाहि तें कळलें आणि त्यांनीं कपाळाला हात लावला. तहानेल्या माणसानें दुपारच्या वेळीं एखाद्या तळ्यावर जीभ लांब करून जावें आणि तें तळेंच आटून कोरडें पडलेलें दिसावें तशी त्यांची गत झाली. आतां लक्ष मुद्रा कोण देणार? आणि त्या मिळाल्या नाहींत तर जन्मभर आपल्याला गुरूच्या ऋणांत रहावें लागणार, या जाणिवेनें त्यांच्या कळा लोपल्या. ते गेल्या पावलीं माघारे फिरण्याचा विचार करूं लागले.

एवढ्यांत इंद्रदत्ताला एक अभिनव कल्पना स्फुरली. तो म्हणाला.

"गड्यांनो, आपल्याला निराश होण्याचं कारण नाहीं. मला परकाया-प्रवेशाची विद्या अवगत आहे. मी माझा जीव या शरिरांतून काढून दुसऱ्याच्या शरिरांत घालूं शकतों. नंदराजाचं प्रेत अजून जाळलं गेलं नाहीं. अजून तें राजवाड्यांतच आहे. मी माझ्या योगविद्येनें त्याच्या शरिरांत प्रवेश करतों, म्हणजे तो जिवंत होईल. मग मीच त्याच्या हातानं लक्ष मुद्रांचं तुम्हांला दान करवतों..."

"फार छान! नामी कल्पना!" व्याडि आणि वररुचि म्हणाले.

"कल्पना छान खरी; पण मित्रांनो! तुमच्यावर एक मोठीच जबाबदारी येते. मी नंदराजाच्या शरिरांत प्रवेश केल्यावर तो उठेल खरा; पण माझं शरीर इकडे प्रेत होऊन पडेल. मी संकल्पित योजना पुरी करून परत माझ्या शरिरांत येईपर्यंत तुम्हीं माझ्या निश्चेष्ट शरिराचं इथें रक्षण करायला हवं."

" तें काम आमचं. तूं मुळींच चिंता करूं नको. आम्ही डोळ्यांत तेल घालून तुझ्या देहाला जपूं. तूं बिनधोक जा. कसंहि कर; पण गुरुदक्षिणा मिळव."

योजना पक्की झाली. इंद्रदत्त आसन घालून बसला. त्यानें आपल्या योग-सामर्थ्यानें शरिरांतून हळूहळू आपला जीव वर खेचला आणि लगेच बाहेर टाकला. त्यासरशीं इंद्रदत्ताचें शरीर जमिनीवर कोसळलें आणि गतप्राण झालें. क्षणापूर्वींचा त्यांचा चालता बोलता मित्र अकस्मात् थंड झाला. खरें म्हणजे केवढी ही धक्का देणारी दुर्घटना! पण त्या दोघांना तिचें दुःख झालें नाहीं. इंद्रदत्ताच्या योगसिद्धीवर त्यांचा विश्वास होता. आणि या घटनेंतूनच त्यांचा कार्यभाग साधणार होता. म्हणून ते दोघे संशयांत न पडतां, न कचरतां त्याचें शरीर राखीत त्या ठिकाणीं राहिले.




व्याडि इंद्रदत्ताचें प्रेत राखतो

नंदराजाच्या राजवाड्यांत एकच आक्रोश माजला होता. त्याच्या राण्या प्रेताजवळ बसून धाय मोकलीत होत्या. राजाचे एकेक गुण आठवून विलाप करीत होत्या. प्रधानादि मंडळी त्यांचें सांत्वन करीत होती. बाहेर राजाच्या अंत्ययात्रेची तयारी चालली होती. चहूं बाजूंनीं, सगळया रस्त्यांनीं प्रजाजन राजवाड्यापुढें जमा होऊं लागले होते.

अधिकारी मंडळी आपसांत विचार करीत होती, कीं 'प्रेत उचलायला पुढें कुणीं जायचें ?'

पण तो प्रसंगच आला नाहीं. तिथें एक निराळाच चमत्कार घडला. नंदराजाच्या थंड पडलेल्या देहांत हळूहळू उष्णता संचरूं लागली. हृदय पुनश्च धुगधुगूं लागलें. प्रेतकळा जाऊन मुखावर जीवनाची कांति चढूं लागली. शून्यांत गेलेले डोळे हळूहळू खालीं येऊं लागले. हा फरक जवळच्या लोकांना चटकन् जाणवला नाहीं, पण नंदराजा जेव्हां उठून बसला, तेव्हां मात्र इतरांचीं काळजें एकदम हबकलीं. 'हें काय अद्भुत !' असा अस्फुट उद्गार सर्वांच्या मुखांतून निघाला. राजानें एकवार डोळे चोळले आणि आवतींभोंवतीं सर्वांकडे जाणिवेच्या नजरेनें पाहिलें, तेव्हां मग त्यांना वाटलें कीं, राजा खरोखरच जिवंत झाला. आणि मग जवळचीं माणसें म्हणूं लागलीं.

'राजा मेला नव्हता. तो फक्त मूर्च्छित पडला होता. त्याची मूर्च्छा सांवरली आणि तो होता तसा उठून बसला.'


राजाच्या शयनमंदिरांतून ही बातमी बाहेरच्या चौकांत आली. तिथून राजांगणांत आली. तिथून बाहेर पडली आणि नगरभर झाली. सगळीकडे हलकल्लोळ. ज्याच्या त्याच्या तोंडीं एकच वाक्य. 'राजा जिवंत झाला.' ताबडतोब नगराचा नूर पालटला. स्मशानाची अवकळा आली होती तिथें नंदनवन निर्माण झालें. सगळीकडे आनंद, हर्ष आणि उल्हास.

ही बातमी व्याडि आणि वररुचि यांच्याहि कानापर्यंत पोंचायला वेळ लागला नाहीं. इंद्रदत्ताचें प्रेत राखण्यासाठीं व्याडीला तिथें उभा करून वररुचि राजवाड्याकडे निघाला. सरळ येऊन राजापुढें उभा राहिला. राजाचें शरीर त्याच्या परिचयाचें नव्हतें ; पण त्यांतला आत्मा इंद्रदत्ताचा होता आणि तो तर त्याचा मित्र होता. त्यामुळें दोघांनींहि हसून एकमेकांकडे पाहिलें. आपलें कारस्थान यशस्वी झाल्याबद्दल इंद्रदत्तानें वररुचीला नेत्र संकेत केला. वररुचीनें हात जोडून म्हटलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक २१८३४ दि: ...
क्रमांक ८८३ नों: दि: ...

" महाराज, आपण मृत्यूच्या दाढेंतून निसटलां आणि पुनरपि जिवंत झालां, ही ईश्वराची मोठीच कृपा ! महाराजांना यापुढें उदंड आयुरारोग्य लाभूं दे. महाराज, गंडांतर टळून गेल्याचा हा शुभ प्रसंग आपण एखादें महादान देऊन साजरा करावा अशी आपल्याला विनंती आहे. "

" महादान देऊं ? काय देऊं ? कोणाला देऊं ? बोला लवकर ! " राजानें म्हटलें.



योगनंद वररुचीला दक्षिणा देतो

" दान मला हवं, महाराज ! एक लक्ष सुवर्णमुद्रा मी दान म्हणून मागतों. मला गुरुदक्षिणा द्यायची आहे. गुरूच्या ऋणांतून मुक्त व्हायचं आहे. "

" ठीक आहे. प्रधानजी, खजिन्यांतल्या एक लक्ष मुद्रा या ब्राह्मणाच्या पदरांत टाका. "

प्रधानजींचें नांव शाकटाल असें होतें. तो राजकारणांतला मुरब्बी माणूस होता, एवढें सांगितल्यावर तो महाधूर्त होता हें सांगणें नलगे! एक लक्ष सुवर्णमुद्रा खजिन्यांतून हातोहात पसार होणार हें त्या पुरुषाला बरें वाटलें नाहीं. तो अळंटळं करूं लागला. वायदे सांगूं लागला. राजाला तें पसंत पडलें नाहीं. त्यानें आग्रहच धरला. तेव्हां त्याच्या आग्रहाखातर लक्ष मुद्रा पदरांत घालून वररुचीला वाटेस लावणें त्याला भाग पडलें. राजाचा हा आग्रह आणि त्यानें पूर्वीची ओळखदेख नसतां वररुचीशीं केलेले नेत्रसंकेत, या गोष्टींमुळें शाकटालाला एक संशय आला. राजाच्या मृत शरिरांत हा कोणी दुसराच आत्मा संचरला नसेल ना? कारण राजाचें आतांचें वर्तन त्याच्या पूर्वस्वभावाला विसंगत होतें. प्रधानाची शंका दुणावली आणि विचारांतीं ती दृढहि झाली. त्यानें आपला ओठ चावला आणि म्हटलें. 'ठीक आहे. हेंहि कांहीं वाईट नाहीं.'

शाकटाल बाहेर आला आणि त्यानें नगराच्या कोतवालाला हुकूम दिला कीं, 'नगरांत आणि नगराच्याबाहेर कसून शोध करा आणि जें जें प्रेत म्हणून दिसेल तें तें ताबडतोब जाळून टाका.'

त्यासरशीं राजदूत त्या कामगिरीवर निघाले हुडकतां हुडकतां त्यांना इंद्रदत्ताचें प्रेत आढळलें. व्याडि तें राखीत बसला होता. शिपाई आलेले पहातांच तो घाबरला. त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांना योग्य उत्तरें न देतां उगाच आक्रोश करूं लागला. पण त्याच्या आरडाओरडीला न जुमानतां शिपायांनीं तें प्रेत उचलून नेलें अन् लगेच 'अग्नेय स्वाहा' केलें. प्रेताची अशी विल्हेवाट लागल्यामुळें इंद्रदत्ताचा आत्मा राजाच्या शरिरांत कायमचा कोंडला गेला. त्याला परत यायला स्थानच उरलें नाहीं. आपल्या योगसिद्धीनें त्यानें जो खेळ मांडला होता, तो त्या महाधूर्त प्रधानानें त्याच्याच अंगाशीं आणला. इंद्रदत्ताला आतां राजा म्हणूनच जगायला हवें होतें आणि राजा म्हणूनच आयुष्याची दोरी तुटेल तेव्हां मरायला हवें होतें.

अशा रीतीनें प्रधानानें राज्यावरचें संकट टाळलें. त्या दिवसापासून तो राजा योगनंद या नांवानें प्रसिद्ध झाला. आपला मूळ आसरा नष्ट केल्याबद्दल योगनंदाचा म्हणजेच इंद्रदत्ताचा आत्मा खूप जळफळला. त्याला त्या प्रधानाचा विलक्षण क्रोध आला. त्यानें एका फर्मानासरशीं शाकटालाला आणि त्याच्या मुलांना बंदींत टाकलें आणि त्याच्या जागीं वररुचीला आपला प्रधान नेमलें. वररुचीलाहि राजनीतीचें शिक्षण मिळालें होतें. शिवाय आंगची अक्कलहुषारी. त्यामुळें योगनंदाची प्रधानकी चालवणें त्याला जड गेलें नाहीं.

पुढें एक दिवस बंदींत पडलेल्या शाकटालाची दुरवस्था त्यानें पाहिली आणि त्याला त्याची दया आली. त्यानें राजाकडे रदबदली करून शाकटालाला आणि त्याच्या पुत्रांना बंदिवासांतून मुक्त केलें. शाकटालानें वररुचीचे उपकार मानले.

योगनंद हा राजा असला तरी पूर्वींचा इंद्रदत्त. तसाच वररुचीचा मित्र. आपण राजशरिरांत कोंडले गेलों म्हणून तो अनेकदा वररुचीजवळ दुःख व्यक्त करीत असे. वररुचि त्याचें सांत्वन करी आणि 'आतां राजा झाला आहेसच; तरी नीतिधर्माला जागून प्रजेवर राज्य कर अन् राजवैभवाचा उपभोग घे' असें त्याला सांगे. इंद्रदत्तानें नीतिधर्माचा विशेषसा विचार केला नाहीं; पण सुखविलास उपभोगणें हा उपदेश मात्र त्यानें आवर्जून अमलांत आणला. हळूहळू वररुचीवर राज्यकारभार सोंपवून तो अंतःपुरांतच कालक्रमणा करूं लागला.

वररुचीला तरी प्रधानपद कुठें हवें होतें! तो विद्येचा व्यासंगी तसाच काव्याचा रसिक. त्यामुळें तो मोठ्या नाखुषीनेंच प्रधानकीचा कारभार पाही. वररुचि एकपाठी होता; म्हणून तर वर्षाकडून त्याला विद्या मिळाली होती. तो व्याकरणशास्त्रांतला गाढा पंडित बनला होता. ती विद्या त्याच्या जिह्वाग्रीं तलवारीसारखी तळपत असे. व्याकरणाच्या शास्त्रार्थांत तो आपल्यापुढें कोणाचीहि डाळ शिजूं देत नसे. तो स्वतः

कवि नव्हता; पण काव्यप्रिय होता. काव्य चांगलें असलें तर कवि पंडित आहे का अपंडित आहे, नागर आहे का रांगडा आहे, याचा विचार न करतां तो त्या काव्याची प्रशंसा करी. त्याच्या भलावणीनें अनेक कवींना मूठभर मास चढे. कुठलेंहि काव्य ऐकलें, कीं एकपाठी असल्यामुळें त्याला तें पहिल्या श्रवणालाच पाठ होत असे. योगनंदाचा प्रधान असल्यामुळें त्याला राज्यांत अनेक ठिकाणीं हिंडावें लागे. त्या प्रसंगीं ग्रामजन आणि खेड्यांतल्या बायका यांना बोलावून त्यांच्याकडून गीतें म्हणून घेण्याचा त्याला छंद होता. एखाद्या गीतांत कल्पना चांगली असली आणि जर त्या कवीला अथवा कवयित्रीला ती चांगल्या शब्दांत मांडतां आली नाहीं तर, वररुचि तिच्यावर स्वतः संस्कार करीत असे अन् त्या कल्पनेच्या रत्नाला सुंदर शब्दांचें कोंदण बसवीत असे. त्याच्या ह्या प्रयत्नामुळें कित्येक ग्रामीण काव्यें उज्ज्वल झालीं आणि संस्कृत काव्यांच्या तोडीस तोड बनलीं. वररुचीजवळ अशा सुसंस्कृत लोककाव्यांचा तसाच स्त्रीगीतांचा फार मोठा संग्रह जमला.

स्वतः संस्कारलेलीं अशीं काव्यें तो कित्येकदा राजदरबारांतहि म्हणून दाखवी. राजाला तीं आवडत. तो त्यांची प्रशंसा करी. पण त्यामुळें इतर पंडितांच्या पोटांत दुखूं लागे. ते वररुचीचा उपहास करीत. 'हा बायकांचीं काव्यं चोरतो अन् आपलीं म्हणून तीं लोकांना ऐकवतो.'...'हा कसला कवि! हा तर वाङ्मयचोर'......'बायकांचीं गाणीं गातो, तर त्याला म्हणावं जातं मांडून दळण दळीत बैस. कशाला हवी ही प्रधानकी...' असले कुचेष्टेचे उद्गार अनेकदा वररुचीच्या कानावर येत. पण त्यानें आपला नाद मुळींच सोडला नाहीं. तो ग्रामीण जनतेंतलीं कथा आणि काव्यें यांचा संग्रह करीतच राहिला. हळूहळू त्या गीतांवरून तो ग्रामजनांच्या प्राकृत भाषेचें व्याकरण शोधूं लागला. निरनिराळ्या शब्दांची व्युत्पत्ति पाहूं लागला. प्राकृत शब्द कसे बनतात, कसे बदलतात, त्यांचे आडाखे बांधूं लागला. त्यावरून बोलभाषेचें व्याकरण

मांडूं लागला. अशा प्रकारें त्याचा हा उद्योग निरंतर चालू राहिला. त्याला जणूं तो छंदच लागला. आपलें पांडित्य आणि रसिकत्व त्यानें प्राकृत भाषेच्या सेवेला जणूं वाहून टाकलें.

अशा स्थितींत एक दिवस आणखी एक महत्त्वाची घटना घडली आणि त्यामुळें वररुचीच्या जीवनावर दुर्दैवाचें सावट पडलें.

ज्या वर्ष नांवाच्या गुरूकडे वररुचि विद्या शिकला, त्याच गुरूकडे पाणिनीनेंहि अध्ययन केलें होतें. पाणिनि हा मुळांत मूर्ख आणि बुद्धीचा जड. कितीहि भरवलें तरी व्याकरण त्याच्या डोक्यांत शिरतच नसे. पालथ्या घड्यावर पाणी ओतावें तशी त्याची अवस्था होती. गुरुगृहीं वागावें कसें, हेंहि त्याला समजत नव्हतें. अशाच एका प्रसंगीं गुरुपत्नीनें त्याची चांगलीच खावड काढली आणि त्याला आपल्या घरांतून हाकलून दिलें. तो अपमान पाणिनीच्या काळजांत खोलवर घुसला. गुरुपत्नीच्या धिक्कारानें तो अंतरीं घायाळ झाला. त्यानें मनाशीं ठरवलें कीं, तप करून शंकराला प्रसन्न करून घ्यायचें आणि त्याच्याकडून व्याकरणविद्या मिळवायची.

त्यासाठीं त्यानें सरळ हिमालयाचा रस्ता धरला. कुठल्या तरी एका शिखरावर बसून त्यानें तप आरंभिलें. त्या कामीं खूप देहकष्ट सोसले. जिवाचीसुद्धा पर्वा ठेवली नाहीं. त्याचा हा निर्धार पाहून शिवाला त्याच्यापुढें प्रकट होणेंच भाग पडलें. तो म्हणाला.

" तपोधन तरुणा, काय हवंय तुला ?" पाणिनीनें त्याच्याकडे व्याकरण मागितलें. शिवानें तें त्याला दिलें आणि शिकवलें. त्याच्या बुद्धींत तें प्रतिष्ठित झालें. ज्ञानानें त्याचें हृदय प्रकाशमय झालें. त्याचा हेतु पूर्ण झाला.

हाच पाणिनि एक दिवस योगनंदाच्या दरबारांत आला. त्यानें राजाला विचारलें. 'तुमच्या दरबारांत कोणी वैयाकरण आहे काय ? असल्यास मला त्याच्याशीं दोन हात करायचे आहेत.' योगनंदानें वररुचीला

पुढें केलें. दोघेहि एकाच गुरूचे शिष्य. एकमकांना ओळखणारे. पण तेच दोघे त्या दिवशीं वादाला प्रवृत्त झाले. त्यांचें खंडनमंडन सुरू झालें. दोघेहि आपापली बुद्धि पणाला लावून वचनांचे अर्थ करूं लागले. एकमेकांना पदोपदीं खोडूं लागले, अडवूं लागले. दोन दिग्गजांची ती लढत चांगलीच रंगली. श्रोत्यांना कुतूहल झालें कीं, या वाग्युद्धांत विजयश्री कोणाला माळ घालणार? यशाचा तुरा कोण लावणार?

पण तो तुरा वररुचीनेंच लावला. त्याची बुद्धि म्हणजे जणूं तळपती वीज होती. आधींच पंडित, त्यांतून व्यासंगी अन् शिवाय लोकांच्या नव्या व्याकरणाचा निर्माता. भाषेचा, तिच्या प्रवृत्तीचा, तिच्या इतिहासाचा खोलवर शोध घेणारा. त्यामुळें पाणिनीला त्यानें लीलेनें पराभूत केलें. पाणिनीची वाचाच बंद पडली. योगनंद सहर्ष उद्गारला.

"वररुचीचा विजय झाला !"

तो अपमान पाणिनीला प्राणसंकटासारखा वाटला. त्याला शिव प्रसन्न होता. पाणिनि म्हणेल तें सिद्ध व्हावें, इतका शिवाचा त्याच्यावर अनुग्रह होता. पाणिनीनें त्या गोष्टीचा फायदा घ्यायचें ठरवलें. वररुचीची विद्या नष्ट होवो, असा हेतु मनांत धरून त्यानें एक हुंकार त्या सभेंत उमटवला. तो कानीं पडतांच वररुचीची विद्या एकाएकीं लुप्त झाली. ढगांनीं चंद्राला गिळावें, राहूनें सूर्याचा ग्रास करावा, तसें झालें. त्याची बुद्धि जड झाली. कांहीं सुचेना, स्फुरेना. विस्मृतीनें त्याच्या बुद्धीला घेरलें. त्याला एकहि वचन आठवेना, एकहि नियम आठवेना. जणूं त्याला व्याकरणाचा कधीं गंधहि लागला नव्हता. सगळें अज्ञान; सारा अंधार. एका क्षणांत होतें तें नव्हतें झालें. वररुचि हा वररुचिच उरला नाहीं.

या अकल्पित दुर्घटनेनें वररुचि लाजला, बावरला, काळाठिक्कर पडला. एक वेळ प्राण गेला असता तरी पुरवलें असतें; पण विद्या गेली हें त्याला मृत्यूपेक्षांहि मारक असें दुःख वाटलें. विद्या गेली याचा अर्थ व्यक्तिमत्त्वच संपुष्टांत आलें, कवडीमोल ठरलें. ही अवस्था सहन करणें

आणि ह्या अवस्थेंत जगणें त्याला कदापि शक्य नव्हतें. म्हणून त्यानेंहि तपाचा मार्ग स्वीकारण्याचें ठरवलें. त्यानें आपलीं प्रधानपदाचीं वस्त्रें उतरून ठेवलीं, योगनंदाला सांगून पुनश्च शाकटालाला मंत्रिपदावर बसवलें आणि स्वतः हिमालयाचा रस्ता सुधारला.

घरीं राहिल्या त्या दोघी बायका. एक वररुचीची आई आणि दुसरी त्याची पत्नी उपकोशा. आपल्या पाठीमागून त्यांना अन्नवस्त्राची विवंचना पडूं नये, म्हणून वररुचीनें पाटलिपुत्रांतल्या एका सावकाराकडे बरेंचसें धन ठेवून दिलें होतें. कांहीं दिवस तो सावकार उपकोशेला नियमितपणें पैसे पुरवीत होता; पण पुढें त्याच्या मनांत पाप शिरलें.

संकटें एकदा यायला लागलीं, कीं तीं चहूं बाजूंनीं येतात. घर फिरलें कीं घराचे वासेहि फिरतात. एकाची आपत्ति सर्वांना भोंवते. एकाचें दुखणें सर्वांना बाधतें. उपकोशा ही अत्यंत देखणी स्त्री होती. जोंवर ती वररुचीच्या छायेंत होती, तोंवर कोणी तिच्या वाटेस गेलें नाहीं. तिच्याकडे वांकड्या डोळ्यानें पाहण्याची कोणाला छाती झाली नाहीं. पण वररुचि दीर्घ मुदतीसाठीं घरांतून निघून जातांच तिच्यावर एकामागून एक संकटें कोसळूं लागलीं. सावकार तिला पैसे देईना; त्यामुळें घरांत तिची उपासमार होऊं लागली. तिची ही अवस्था समजतांच राजपुरोहित तिच्याकडे गेला आणि तिला म्हणाला. ‘तूं चिंता करूं नको; मी तुला हवं तेवढं द्रव्य देईन.’ त्यानें तिच्याविषयीं अत्यंत करुणा दाखविली. तिच्या दुःखावर सहानुभूतीची फुंकर घातली.

पण त्याचेहि दाखवायचे अन् खायचे दांत निराळे होते. तिच्या विपन्नावस्थेचा फायदा घेऊन तो राजपुरोहित तिला वश करूं पहात होता. सावकाराचीहि इच्छा तीच होती. उपकोशा आपत्ति भोगते ही गोष्ट तिथल्या न्यायाधीशालाहि कळली. तोहि एक दिवस तिच्याकडे आला. त्यानेंहि तिच्या दुःस्थितीबद्दल हळहळ व्यक्त केली. पण त्याचाहि कावा तोच होता. सर्वांना उपकोशा हवी होती. तिचें सौंदर्य हवें होतें.

तारुण्य हवें होतें. तिनें त्यांच्या पापी अभिलाषेला मान तुकवण्याचाच काय तो अवकाश; ते तिला द्रव्याच्या राशीवर बसवणार होते. तिचें सगळें दैन्य-दुःख हरण करणार होते. तिला सजवणार होते, नटवणार होते. नगरांतल्या या अधिकारी आणि प्रतिष्ठित आसामींच्या दुष्ट हेतूला तोंड देणें तिला बरेंच जड गेलें.



पुरोहित उपकोशेची मनधरणी करतो

पण उपकोशेचें पातिव्रत्य वज्रासारखें अभंग होतें, धारदार होतें. ती केवळ एकमार्गी, साधीभोळी साध्वीच नव्हती, तर अभिजात चतुर होती. तिनें ह्या सगळ्या बड्या धेंडांना पाणी पाजायचें ठरवलें. ती मोठ्या हिकमतीनें वागली. तिनें या सर्वांना कित्येक दिवस आशेवर झुलत ठेवलें. गोड शब्दांनीं त्यांच्या जिभेला मधाचें बोट लावलें. मग एक दिवस त्यांना आपल्या घरीं बोलावलें. युक्तीनें त्यांच्या तोंडाला काळें फासलें. मग त्या सर्वांना तशाच स्थितींत राजदरबारांत नेऊन उभें केलें. भर सभेंत त्यांच्या अब्रूचे धिंडवडे काढले. सावकाराकडून तशाच युक्तीनें आपलें धनहि परत मिळविलें. राजानें त्या सर्व लब्धप्रतिष्ठितांची भरल्या दरबारांत छीः थूः केली. उपकोशेच्या बुद्धिमत्तेला खूप वाखाणलें. तिच्या बुद्धीचा आणि पातिव्रत्याचाहि खूप गौरव केला.

अशा रीतीनें उपकोशा आपल्यावरच्या संकटांतून शिरसलामत बाहेर पडली आणि त्याच वेळीं वररुचिहि हिमालयांतून परत आला. जातांना निस्तेज मुखानें गेला होता; पण येतांना उजळ मुखानें आला. जातांना खालीं मान घालून गेला होता, येतांना वरच्या मानेनें राजरोसपणें परत आला. त्याचा प्रवास यशस्वी झाला होता. त्याच्या तपाला सिद्धि मिळाली होती. त्यालाहि शिवानेंच व्याकरणाचें वरदान दिलें होतें. तें 'माहेश्वर' व्याकरण सांगोपांग आणि रहस्यासह आपल्या बुद्धींत सांठवून, त्याच्यावर प्रभुत्व मिळवून तो परत आला होता. आतां त्याचा कोणीहि पराभव करूं शकणार नव्हता. त्याची पूर्वीची विद्या अभ्यासाची होती आणि आतांची विद्या वरदानाची होती. या विद्येला मरण नव्हतें. या ज्ञानाला विस्मरणाचा शाप कधींहि बाधणार नव्हता. योगनंदानें दरबार भरवून त्याचा मोठा सन्मान केला. वररुचीचे दुर्दिन संपले. त्याच्या जीवनांत आनंद आणि कुटुंबांत सौख्य निर्माण झालें.

पण संसारांतलें सुख हें अळवावरचें पाणी आहे, हें वररुचीला थोड्याच काळांत कळून चुकलें. राजसेवा म्हणजे तलवारीच्या धारेवरची कसरत आहे आणि राजकृपा म्हणजे मुलखाची लहरी आहे, याचाहि त्याला झणझणीत अनुभव आला. वस्तुतः योगनंद म्हणजे त्याचा पूर्वीचा मित्र आणि सहाध्यायी! पण तो राजाच्या शरिरांत शिरल्यामुळें राजपदाचे दुर्गुण नकळत त्याच्यामध्यें वाढूं लागले. तो पूर्वील स्नेह विसरून वररुचीला कमी लेखूं लागला. त्याच्याशीं उर्मटपणानें वागूं लागला. योगनंद राजा होता, तर वररुचि व्याकरणशास्त्रांतला पंडितराज होता. तो कशाला योगनंदाची थुंकी झेलील! तो आपला मान सांभाळून वागे. आणि तेंच योगनंदाला आवडेनासें झालें. कधींकधीं त्या दोघांत शाब्दिक चकमकीहि झडूं लागल्या. त्यांच्या संबंधाला हळूहळू ईर्ष्या अन् द्वेष यांचें काळें लागत गेलें. वररुचि योगनंदाला डोळयांपुढें नकोसा झाला आणि एक दिवस त्या स्वच्छंदी राजानें वररुचीचा वध करण्याचा हुकूम फर्मावला.

तो हुकूम ऐकतांच सगळया राजसभेवर जणूं वज्रपात झाला. दरबारांतल्या अन्य पंडितांनाहि आपल्या जिवाची शाश्वती वाटेनाशी झाली. वररुचीचा जळींस्थळीं हेवा करणारे अन्य पंडितहि या हुकमानें नखशिखांत हादरले.

वररुचीचा वध करण्याचें कार्य शाकटालानें स्वतःच्या अंगावर घेतलें. राजा म्हणाला, 'ताबडतोब हें काम उरका. आज संध्याकाळीं अस्तमत्या सूर्यासह वररुचिहि निजधामाला गेला पाहिजे.' शाकटाल म्हणाला, 'जशी महाराजांची आज्ञा.' शाकटाल वररुचीला घेऊन निघाला; पण तो त्याला मारण्याच्या उद्देशानें नव्हे, तर त्याचे प्राण वांचवण्याच्या उद्देशानें. राजा अविवेकी झाला म्हणून प्रधानाला तसें होतां येत नव्हतें. एका मोठ्या पंडिताला हकनाक वधदंड देणें म्हणजे ती केवढी राष्ट्रीय हानि होती! शिवाय पूर्वी एकदा वररुचीनेंच त्याला अंधारकोठडींतून बाहेर काढलें होतें. इतकेंच नव्हे; तर पुनश्च मंत्रिपदावरहि चढवलें होतें. हे उपकार तो विसरूं शकत नव्हता. त्यानें ठरवलें कीं, आपल्या प्राणावर बेतली तरी चालेल; पण वररुचीचे प्राण वांचवायचेच.

आणि त्यानें वररुचीला एका सुरक्षित स्थळीं नेऊन लपविलें. मात्र लोकांत असा बोभाटा केला कीं, राजाज्ञेनें वररुचीचा वध झाला. पण एक करतांना दोन म्हणतात ना, तशी अवस्था झाली. उपकोशा आपल्या नवऱ्याच्या वधाची बातमी कळतांच वीज पडून केळ मोडावी, तशी कोसळली. पतीच्या मरणानंतर आपण जिवंत राहणें म्हणजे जन्मभर अनंत आपत्तींना तोंड देणें होय, असें तिला वाटलें. जिवाचा लोभ धरून आपला सतीधर्म कलंकित करूं नये, असेंहि तिच्या मनानें घेतलें. ती पतीच्या मागून सती जायला सिद्ध झाली. सारीं अहेव लेणीं लेवून सुवासिनींना वाणें वांटीत वांटीत ती घराबाहेर निघाली. नगराबाहेर एका पवित्र स्थळीं तिनें स्वतःची चिता रचायला लावली. तिनें स्वहस्तें त्या चितेला अग्नि लावला आणि चहू बाजूंनीं आग भडकलेली पहातांच त्या

चितेंत उडी घेतली. ती मरून अमर झाली. लोकांनीं तिला आणि त्या चितेला वंदन केलें आणि खिन्न मनानें ते परत आले.

पुढें पाटलिपुत्र नगरांत अनेक विलक्षण घटना लागोपाठ घडत गेल्या. योगनंदाचा उन्मत्तपणा दिवसेंदिवस वाढत चालला. चाणक्यासारख्या विद्वान्, धोरणी आणि त्यागी अशा महापुरुषाचा अपमान करतांनाहि त्यानें मागेंपुढें पाहिलें नाहीं. त्या अपराधाबद्दल चाणक्यानें त्याला पुरेपूर शासन दिलें. योगनंद मृत्युमुखीं पडला. जगांतून नाहींसा झाला. चाणक्यानें नंदाच्या राजसिंहासनावर चंद्रगुप्त मौर्याला राज्याभिषेक केला. तो राज्यावर बसतांच वररुचीची अज्ञातवासांतून मुक्तता झाली.

मोकळा होऊन बाहेरच्या जगांत येतांच त्याला आपली पत्नी सती गेल्याचें कळलें. बायको मेली म्हणजे घर काय उरलें! आपला संसार संपला असें समजून त्यानें तावडतोब संन्यास घेतला. आतां 'चरैवेति चरैवेति!' सारखें भटकत राहणें एवढेंच आतां त्याच्या नशिबीं उरलें. त्याच रात्रीं त्याला दुर्गा देवीनें स्वप्नांत दर्शन दिलें. ती म्हणाली, 'तूं विंध्य पर्वतांत ये आणि काणभूति पिशाचाला भेट.' त्या आदेशाप्रमाणें तो लगेच विंध्याद्रींत आला. तिथें त्याला काणभूति भेटला. त्याच्या दर्शनानें वररुचीला आपला पूर्वजन्म आठवला. आपण पूर्वजन्मीं पुष्पदंत नांवाचा शिवगण होतों. शिवानें पार्वतीला एकांतांत सांगितलेली सात विद्याधरांची ती 'बृहत्कथा' आपण चोरून ऐकली होती. पार्वतीला क्रोध येऊन 'तूं मनुष्यलोकीं जन्म घे' असा तिनें आपणाला शाप दिला होता. 'काणभूति पिशाचाला तूं ही कथा सांगशील, तेव्हां तूं शापमुक्त होशील' असा उश्शापहि दिला होता. हें सर्व वररुचीला आठवलें. ती बृहत्कथाहि आठवली. त्यानें ती काणभूतीला साद्यंत सांगितली आणि मग शापमुक्तीचा आनंद अनुभवीत आपलें उर्वरित आयुष्य हिमालयांतल्या बदरिकाश्रमांत शांतपणें घालवलें.

---

# सूरदास

संस्कृत साहित्यांत जें स्थान आदिकवि वाल्मीकीचें तेंच स्थान व्रजभाषेंत सूरदासाचें आहे. व्रजभाषेच्या प्रारंभिक कालांत सूरदासानें आपल्या दिव्य प्रतिभेच्या द्वारें सर्वांगपरिपूर्ण आणि सर्वगुणसंपन्न असें काव्य निर्माण केलें आणि व्रजभाषेला महत्त्व प्राप्त करून दिलें. जयदेव, विद्यापति हे त्याच्या पूर्वीचे कवि. त्यांनीं गीतिकाव्याची परंपरा निर्माण केली. सूरदासानेंहि तीच शैली आत्मसात् करून गीति-काव्याला गौरव प्राप्त करून दिलें. सूरदासानें जितकीं गीतिकाव्यें निर्माण केलीं, तितकीं जगांत कोणत्याहि एका व्यक्तीनें रचलीं नसतील. सूरदासाचें बरेंचसें काव्य कीर्तनासाठीं रचलेलें आहे. या दृष्टीनें त्याची महाराष्ट्रांतल्या संत एकनाथमहाराजांशीं तुलना करतां येईल. हीं काव्यें निरनिराळ्या रागरागिण्यांत बसवलेलीं आहेत. त्यावरून सूरदास हा संगीतशास्त्रांतलाहि मोठा जाणकार होता हें कळून येईल. सूरदासानें मुख्यत्वें श्रीकृष्णाचें लीलाचरित्र गाइलें. त्यानें श्रीकृष्णाच्या विविध बाललीला तर वर्णिल्याच; पण त्याचबरोबर राधा-कृष्णांच्या प्रेमालाहि दिव्यत्व प्राप्त करून दिलें. त्याला अध्यात्माच्या भूमिकेवर आरूढ केलें. सूरदास हा पुष्टिमार्गी आणि वल्लभाचार्यांचा शिष्य होता. त्याच्या काव्यामुळें पुष्टिमार्गाला खूपच पुष्टि मिळाली आहे. सूर-सारावली, साहित्यलहरी, सूरसागर, भागवतभाषा, मानलीला, दानलीला इत्यादि पंचवीस काव्यग्रंथ सूरदासाच्या नांवावर आहेत. पुष्टिमार्गी-तल्या अष्टछाप कवींत सूरदासाला असामान्य महत्त्व आहे. सूरदास आणि तुलसीदास हे हिंदी साहित्याच्या आकाशांतले दोन उज्ज्वल तारे होत. दोघेहि प्राचीन-अर्वाचीन हिंदी कवींचे मुकुटमणि आहेत. तुलसीदासानें रामभक्ति वाढविली, तर सूरदासानें कृष्णभक्तीचा प्रसार केला. याच सूरदासाची कथा पुढें दिली आहे—

★ ★ ★

मथुरेहून आग्ऱ्याला जात असतां वाटेंत एक लहानसें गांव लागतें. त्या गांवाचें नांव ‘ रुनकुता ’ असें आहे. हा एका संस्कृत नांवाचा अपभ्रंश आहे. रुनकुता म्हणजे रेणुकाक्षेत्र. गांव लहानसेंच आहे; पण तें यमुना नदीच्या तीरावर वसल्यामुळें त्याला एक स्वाभाविक सौंदर्य आहे. प्रभु रामचंद्राच्याहि पूर्वींच्या कालांत इथें रेणुकेचा आश्रम होता. रेणुकेचा आश्रम म्हटला, कीं तो जमदग्नीचा आश्रम हेंहि ओघानेंच आलें. अर्थात् परशुरामाचें जन्मस्थान हेंच. सहस्रार्जुनानें अचानक आश्रमावर धाड घालून जमदग्नीचा शिरच्छेद केला तो याच ठिकाणीं. तिथले वयोवृद्ध लोक आपल्या गांवाची ही पूर्वपीठिका मोठ्या भक्तिभावानें सांगतात आणि त्याला पुरावा म्हणून तिथलें एक मंदिर दाखवतात.

तें मंदिर जमदग्नीचें आहे. तें एका उंच जागीं बांधलेलें आहे. त्यांत जमदग्नीची पाषाणमूर्ति स्थापलेली आहे. त्या मूर्तीची वेशभूषा, केश-रचना आणि ठाणमाण पाहून, ती मूर्ति प्राचीन असल्याचें जाणते लोक सांगतात. जमदग्नीच्या शेजारीं रेणुका आहे आणि समोर त्याची आवडती नंदिनी धेनु स्वस्थपणें बसली आहे. सभोंवतीं घनदाट वृक्ष आहेत. त्यांवर पक्ष्यांची किलबिल आहे. आणि बाकी सारा निर्जन एकान्त.

याच तपोवनांत आणखी एक वास्तु आहे. वास्तु म्हणजे लहानशी ओवरीवजा एक झोपडी. तिला दाराची चौकट नाहीं. खिडकी किंवा झरोकाहि नाहीं. तिच्यावर कसली कला नाहीं, कीं कुसर नाहीं. आहे बिचारी हीनदीन अन् उपेक्षित. आकाशमाउली जे काय थोडेबहुत मायेचे अश्रू टाकीत असेल, तेवढेंच तिचें सांत्वन. एका काळीं यमुना नदी तिच्याजवळून वहात होती. पण आज तिचा ओघ बदलला आहे. ती त्या झोपडीपासून दूर सरकली आहे. तिला वर्तमान वैभव कसलेंच नाहीं. त्यामुळें भूतकालीन वैभवाच्या स्मृतींची शिदोरी जी कांहीं तिच्याजवळ आहे, तिच्यावरच ती जीव धरून राहिली आहे. आपल्या मूक वाणीनें

ती आपल्या धन्याचें नामस्मरण करीत बसली आहे, असेंहि म्हणा वाटल्यास!

कोण होता तिचा धनी? सांगतों. त्याचें नांव ऐकतांच तुम्हांला त्या झोपडीविषयीं नितांत आदर वाटूं लागेल. तिचा मालक होता संत सूरदास! महाकवि, महान् भगवद्भक्त आणि पुन्हा जन्मांध! सूर्य तळपतो आहे; पण दिसत नाहीं. यमुना खळाळते आहे; पण आढळत नाहीं. माणसें दिसत नाहींत. पशुपक्षी दिसत नाहींत. इतकेंच काय; पण स्वतःचा देह काळा आहे का गोरा आहे तेंहि दिसत नाहीं. दिसतो तो फक्त एक अंधार. खालीं, वर, अवतींभोंवतीं, सगळीकडे काळोखाचा काळाकुट्ट सागर. अशा स्थितींत इ. स. च्या १५४६ च्या सुमारास तो धडपडत, चाचपडत या ठिकाणीं आला. आला तेव्हां वय अवघें अठरा वर्षांचें.

तीन भावांमागचा हा चवथा भाऊ. निपजला तो डोळ्यांच्या भिंती घेऊन. कोणाला त्याचें कौतुक असणार! त्याचा बाप अत्यंत दरिद्री असा ब्राह्मण होता. अशा अठरा विश्वे गरिबींत असल्या अपंग मुलाची आबाळ झाली, तर त्यांत कसलें नवल!

कांहीं विद्वानांचें सांगणें याहून जरा निराळें आहे—सूरदासाला त्याच्या वरचे पांच भाऊ होते. हिंदु-मुसलमानांच्या लढाईंत ते सगळे कामीं आले. त्याच्या बापालाहि शेवटीं बळजबरीनें मुसलमान करण्यांत आलें. सूरदासाच्या बालबुद्धीवर या दुर्घटनेचाहि जबरदस्त परिणाम झाला असेल. कोणत्याहि कारणानें का होईना; पण वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी दिल्लीजवळच्या सिही गांवांतलें आपलें घर त्यानें सोडलें एवढें मात्र खरें.

कसाबसा तीनचार कोस तो चालला. इतक्या लहान वयांत आणि अशा अंधावस्थेंत तो कसा काय इतकी मजल मारून आला असेल, तें देवालाच माहीत! अखेर पोरगें थकलें आणि एका गांवाबाहेरच्या पिंपळाखालीं आणि तळ्याच्या काठीं अंग टाकून पडलें. तळ्यावर येणाऱ्या

आयाबायांनीं त्याची चवकशी केली. पोर आंधळें आहे तसें अनाथहि आहे असें त्यांना समजलें. साहाजिकच लोकांना त्याची दया आली. कुणीं त्याला खाऊं घातलें. कुणीं त्याच्या अंगावर एखादें चिरगुट टाकलें. बसायला पिंपळाचा पार होताच. वरून त्याच वृक्षाची सावलीहि होती. पाणी म्हणजे जीवन! तें तर अगदीं ढेपावरच होतें. मग आणखी काय पाहिजे? सूरदासानें ठरवलें कीं, आतां इथेंच रहायचें.

सकाळ–संध्याकाळ किंबहुना सारा दिवस तो त्या पारावर बसूनच असे. तें बसणें रिकामपणाचें नव्हतें. डोळे निकामी झाल्यामुळें बाहेरचें अफाट विश्व त्याला पारखें झालें होतें. तें बहुरंगी व बहुरूपी विश्व आंत कुठें तरी दिसतें काय, तें पाहण्यासाठीं त्याची धडपड चालू होती. तो त्यासाठीं खूप प्रयत्न करीत होता. त्याला तोच एक नाद लागला होता. कित्येकदा त्याचा तो प्रयत्न सफल झाल्यासारखा वाटे. कांहीं तरी अंतश्चक्षूंपुढें चमकून गेलें, असा त्याला भास होत असे. आणि मग जें चमकून गेलें तें पुन्हा पकडण्यासाठीं तो अधिक प्रयत्न करीत असे. त्यांत त्याचे तासन्तास निघून जात. कधीं त्याला प्रकाश दिसे, तर कधीं त्याच्यापुढें सप्तरंगांचे सागर उचंबळूं लागत. कसले तरी पदार्थ, कसल्या तरी आकृत्या रूप धारण करीत. त्यावरून आपण कांहीं तरी पाहिलें असें त्याला वाटे आणि मग तो देखणेपणाचा आनंद त्याच्या मुद्रेवर पसरे. कित्येकदा तो उचंबळून हसे. कित्येकदा त्याच्या अंगावर रोमांचहि उभे राहत.

असे कांहीं महिने गेले. सूरदासाला हळूहळू आंतली दृष्टि येऊं लागली. डोंगर म्हटलें कीं त्याच्यापुढें तो मूर्तिमंत उभा राही. त्यावरचीं झाडें, त्याचे तुटलेले कडे, तिथला निळा धूसर रंग, सारा सारा तपशील त्याला अगदीं स्वच्छ दिसूं लागे. नदी म्हटली कीं तिचीं वळणें, तिचा खळाळ आणि तीरावरच्या वृक्षवेली, हें सगळें त्याच्यापुढें प्रगट होई. तो पहात असलेली ती आंतली सृष्टि दिव्य होती. तिच्यांतलीं माणसें, गुरेंढोरें,

पशुपक्षी, झाडेंमाडें, घरेंदारें सारेंच कांहीं दिव्य होतें. तिथल्या रंगांच्या दुनियेंत कसला तरी वेगळाच आनंद भरून राहिला होता. आणि याचा जसजसा अधिकाअधिक प्रत्यय येऊं लागला तसतसा सूरदास म्हणूं लागला कीं, 'कोण म्हणतंय मी आंधळा आहें म्हणून !'

त्यानंतर एक दिवस एक गंमत झाली. गांवच्या पाटलाची गाय चुकली. बराच शोध करूनहि ती सांपडेना. पाटलाची नुसती घालमेल सुरू झाली. त्या पिंपळपारावरून जात असतां हें सहा वर्षांचें पोर त्याला दिसलें. सांडलेल्याचें मन दाहीं दिशा शोधतें असें म्हणतात ना; तसें त्या पाटलाचें झालें होतें. त्यानें सहज म्हणून सूरदासाला विचारलें.

"काय रे पोरा, माझी गाय कुठें सांपडेल?"



सूरदास गायीचा पत्ता सांगतो

"तुमची गाय? पहातो हं." असें म्हणून सूरदास आपल्या अंतर्दृष्टीला शरण गेला. त्यानें त्या न पाहिलेल्या गायीवर आपलें चित्त केंद्रित केलें. खूप खोल खोल, खूप दूर दूर, तो पाहूं लागला. पाहतां पाहतां त्याला ती गाय दिसली. ती जिथें चरत होती तो वनप्रदेश दिसला. त्याचा आसमंत दिसला. सर्व कांहीं दिसलें. त्यानें चुटकी वाजवली आणि पाटलाला त्या गायीच्या खाणाखुणांसह ती कुठें आहे, तो भाग नेमका सांगितला. पाटील त्या दिशेनें पळाला आणि काय आश्चर्य! त्याची गाय सूरदासानें सांगितलेल्या तशा आणि त्याच जागीं त्याला सांपडली.

ही वार्ता गांवांत पसरायला कितीसा उशीर लागणार! गांवांतल्या

माणसांची सूरदासाविषयींची भावना तात्काळ बदलली. अनाथ, अपंग पोर असें जें त्यांना वाटत होतें, त्याऐवजीं सूरदास त्यांना दिव्य शक्तीचें बालक वाटूं लागलें. आणि मग सर्व लोक आपापले प्रश्न विचारण्यासाठीं ऊठ पळ त्याच्याकडे धावूं लागले. ही गोष्ट एवढ्यावरच थांबली नाहीं. आजूबाजूच्या गांवांतलीं माणसेंहि त्याच कारणासाठीं त्याच्याकडे येऊं लागलीं. तो पिंपळपार सदैव गजबजलेला राहूं लागला. माणसें येत तीं रिकाम्या हातानें येत नसत. कुणी मिठाई आणीत, कुणी पैसे आणीत. कुणी वस्त्र आणी, कुणी पात्र आणी. गांवच्या लोकांनीं पुढें त्याला तिथंच एक लहानसें घर बांधून दिलें. त्या घरांत नाना प्रकारच्या वस्तू जमल्या. पैशांचाहि ढीग जमला. कित्येक माणसें त्याच्या सेवेसाठीं राबूं लागलीं. एका काळचा अनाथ भणंग पोर; पण तोच आज साऱ्या पंचक्रोशीचा लाल बनला. बारा वर्षें अशीं निघून गेलीं. सूरदासाला अठरावें वर्ष लागलें.

आणि मग एका रात्रीं कां कोण जाणे; त्याची झोंप उडाली. एक नवा अन् निराळाच विचार त्याच्या मनांत उत्पन्न झाला. त्यानें गेल्या एका तपाचें सिंहावलोकन केलें. तें करीत असतांना त्याला बोंचणी सुरू झाली. 'कशासाठीं आपण गृहत्याग केला? गेलीं बारा वर्षें आपण काय केलें? मेवामिठाई खाल्ली. वस्त्रप्रावरणें पांघुरलीं. लोकांच्याकडून 'स्वामीजी' म्हणून घेतलें. खूप घोळका जमवला. लोकांच्याकडून खूप सेवाहि करून घेतली. पण यांत मी माझें कोणतें हित साधलें? ही झोपडी, ह्या वस्तू, हें सोनें-नाणें; ह्या वस्तूंच्या मोहपाशांत मी गुरफटून पडलों. मींच जाळें बनवलें आणि मीच त्यांत अडकलों. पण पदरांत काय पडलें? समाधान काय मिळालें? सगळें भोपळ्याएवढें पूज्य! देव भेटायला हवा होता म्हणून मी घराबाहेर पडलों. बारा वर्षांचा प्रवास केला. पण देवाची तर कुठें झुळूकहि दिसली नाहीं अजून. देवाच्या ऐवजीं देहाची मात्र भक्ति केली. मग कसा भेटेल देव! अन् तो भेटला नाहीं, तर काय उपयोग माझ्या आयुष्याचा!...'

या विचारानें त्याला इतकें पछाडलें कीं, त्याच्या तोंडाची चवच गेली. तें घर आणि तो पैसाअडका त्याला विषवत् वाटूं लागला. त्यानें मनाशीं ठरवलें कीं, आतां इथें रहायचें नाहीं. इथून कुठें तरी दूर निघून जायचें. जनाचा, धनाचा, कशाचाच संपर्क ठेवायचा नाहीं.

या निश्चयासरशीं त्याला बरें वाटलें. उत्तेजनहि मिळालें. तो एका अंधाऱ्या रात्रीं, सारा आसमंत निद्रेंत निमग्न झाला असतांना आपल्या झोपडींतून बाहेर पडला. जातांना काठी आणि लंगोटी यांव्यतिरिक्त कोणतीहि वस्तु त्यानें बरोबर घेतली नाहीं. जें एकदा विषासमान वाटलें, तें त्यानें तसंच जिथल्या तिथें टाकून पुढचा मार्ग सुधारला.

वाट विचारीत, अडखळत, ठेंचाळत त्याचें मार्गक्रमण सुरू झालें. मुखानें हरिनाम आणि काठीची ठकठक. दिवसभर चालायचें अन् रात्रीं कुठें तरी अंगाचें मुटकुळें करून झोंपायचें. सकाळ झाली, पांखरें किलबिलूं लागलीं, कीं पुन्हा प्रवास सुरू. अशा प्रकारें मजल दरमजल करीत, कुणीं कांहीं घातलें तर खात, नाहीं तर उपाशी पोटीं तो एक दिवस रुनकुता गांवांतल्या गौघाटावर येऊन दाखल झाला. जवळूनच पाणी वाहत आहे असें त्याला कळलें. कुणीं तरी त्याला सांगितलें कीं, ही यमुना नदी आहे. यमुनेचें नांव ऐकतांच त्याचा अंतर्यामी एकदम प्रसन्न झाला. यमुना म्हणजे श्रीकृष्णाची बालपणींची प्रिय सखी. हिच्याच काठीं कृष्ण कन्हैयानें आपली मुरली वाजवली. हिच्याच डोहांतल्या कालियाचें मर्दन केलें. हिच्याच काठीं आपलीं गायीवासरें गोठणीला बसवलीं. हिच्याच वाळवंटांत तो गोपगड्यांसह चेंडूफळीचा खेळ खेळला. मग तो मनांत म्हणाला कीं, हिचा लग आतां सोडायचा नाहीं. हीच आपल्याला सावळ्या नंदकुमाराची भेट करवील.

आणि त्या जागीं सूरदासाची भक्तिसाधना सुरू झाली. तो यमुनेचा खळाळ ऐकत कृष्णचिंतनांत निमग्न झाला. त्यानें नामजपाचा धोसरा घेतला. हळूहळू त्याच्या अंतरांत कवित्व जागृत झालें. तो आपल्या आर्त

भावना पद्यांतून व्यक्त करूं लागला. श्रीहरीचा काव्यमय धावा करूं लागला. 'तूं माऊली, मी तुझा तान्हा. तूं गाय, मी वाट चुकलेलं वासरूं. तूं धनी, मी तुझ्या कृपेचें पोसणें.' अशा रीतीनें तो नंदकुमाराची आळवणी करूं लागला. 'तुझे दारींचा कुतरा, नको मोकलूं दातारा' अशी हीनदीन करुणा भाकूं लागला. त्याची भक्ति दिवसेंदिवस पालवूं लागली. त्याच्या वैराग्यानें तर कडच गांठली. त्याला देहाचीहि शुद्धबुद्ध उरली नाहीं. गोघाटावर येणाऱ्या स्त्रीपुरुषांना त्याचीं भक्तीनें ओथंबलेलीं पदें नेहमीं ऐकायला मिळूं लागलीं. सूरदासाचा गळा गोड होता, वाणींत काव्य होतें आणि स्वरांत कारुण्य होतें. त्यामुळें तल्लीन होऊन डोळ्यांतून अश्रूंच्या सरी गळवीत गाइलेलीं तीं पदें लोकांना अत्यंत प्रिय झालीं. तीं ऐकतां ऐकतां लोकांनाहि भक्तिरसाचें प्राशन घडूं लागलें.

भविष्य सांगणारा सूरदास, चुकलेलीं गुरें, चुकलेलीं माणसें यांचा ठावठिकाणा सांगणारा सूरदास, गौघाटाच्या लोकांना ठाऊक नव्हता. सूरदास त्यांना ठाऊक झाला, प्रतीत झाला तो संतकवि म्हणून. तिथेंहि त्याच्या भोंवतीं लोकांचें वर्तुळ जमलें. पण तें व्यावहारिक प्रश्न विचारण्यासाठीं नव्हे; तर प्रेमळ काव्याच्या रसास्वादासाठीं.

सूरदास तिथेंहि बारा वर्षें राहिला. पण हीं बारा वर्षें मागच्या बारा वर्षांपेक्षां किती तरी निराळीं होतीं. तीं उज्ज्वल होतीं आणि भक्तिरसानें न्हालेलीं होतीं. ह्या बारा वर्षांत सूरदास श्रीहरीच्या किती तरी जवळ पोंचला होता. श्रीकृष्णाचें प्रभावलय त्याच्या अंतरांत कितीदा तरी फाकलें होतें. कितीदा तरी त्याला स्वप्नांत दर्शनहि घडलें होतें. त्याचें सुख, त्याचा आनंद, शुक्ल पक्षांतल्या चंद्रासारखा दिवसेंदिवस वाढत होता. पण अजून त्याला खरा साक्षात्कार झाला नव्हता. त्याच्या अंतरांतल्या भक्तीवर अजून अमृताची धार पडली नव्हती. अजून फळ कच्चेंच होतें. त्यासाठीं आणि एकंदरींत सगळ्या जीवनाचें सार्थक होण्यासाठीं एखाद्या सद्गुरूची आवश्यकता होती. सद्गुरु भेटल्यावांचून देव आपला खरा

सोयरा होणार नाहीं, या भावनेनें त्याचें अंतःकरण आतां तळमळत होतें. पण सूरदासाच्या सुदैवानें तोहि शुभयोग बारा वर्षांनंतर एक दिवस जमून आला.

वल्लभाचार्य हे पुष्टिमार्गाचे महान् आचार्य. तसेच शुद्धाद्वैत पंथाचे संस्थापक. महान् संत, महान् भक्त, मोठे तत्त्वज्ञानी. श्रीकृष्ण हें त्यांचें उपास्य दैवत. ते एकदा गोकुळ-वृंदावनाच्या यात्रेला जात असतांना वाटेंत गौघाटावर उतरले. लोकांना त्यांचें नांव परिचित होतें; त्यामुळें त्यांच्या दर्शनासाठीं गौघाटावर माणसांची रीघ लागली. त्यांनीं तिथें भक्तिमार्गावर रसाळ निरूपणें केलीं. तीं ऐकून भाविक जनांना आपले कान धन्य झाले असें वाटलें. अनेकांनीं त्यांचा उपदेशहि घेतला.

वल्लभाचार्यांच्या आगमनाची वार्ता सूरदासालाहि कळली. आचार्यांचें दर्शन घ्यावें असें त्यालाहि वाटलें. सगळ्याच संतांना देवापेक्षांहि संत-संगाचें महत्त्व अधिक वाटतें. आणि वल्लभाचार्य तर भारतांतले विख्यात महापुरुष. म्हणून सूरदास काठी टेकीत टेकीत त्यांच्या पडावाकडे गेला. द्वाराशीं जाऊन उभा राहिला. सेवकांनीं विचारलें, कीं 'काय काम आहे ?' सूरदास म्हणाला.

"मीं आचार्यांच्या दर्शनासाठीं आलों आहें."

"स्वामीजींची भोजनाची वेळ आहे." सेवक म्हणाले.

"भोजन वगैरे सर्व आटोपल्यावर सावकाशपणें मला दर्शन मिळालें तरी चालेल."

सूरदास तिथें बसून राहिला. योग्य वेळीं वल्लभाचार्यांनीं त्याला भेटीला बोलावलें. सूरदास आंत गेला आणि त्यानें आचार्यांना दंडप्रणाम घातला. आचार्यांनीं त्याला उठवलें आणि जवळ बसवलें. त्या आंधळ्या जिवाच्या अंतःकरणांत कृष्णभक्तीनें घर केलें आहे, हें त्यांना समजायला वेळ लागला नाहीं. भक्ति ही प्रकाशमय असते. न सांगतांच ती डोळस माणसाला कळून येते. अश्रूंच्या रूपानें ती पाझरते आणि रोमांचांनीं

ठरते. कोणीं तरी जवळच्याच माणसानें आचार्यांना म्हटलें कीं, ‘सूरदास प्रेमळ कवि आहे आणि त्याचा गळाहि गोड आहे.’ आचार्य तें ऐकून म्हणाले.

“सूरजी, आम्हांला कांहीं ऐकवा कीं.”

‘आज्ञा महाराज’ म्हणून सूरदासानें एक पद सुरू केलें. त्या पदांत तळमळ होती, दैन्य होतें, कारुण्यहि होतें. ‘मी पतित, तूं पतितपावन. तूं धनी, मी तुझ्या दारचा भिकारी. तूं जगाचा नाथ आणि मी अनाथाहूनहि अनाथ. माझा उद्धार कर. मला भवसागरांतून वर काढ.’ अशी कींवकाकुळती त्या पदांत होती. तें ऐकून आचार्य विनोदानें त्याला म्हणाले.

“सूरदास, तुमच्या नांवांत तर सूर्य आहे. सूर्य तळपतो, जगाला ऊब आणि प्रकाश देतो. मग तुमच्या वाणींत अशी लाचारी कां? श्रीहरीला प्रिय व्हायला लाचारीची जरूर नसते. तुम्हीं कृष्णकन्हैयाची एखादी बाललीला गा.”

“महाराज, मी पडलों जन्मांध. कांहीं वाचलं नाहीं, कांहीं ऐकायलाहि मिळालं नाहीं. कुणी गुरूहि भेटला नाहीं अजून. त्यामुळें मला भगवंताच्या लीला माहीत नाहीत.” सूरदास हात जोडून नम्रपणें म्हणाला.

“माझा संप्रदाय स्वीकारीत असाल, तर मी सांगेन तुम्हांला सगळं.”

“तसं झालं, तर माझ्यावर फार मोठा अनुग्रह होईल. त्यासाठींच आजवर माझा जीव तगमगतो आहे.”

मग वल्लभाचार्यांनीं सूरदासाला आपल्या पुष्टिमार्गाची दीक्षा दिली. त्या दीक्षेंत नाम आणि समर्पण असे दोन विधि होते. ‘श्रीकृष्णः शरणं मम’ हें अष्टाक्षर नाम आचार्यांनीं सूरदासाच्या कानांत तीन वार सांगितलें. मग ‘देह, इंद्रियें, मन, इहलोक, परलोक, आत्मा, इत्यादि सर्वस्व आज मी श्रीकृष्णाला समर्पण करीत आहें आणि अशा रीतीनें सर्व भावें देवाचा दास बनत आहे,’ असें त्याच्याकडून म्हणवून घेतलें.

अशा रीतीनें सूरदास वल्लभ संप्रदायांत दाखल झाला. मग भागवताच्या दशमस्कंधांत व्यासांनीं वर्णिलेल्या भगवंताच्या लीला त्यांनीं सूरदासाला समजावून सांगितल्या.



सूरदास कृष्णाच्या बाललीला पहातो

सूरदासाच्या जीवनांत एक नवें आनंदाचें पर्व सुरू झालें. त्याच्या रसवंतीला पूर आला. श्रीकृष्णाच्या बाललीलांत तो तन्मय होऊं लागला. तो जणूं स्वतःच वृंदावनांत आणि यमुनेच्या वाळवंटांत कृष्ण-सख्याबरोबर खेळूं लागला. कृष्णाचें मुरलीवादन, कालियामर्दन, चेंडूफळी, गोपींच्या खोड्या, यशोदेचें रागावणें, दह्या-दुधाची चोरी, या आणि अशाच अनेक कृष्णाच्या बालक्रीडांवर त्यानें हजारों पदें रचलीं आणि गाइलीं. तीं गातांना स्वतःहि सुख भोगलें आणि इतरांनाहि भोगायला दिलें. 'सेवितों हा रस वांटितों आणीकां' असें केलें. त्याच्या वाणींत आतां दैन्य राहिलें नाहीं. ती वाणी आतां प्रेमामृतानें सरस झाली, श्रीमंत झाली.

वल्लभाचार्य तिथून थोड्याच दिवसांत गोकुळ-वृंदावनाला गेले. तिथून गोवर्धन पर्वतावर गेले. जातांना त्यांनीं सूरदासालाहि बरोबर घेतलें. सूरदासावर आतां त्यांचें विलक्षण प्रेम जडलें. त्यांनीं गोवर्धन येथील श्रीनाथाच्या मंदिरांत नेऊन सूरदासाला देवाचें दर्शन घडवलें. सूरदासानें तें दर्शन आपल्या अंतश्चक्षूंनीं घेतलें. त्याची काया पुलकित झाली. डोळ्यांतून अश्रुगंगा सुरू झाल्या. अंतरांत अष्टसात्त्विक भाव दाटून आले.

29034 ८०३

वल्लभाचार्यांनीं त्याची ती अवस्था पाहिली. त्यांची खात्री झाली कीं, सूरदासाच्या अंतरांत श्रीहरि प्रगटला. त्यांनीं मग त्याला सांगितलें.

" सूरदास, आतां तूं इथेंच रहा. भजनकीर्तनाच्या द्वारें श्रीनाथाची सेवा करून या ठिकाणीं भक्तिप्रेमाचा सुकाळ कर. यापुढें तूं भाविकांना भक्तीच्या मार्गाला लाव. तुझ्याबरोबरच इतरांचेंहि जीवन धन्य कर. "

सूरदासानें ती गुरूची आज्ञा मानली. गोवर्धनाजवळच्या परसौली गांवांत चंद्र सरोवराच्या कांठीं झोपडी बांधून तो राहिला. तिथें राहून त्यानें श्रीनाथाची कीर्तनसेवा चालवली. वल्लभाचार्यांचे पुत्र विठ्ठलनाथ हेहि पुष्टि-मार्गीच होते. आपल्या संप्रदायांत त्यांनींहि मोठा अधिकार संपादन केला होता. पित्याला शोभण्याजोगे ते सुपुत्र होते. त्यांनीं श्रीनाथाच्या भजन-पूजनांत नवी सुधारणा केली. अष्टौप्रहर श्रीनाथांची सेवा चालावी, अशी योजना आंखली. प्रत्येक प्रहराला एक कीर्तनकार अशा रीतीनें आठ शिष्यांना नित्याचे सेवेकरी म्हणून नेमले. हे आठहि जण कवि होते, तसेच परमभक्तहि होते. परमानंद दास, कुंभनदास, कृष्णदास, छितस्वामी, गोविंदस्वामी, चतुर्भुजदास, आणि नंददास असे सात जण आणि आठवा किंवा पहिला सूरदास. ह्या आठ कवींना 'अष्टछाप कवि' असें म्हणतात. 'श्रृंगार, भोग, आणि राग या तीन भावनांना पोषक होतील, असे देवाचे पूजोपचार ठरवण्यांत आले. ह्यांतला रागात्मक भक्तीचा म्हणजेच प्रेम-स्वरूप भक्तीचा आचार्य म्हणजे सूरदास. त्याच्या भक्तीला बरवें कवित्व प्राप्त झालें होतें. आणि कवित्वाला संगीताची जोड लाभली होती. सूरदास ह्या त्रिविध संगीतांत आचार्य पदवीला पोंचला होता.

'चौरासी वार्ता' या ग्रंथांत सूरदास आणि दिल्लीपति अकबर यांची भेट झाल्याचा उल्लेख आढळतो. त्या कालांत सूरदासाचीं पदें अत्यंत लोकप्रिय झालीं होतीं. त्यांतलें एक पद तानसेन या महाविख्यात गायकानें अकबराच्या दरबारांत गाऊन दाखविलें. तें पद अत्यंत प्रेमळ होतें आणि तानसेनाच्या स्वर्गीय कंठांतून तें बाहेर निघाल्यामुळें त्याला

विलक्षण सामर्थ्य प्राप्त झालें होतें. अकबर तें ऐकून परम संतोष पावला. त्याला वाटलें कीं, ह्या कवीची भेट घेतलीच पाहिजे. अकबर धर्मपिसा नव्हता. त्यामुळें हिंदी कवी आणि संत यांच्याविषयीं तो आदर बाळगीत असे. त्याला गुणांची चहा होती. त्यानें सूरदासाला बोलावण्यासाठीं परसौली येथें आपले दूत पाठवले. त्या वेळीं सूरदास मथुरेला होता. मग त्यानें मथुरेला दूत धाडले. पण सूरदासाला दिल्लीश्वराशीं कांहीं कर्तव्य नव्हतेंच. त्याला कांहीं मागायचें नव्हतें किंवा मिळवायचें नव्हतें. तो कशाला जाईल दिल्लीला! शेवटीं अकबरालाच सूरदासाकडे जावें लागलें. दोघांची भेट झाली. अकबर म्हणाला.

" सूरदासजी, आम्हांला एखादं पद ऐकवा. "

सूररदासानें आपली एकतारी उचलली आणि तिच्या स्वरांत आपला सूर मिसळून एक पद सुरू केलें. ' मनरे तू कर माधौ सो प्रीत ' अशा आकड कडव्याचें तें गाणं होतें. गातां गातां सूरदास तर तन्मय झालाच; पण अकबर बादशहाहि त्या स्वरांवर तरंगूं लागला. त्याचें देहभान हरपलें. अर्थ हृदयांत शिरला. भाव डोळ्यांतून प्रगटला. सूरदासाचें पद संपलें तेव्हां ' वाह ! बहोत खाशी ' असे धालेपणाचे उद्गार काढायचेहि तो विसरला. कांहीं क्षण असे गेल्यावर मग त्याला कळलें, कीं पद संपलें आहे आणि एकतारी बंद झाली आहे. सूरदासाच्या कृष्णस्तवनानें प्रसन्न झालेला अकबर बादशहा त्याला म्हणाला.

" कविराज, आतां एखादं गाणं आमच्यावर म्हणा कीं. एखादी आमच्या पराक्रमाची, आमच्या यशकीर्तीची, चीज गाऊन आम्हांला संतुष्ट करा. "

सूरदास नुसता हसला. बादशहाचा हेतु त्यानें जाणला. आपल्या स्तुतीचें गाणें ऐकून बादशहाची छाती रुंदावणार होती. डोळे फुलणार होते. आणि त्या प्रसन्नतेच्या भरांत तो सूरदासाला अपार धन देणार होता. अकबराच्या दृष्टीनें ही सूरदासाच्या भाग्याची शुभ घटिका होती.

पण सूरदासाला धन, मान, लौकिक सारें कांहीं तुच्छ झालें होतें. या सगळयाच्या पलीकडचें आणि सर्वश्रेष्ठ असें हरिकृपेचें दिव्य वैभव तो केव्हांच मिळवून बसला होता. त्यानें एक स्वयंस्फूर्त पद तावडतोब म्हटलें आणि त्या द्वारें अकबर बादशहाचा अपमान न होईल अशा पद्धतीनें आपलें मन त्याला कळवलें. तो म्हणाला.

"बादशहा, माझ्या हृद्यांत आणि वाणींत आतां श्यामसुंदर कृष्णावांचून अन्य कोणाला थाराच नाहीं. माझं जीवन अंतर्बाह्य हरिमय झालं आहे. माणसाची स्तुतिस्तोत्रं आणि विजयगीतं गायच्या वेळीं माझी रसना आपोआप मुकी होते. आणखी काय सांगूं महाराज..."



सूरदास आणि अकबर

अकबर तेवढ्यानेंच काय समजायचें तें समजला. ज्यानें सर्वसंगपरित्याग केला, ज्याच्या अंतरांतले तृष्णा आणि लोभ मावळले, त्याला

सम्राट् काय अन् बादशहा काय! तो कशाला कोणाची पर्वा करील! त्याचा बादशहा तोच. अशा महाभागांच्या वाटेला कोणीं जाऊं नये हेंच बरें. अकबरानें तो विषय तेवढ्यावरच सोडला आणि ती भेट समाप्त केली.

सूरदास आयुष्याच्या अखेरीपर्यंत परसौलीलाच राहिला. तो सदैव भक्तीच्या आनंदांत निमग्न असे. त्यानें आमरण श्रीनाथाची सेवा केली. अनेक पदें रचलीं आणि गायिलीं. त्याच्या काव्यांत कृष्णप्रेम तर होतेंच; पण त्याशिवाय सामान्य जनांना मार्गदर्शनहि होतें. हा अंध कवि एकतारी खांद्यावर घेऊन कीर्तनाला उभा राहिला, कीं तें संगीत आणि तें भक्तिरसानें ओथंबलेलें निरूपण ऐकण्यासाठीं हजारों श्रोते तिथें जमा होत. सूरदासाचें कीर्तन ऐकल्यावर श्रोत्यांना आपलें हृदय समृद्ध आणि संपन्न झाल्यासारखें वाटे.

अखेर सूरदास वृद्ध झाला. हळूहळू थकत चालला. परसौलींतून श्रीनाथाच्या देवळाकडे जातांना, तो गोवर्धन पर्वत चढतांना, त्याला कष्ट होऊं लागले. पायांना देहाचा भार झेपेना. हातांनाहि कंप सुटला. सगळीं गात्रें शिथिल झालीं. देहांत कांहीं राम उरला नाहीं. मग एक दिवस त्यानें ठरवलें, कीं आज आपण इहलोकींची यात्रा संपवायची. हें खोकर अन् जर्जर शरीर श्रीकृष्णचरणीं समर्पून त्याचा संबंध तोडायचा. श्रीहरीच्या निर्गुण, निराकाराच्या सागरांत आपल्या चैतन्यमय आत्म्याचें विसर्जन करायचें.

त्यानें श्रीनाथाची शेवटची मंगलारती केली आणि तो परसौलीला आला. अंगणांत उभें राहून त्यानें नाथजीच्या मंदिरावरच्या ध्वजाचें शेवटचें दर्शन घेतलें. एकवार त्या ध्वजाला साष्टांग प्रणिपात केला. प्रेमाश्रू घळघळ वाहवून श्रीहरीची करुणा भाकली. त्याच्या घरच्यापुढें एक चौथरा होता. सूरदास त्या चौथऱ्यावर बसला आणि बसवेनासें झाल्यावर तिथेंच आडवा पडला. पडल्या पडल्या त्यानें अखेरचें ध्यान लावलें.

त्याच वेळीं नाथजींच्या मंदिरांत श्रीनाथाला शृंगारभोग चालले होते. वल्लभाचार्यांचे पुत्र श्रीविठ्ठलनाथ त्या वेळीं तिथें आले. पाहतात तों सूरदास तिथें उपस्थित नाहीं. श्रीनाथाच्या शृंगारसमयीं सभामंडपांत उभें राहून कीर्तन करायचें हा सूरदासाचा नित्य नेम; पण आज तो ढळला होता. सूरदासाविना सुनें असलेलें तें मंदिर पाहून विठ्ठलनाथांच्या मनांत अशुभाची शंका आली. त्यांनी तिथल्या सेवेकऱ्याला विचारलें. ते म्हणाले.

"सूरदासजी आज प्रातःकाळची आरती करून खालीं निघून गेले. आज त्यांची प्रकृति बरी दिसली नाहीं. जातांना ते आमच्याशीं बोलले ती भाषा निरोपाची होती, निरवानिरवीची होती."

विठ्ठलनाथांचा संशय दृढ झाला. त्यांनीं तिथल्या समस्त वैष्णवांना सांगितलें.

"चला, सारे जण सूरदासाच्या अखेरच्या दर्शनाला चला. सूरदास हें पुष्टिमार्गाचं जहाज आहे. तें आज पैलतीराच्या बंदराला लागणार आहे."

त्या आज्ञेनुसार भक्तमंडळी सूरदासाच्या अखेरच्या दर्शनासाठीं परसौलीला आली. पाठोपाठ विठ्ठलनाथहि आले. त्यांनीं सूरदासाच्या हातापायांना स्पर्श करून पाहिलें. ते गार पडत चालले होते. त्यांच्या नाड्या आंखडत चालल्या होत्या. त्यांनीं सूरदासाचा हात आपल्या हातीं घेऊन विचारलें.

"कशी काय प्रकृति आहे?"

सूरदासाच्या मुखांतून क्षीण असा आवाज आला.

"प्रकृति उत्तम आहे. प्रभूच्या मंगलधामाला जाण्याची शुभ घटिका प्राप्त झाली आहे... या घडीला तुम्ही आलांत. आनंद झाला." आणि एकदम सूरदासाची आत्मज्योत प्रज्वलित झाली. त्यांच्या मुखावर प्रसन्न कांति विलसूं लागली. त्या प्रसन्न अवस्थेंत त्यांना पद्यरचनेची स्फूर्ति झाली. ते गाऊं लागले—

" खंजन नैन रूप-रस माते।
अतिसै चारु चपल अनियारे,
पल पिंजरा न समाते॥
चलि-चलि जात निकट स्रवनन के,
उलटि-पलटि ताटंक फँदाते।
'सूरदास' अंजन-गुन अटके,
नतऊ अबहिं उडि जाते॥"

सूरदासाचें गाणें संपलें आणि त्याच क्षणीं सारें कांहीं संपलें. सूरदास शांत झाला. सभोंवतींचे वैष्णवजन म्हणाले.

" असा जन्म आणि असा मृत्युहि दुर्लभ!"



# नरसी भगत

" वैष्णव जन तो तेने कहिये " अशा आरंभाचें एक पद म. गांधींचें अत्यंत आवडतें होतें. आपल्या नित्य प्रार्थनेंत त्याचा समावेश करून त्यांनीं तें भारतभर लोकप्रिय केलें होतें. ह्या पदाचा कर्ता नरसी मेहता हा आहे. हा मीराबाईच्या समकालीं १५ व्या शतकांत सौराष्ट्रामध्यें जन्मला. याचें घराणें शिवोपासक ; पण ह्याला मात्र बाळपणापासूनच कृष्णभक्तीची गोडी लागली. भक्तीच्या राज्यांत जातिभेदाला स्थान नाहीं, असें महाराष्ट्रांतल्या संतमंडळीप्रमाणेंच तोहि आग्रहानें प्रतिपादी. शृंगार आणि भक्ति ह्या दोन्ही रसांवर त्याची पद्यरचना आहे. त्याच्या शृंगाराचें पर्यवसानहि शेवटीं भक्तींतच झालें आहे. तो रासक्रीडेचा मोठा भोक्ता होता. आपलीं पदें रासनृत्याच्या प्रसंगीं स्त्री-पुरुष भक्तां-कडून गाववून घेण्यांत त्याला मोठी धन्यता वाटे. त्याची भाषा प्रसाद-पूर्ण आहे. तो तत्त्वज्ञानहि सोप्या आणि सुबोध भाषेंत सांगतो. भक्ति-कालीन गुर्जर कवींत नरसी हा सर्वोच्च आहे. ह्याच्या चरित्रासंबंधीं किती तरी अद्भुत आख्यायिका गुजरात-काठेवाडांत प्रचलित आहेत. त्याची हुंडी खुद्द द्वारकाधीशानें वटवली, या प्रसंगावर तर त्यानें स्वतःच एक आख्यान रचलें आहे. त्याचीच कथा पुढें देत आहें—

★ ★ ★

मध्याह्नीची वेळ होती. बाहेर ऊन रणरणत होतें. समुद्राचें वाळवंट तापलें होतें. वृक्षांच्या छाया मुळांत येऊन आंग चोरून बसल्या होत्या. घरोघरीं जेवायची तयारी चालू झाली होती. मेहत्याच्या घरांतहि पाट-पाणी घेतलें जात होतें. घरांतली गृहिणी पाकसिद्धि पूर्ण करीत होती. जेवणार मंडळी हळूहळू हातपाय धुऊन घरांत येऊं लागली होती.

एवढ्यांत आठ-दहा वर्षांचा नरसी कुठून तरी धांवत ओटीवर आला.

तो हातपाय न धुतां तसाच घरांत शिरला आणि वरच्या गृहिणीला म्हणाला. ' वहिनी, वहिनी, लौकर जेवायला वाढ. '

" अस्सं ! एवढी भूक लागली का ? अगदीं वखवखून गेलां असाल ! कसले एवढे डोंगर पालथे घालून आलांत ? " वहिनीनें कपाळावर आठ्या चढवून आणि नरसीकडे एक तिरस्काराचा कटाक्ष टाकून विचारलें.

" अग वहिनी, मी जरा खेळायला गेलों होतों. शेजारचीं मुलं जमलीं अन् त्यांनीं मला ओढूनच नेलं बघ. "

" तर तर ; तुला जसं काहीं खेळायला नकोच असेल ? सदान्कदा मेलं खेळणं अन् हुंदडणं. शाळेला जात नाहींस तो नाहींच. विद्येच्या नांवानं भोपळा. म्हटलं घरांत तरी रहाशील अन् मला जरा मदत करशील. पण कुस्कुटालासुद्धा उपयोग नाहीं तुझा. कसं जेवायला वाढायचं तुला ? अन् मी म्हणतें, कां म्हणून वाढायचं ? घरांतलीं सगळीं माणसं आंत आणि बाहेर दिवसभर राबायला जातात अन् तूं तेवढा अन्नाला काळ ! दिवसभर बाहेर अन् गिळायच्या वेळीं तेवढा नेमका हजर. जा चालता हो घरांतून. आज तुला मी मुळींच जेवायला वाढायची नाहीं. ! असलं दिवटं पोरगं उलथून तरी कां जात नाहीं देव जाणे !..."

नरसी लहान होता तरी कोडगा नव्हता. त्याला मानापमान कळत होते. भावजयीचे हे विषारी वाग्बाण त्याच्या उरीं खोचले. तो तसाच घरांतून बाहेर पडला. उन्हांतून आला तसाच उन्हांतून परत चालूं लागला. उन्हानें त्याचें चिमुकलें तोंड जणूं जास्वंदीचें फूल बनलें होतें. वरून सूर्यनारायण तापत होता. खालून धूळ चटके देत होती. पण नरसीला आलेली चीड त्या ऊष्म तापापेक्षांहि अधिक प्रखर होती. तो गांवांतून बाहेर पडला. तिथून पुढच्या रस्त्याला लागला. कुठें जायचें हें त्यानें ठरवलें नव्हतें ; कारण आजवर आपल्या गांवापलीकडचें जग त्यानें कधीं पाहिलेंच नव्हतें ; तरीहि तो वाट फुटली तिकडे चालूं लागला. पोटांत अन्नाचा कण नाहीं, जीव भुकेनें व्याकुळलेला आणि तशांत अपमानाची आग ! •

पुढें त्याला एक रान लागलें. रानांत शिरल्यामुळें त्याला आधीं सावली मिळाली. आईबापावेगळें पोर! भावांनीं उपेक्षिलेलें आणि भावजयीनें घरांतून हाकललेलें. आतां त्याची दया तिथल्या वृक्षांना आणि पाषाणांना. रान लागल्यावर वाट संपली; पण त्यानें आपलें चालणें मात्र थांबवलें नाहीं. त्याच्या मनांत या वेळीं भीतीला थाराच नव्हता. त्याला आपलें दुःख कुठें तरी मोकलायचें होतें. हृदयाला जाळणारा अपमान कोणापुढें तरी प्रकट करायचा होता.

जातां जातां त्याला त्याच रानांत एक देऊळ दिसलें. त्याच्या जवळूनच एक ओढा वाहत होता. त्याचें पाणी निर्मळ होतें, थंडगार होतें. नरसी ओंजळी भरभरून तें पाणी प्याला अन् ताजातवाना झाला. त्याच पाण्याचे त्यानें आपल्या तोंडावर हपके मारले. आंतबाहेर सगळें थंड करून घेतलें आणि मग तो हळूहळू रखडत रखडत त्या मंदिरांत गेला.

मंदिर लहानसेंच होतें. आंत काळोख दाटला होता. नरसीला प्रथम कांहीं दिसेचना. थोडा वेळ डोळे ताणल्यावर मग त्याला गाभाऱ्यांतलें शिवलिंग दिसलें. मार्कंडेयासारखी त्यानें त्या शिवलिंगाला मिठी मारली. तो देवाला म्हणाला.

"विश्वनाथा, मला कोणीहि अपंगिता नाहीं. मी अनाथ आहें. तूंच आतां माझा मायबाप!"

नरसीनें त्या देवळांतच स्वतःला आसरा घेतला. देवासमोर बसून तो त्याची सारखी आळवणी करूं लागला. भूक लागली कीं ओढ्यावर जाऊन घटाघटा पाणी घोटायचें आणि पुन्हा येऊन देवासमोर आसन घालायचें. झोप येईपर्यंत देवाची प्रार्थना करायची आणि पेंग आल्यावर बसल्या जागींच आडवें व्हायचें.

अशा रीतीनें सात दिवस गेले. ह्या सप्ताहांत झोपेचा वेळ सोडला तर त्यानें शिवाच्या प्रार्थनेशिवाय दुसरें कांहींहि केलें नाहीं. 'तारक मारक

तूंच ' म्हणून ध्रुवाच्या निष्ठेनें तो त्या देवळांत बसून राहिला. सात दिवसांनंतर भोळया सांबाला राहवलें नाहीं. त्यानें नरसीला साक्षात् दर्शन दिलें. दशभुज आणि पंचानन ह्या स्वरूपांत त्याला पाहिल्यावर नरसीला समजलें, कीं हा प्रत्यक्ष शिवशंकर आहे. त्यानें लगबगीनें उठून शिवाचे पाय धरले. शिवानें त्याला उठवुन हृदयाशीं कवटाळलें. शिव त्याला म्हणाला.

" माझ्या लाडक्या भक्ता, तुला काय हवं तें माग. जें तुझं आवडतं असेल, तें माझ्याकडून मागून घे. "

" मी काय मागूं ? मी तर बोलूनचालून अज्ञान बालक आहें. आवडतं अन् नावडतं हें मला अजून कांहींच कळत नाहीं. तेव्हां देवा, तुम्हांला जें आवडतं असेल तेंच तुम्ही मला द्या. " नरसी धिटाई करून बोलला.

शिव हसला. तो मनांत म्हणाला, ' मुलगा दिसतो बावळा ; पण आहे मोठा चतुर. म्हणे तुम्हांला आवडतं तें मला द्या. ' मग त्यानें नरसीचें मुख कुरवाळलें अन् त्याला म्हटलें.

" मला गोपाल कृष्ण आवडतो. त्याचं लीलाचरित्र आवडतं. त्याची वृंदावनांतली रासक्रीडा आवडते. त्याचं सगळंच कांहीं आवडतं. "

" मग देवा, तेंच मला द्या. "

शिवानें ' तथास्तु ' म्हटलें. मग त्याचा हात धरून तो त्याला बोलला.

" चल, आपण यमुनेच्या तीरावर वृंदावनांत जाऊं. तिथें श्रीकृष्णाची रासक्रीडा चालली आहे ती पाहूं. "

नरसी म्हणाला, " चला. "

शिवानें त्याला डोळे मिटायला सांगितलें. एक क्षण नरसीनें डोळे मिटून लगेच उघडले. पहातो तों, समोर वृंदावन उभें. त्याला लागून यमुना वहाते. तिथें गोपींचा थाट मांडला आहे. नानापरीचे वस्त्रालंकार लेवून भावभोळया गौळणी बालमुकुंदाच्या भोवतीं जमा झाले आहेत. त्यांच्या घोळक्यांत कदंब वृक्षाच्या मुळाशीं देहुडा चरणीं उभा राहून कृष्ण

कन्हैया मुरली वाजवीत आहे. त्या मुरलीच्या मनमोहक स्वरांनीं जणूं उरल्यासुरल्या गौळणींना साद घालून रासमंडळांत फेर धरायला बोलावीत आहे.




वृंदावनांतली रासक्रीडा

त्या नादाला भुलून आणखीहि गौळणी आल्या. कृष्णाला मध्यें घेऊन त्यांनीं फेर धरला. लयींत पावलें टाकीत त्यांनीं रासनृत्य सुरू केलें. कृष्णानें त्यांच्या गाण्याला मुरलीची साथ दिली. सप्तलोकांतला आनंद तिथें अवतरला. त्या गौळणी कृष्णाचें रूपडें पहातां पहातां कृष्णमय झाल्या.

किती तरी वेळ तो रासोत्सव चालला. शिवाच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. नरसी हर्षानें उचंबळला आणि जिथल्या तिथें टाळ्या वाजवून नाचूं लागला.

एवढ्यांत कृष्ण कन्हैयानें शिवाला नेत्रसंकेत केला. 'हा कोण नवा पाहुणा आज बरोबर आणलात?' शिवानें सांगितलें. 'हा माझा आवडता भक्त आहे. मला आवडतं तें त्याला हवं म्हणून मी त्याला आज इथें घेऊन आलों.' लगेच श्रीहरि थोडा पुढें आला. त्यानें नरसीला कृपादृष्टीनें पाहिलें. मग आपल्या सावळ्या हृदयाशीं घट्ट धरलें. त्याच्या मस्तकीं वरदहस्त ठेवून श्रीकृष्ण त्याला म्हणाला.

"नरसी, आज तूं माझा रासोत्सव पाहिलास. या उत्सवावर, या सगळ्या दिव्य प्रसंगावर, तूं काव्य कर आणि सानथोर जनांना माझ्या भक्तीची गोडी लाव. तुला यापुढें वृंदावनांत येण्याचें कारण नाहीं. तूं जिथें बसशील अन् असशील तिथें माझीं सगुण चरित्रं तुझ्या दिव्यदृष्टीला साक्षात् दिसतील.

नरसीला मिळालेल्या ह्या वरानें तो तर संतुष्ट झालाच; पण शिवालाहि कृतार्थता वाटली. त्यानें परत नरसीला त्या शिवमंदिरांत आणून बसवलें आणि तो गुप्त झाला. आतां नरसीला कशाची आकांक्षा नव्हती. तो अंतरीं तृप्त झाला होता. तिथेंच त्याला कवित्वस्फूर्ति झाली. त्याला जें बोलावेंसें वाटत होतें, तेंच छंदोमय रूपानें प्रगट होऊं लागल. तो आपल्याच कविता गाऊं लागला. गातां गातां नाचूं लागला. आणि नाचतां नाचतां देहभानहि विसरूं लागला.

कांहीं गुराखी त्या रानांत आपलीं गुरें चारायला घेऊन आले होते. त्यांनीं नरसीला पाहिलें आणि ओळखलें. त्याचीं पदें ऐकून तेहि तन्मय झाले. गांवांत आल्यावर त्यांनीं नरसीच्या भावाला त्याची हकीगत सांगितली. पोर कुठें तरी बेपत्ता झालें आहे, म्हणून ती मंडळीहि काळजींतच होती. त्यांनीं आजूबाजूला शोध करायला माणसेंहि धाडलीं

होतीं. गुराख्यांनीं त्याचा ठावठिकाणा सांगितल्यावर नरसीचा भाऊ तिथें गेला आणि त्याला त्यानें बाबापुता करून घरीं आणलें.

आतां नरसीची वृत्ति बदलली होती. तो मानापमान विसरला होता. त्याच्या मुखावर सदैव आनंद खेळत होता. हरिकीर्तन हाच एकमेव छंद त्याला जडला होता. आणि कोणाचीहि लाजभीड न बाळगतां तो श्रीहरीचें गुणसंकीर्तन करीत दिवस घालवूं लागला.

होतां होतां त्याचें बालवय ओसरलें. त्यानें तारुण्यांत पदार्पण केलें आणि अशा स्थितींत एके दिवशीं कृष्णभट्ट नांवाचा एक ब्राह्मण त्याच्या घरीं आला. जुनागडाजवळच शामपूर नांवाचें एक गांव होतें. तिथें एक सावकार होता. कृष्णभट्ट हा त्या सावकाराचा पुरोहित. सावकाराच्या उपवर मुलीला स्थळ शोधण्याच्या मोहिमेवर तो निघाला होता. त्यानें येऊन नरसीच्या थोरल्या भावाला सांगितलें.

"आमच्या सावकाराची एक मुलगी आहे. जशी रूपवती तशीच गुणवतीहि आहे. स्वभावानें प्रेमळ आहे. ती मुलगी तुमच्या नरसीला तुम्हीं करून घ्यावी, या उद्देशानें आमच्या यजमानांनीं मला इथें पाठवलें आहे."

नरसीच्या भावाला आश्चर्य वाटलें अन् बरेंहि वाटलें. कारण ह्या लग्नानें एका मोठ्या सावकाराशीं त्याचा सोयरीकसंबंध जुळणार होता. त्याच्याकडून मोठें घबाडहि मिळणार होतें. त्यानें लगेच त्या गोष्टीला मान्यता दिली. वधूवरांचें घाटितहि उत्तम जमलें.

कृष्णभट्टानें लगेच त्याच्या संमतीनें लग्नाचा तिथिनिश्चय केला आणि तो परत शामपुरला गेला.

पण त्यानें ठरवलेली सोयरीक ऐकून सावकाराच्या घरांतल्या मंडळींनीं मात्र कृष्णभट्टाला डोक्यावर घेतलें.

"असला कसला मुलगा पाहिलात? गातो काय, नाचतो काय वेडपटच आहे मेला! या असल्या ध्यानाच्या गळयांत तुम्ही आमच

सोन्यासारखी मुलगी बांधणार म्हणजे कावळयाच्या गळयांत माणिक बांधल्यासारखाच प्रकार. तें ध्यान नको ग बाई आमच्या मुलीला!..."

कृष्णभट्ट चिडला. तो म्हणाला.

"तुम्हीं मला सर्व अधिकार देऊन पाठवलंत, म्हणून मीं हें लग्न ठरवलं आहे. मीं आंधळेपणानें कोणतीहि गोष्ट केली नाहीं. माझ्या मतें तो मुलगा सुलक्षणी आहे. तुम्हांला पटत नसेल, तर आधीं तुम्ही आपला शब्द मागें घ्या."

पण सावकार मोठा शहाणा होता. त्यालाहि नरसी पसंत पडला नव्हता. त्यानें तें लग्न मोडायचें ठरवलें. पण युक्ति अशी केली कीं, आपल्यावर अपवाद येऊं नये. म्हणून त्यानें नरसीच्या थोरल्या भावाला कृष्णभट्टाकरवींच पुन्हा निरोप पाठवला.

"आम्ही नामांकित गृहस्थ आहोंत. आमचं घराणं मातब्बर आहे. अशा स्थितींत आमची तुमच्याशीं सोयरिक जमली आहे. तरी जनांत आमचं हसं होणार नाहीं, अशा ऐपतीनें आणि सरंजामानें तुम्हीं उदयीक नवरामुलगा घेऊन लग्नाला यावें. तुमच्या वऱ्हाडाबरोबर हत्ती, घोडे, रथ, पालख्या, वाद्यं असा सगळा लवाजमा असावा. वधूला वस्त्रालंकार भरपूर आणावे. सगळया गांवाला गांवजेवण घालण्याची तयारी असावी. आणि ह्या गोष्टी जर तुमच्या हस्तकीं घडणार नसतील, तर ठरलेलं लग्न मोडलं असं समजावं."

कृष्णभट्ट तो खलिता घेऊन नरसीच्या भावाकडे आला. पण तोहि महाधूर्त होता. त्यानें सावकाराचें तें पत्र नरसीच्या भावाच्या हातीं न देतां त्याला सांगितलें कीं, "उद्यीक वऱ्हाड घेऊन लग्नाला चलावें."

दुसऱ्या दिवशीं सकाळ उजाडली. नरसीनें मंगलस्नान करून श्रीकृष्णाची पूजा केली. गळयांत तुळशीची माळ घातली. अंगावर गोपीचंदनाचे बारा टिळे रेखले. बस्स, झाला नवऱ्यामुलाचा पोशाख. बरोबर आपल्यासारखेच कांहीं टाळकरीहि घेतले. टाळ, मृदंग आणि वीणा

यांच्या गजरांत हें वऱ्हाड शामपुराकडे चालूं लागलें. हत्ती, घोडे काल्पनिक. द्रव्य आणि दागिने मानसिक. सगळेंच न्यून आणि तें परत करणारा भगवान् श्रीहरि !

त्या वऱ्हाडाला सगळेच लोक हसले. हसला नाहीं तो फक्त एकटा द्वारकेचा राणा श्रीकृष्ण. त्याला वाटलें कीं, आज आपल्या भक्ताची लाज जाणार. आणि भक्ताची लाज गेली तर देवाची तरी काय उरली !




नरसी मेहत्याच्या लग्नाचें वऱ्हाड

त्यासाठीं कृष्ण द्वारकेंत तयारीला लागला. त्यानें लहानथोर भक्तमंडळी गोळा केली. रुक्मिणी, सत्यभामा इत्यादि स्त्रियांना पाचारलें. अष्टसिद्धींना हुकूम दिले. लगेच पालख्या, मेणे, पेटारे, शामपूरच्या मार्गानें चालूं लागले. गोळणी, वऱ्हाडिणी म्हणून आल्या. वाद्यघोषांत मिरवणूक निघाली. श्रीकृष्ण झाला मुख्य वऱ्हाडी. त्यानें नरसीला वाटेंतच गांठलें. मात्र आपण कोण त्याचा पत्ता लागूं दिला नाहीं. वऱ्हाड शामपूरच्या वेशीवर आलें. वधूचा

बाप सामोरा आला. तें प्रचंड वऱ्हाड आणि तें उदंड वैभव पाहून त्यानें तोंडांत बोट घातलें. सीमांतपूजनांत वराला देण्यासाठीं त्यानें आणलेलीं वस्त्रेंभूषणें द्वारकेच्या डोळे दिपवत्या वैभवापुढें निस्तेज पडलीं.

ठरलेल्या मुहूर्तावर नरसीचें लग्न लागलें. श्रीहरीनें सगळ्या शामपुराला इच्छाभोजन घातलें. पांच दिवस लग्नसोहळा झाला. नरसी वरात घेऊन जुनागडला आपल्या घरीं आला. देवानें त्याच्यासाठीं निजांगें कष्ट सोसले त्याच्यासाठींच सर्वांना दिपवलें. अशा प्रकारें सर्व लग्नसोहळा पार पाडून द्वारकेला परत जातांना भगवंतानें नरसीच्या कानांत सांगितलें. ‘ जेव्हां जेव्हां जड, भारी पडेल, तेव्हां तेव्हां माझें स्मरण कर. मी धावत येईन आणि तुझें सांकडें निवारीन. ’

नरसीचा गृहस्थाश्रम सुरू झाला. त्याला मनाजोगती पत्नी मिळाली; पण त्याच्या वृत्तींत मात्र काडीइतकाहि फरक पडला नाहीं. तो पत्नीच्या नादानें हरिभजन विसरला नाहीं. श्रीहरीवर श्रद्धा ठेवून तो संसार चालवूं लागला. कोणाशीं द्वेष नाहीं, कोणाशीं मत्सर नाहीं. लहानथोर-आपपर, हे सगळे भगवंताचे अंश, ही दृढ श्रद्धा. त्याचा व्यवहार सचोटीचा होता आणि वर्तन प्रेमळ होतें. त्यामुळें त्याच्याविषयीं लोकांत आदरभाव वाढला आणि त्याचबरोबर त्याला कांहीं खळनिंदकहि निर्माण झाले.

एक दिवस केशवभट्ट नांवाचा एक ब्राह्मण द्वारकेच्या यात्रेला निघाला होता. वाटेंत तो जुनागडीं उतरला. त्याच्याजवळ बरेंच द्रव्य होतें. तिथें त्याला कळलें कीं, पुढचा रस्ता चोरांचिलटांचा आहे. तेव्हां त्यानें ठरवलें कीं, आपल्या जवळचा पैसा इथें एखाद्या सावकाराकडे जमा करावा आणि द्वारकेच्या एखाद्या पेढीवर हुंडी घ्यावी. म्हणून जुनागडीं सावकार कोण आहे याची तो चौकशी करूं लागला. एका ओटीवर चांडाळ चौकडी बसली होती, तिनें केशवभट्टाला नरसी मेहत्याचें घर दाखवलें. त्यांत कांहीं थट्टेचा प्रकार आहे, हें त्या ब्राह्मणाला समजलें नाहीं. तो

सरळ नरसी मेहत्याच्या घरीं आला. नरसीनें त्याचें प्रेमळ स्वागत करून येण्याचें कारण विचारलें. त्यावर ब्राह्मण म्हणाला.

"मी द्वारकेला निघालों आहें. माझ्याजवळ सातशें रुपये आहेत. एवढं जडजोखीम बरोबर घेऊन जाणं धोक्याचं. तेव्हां तुम्ही हे तुमच्या पेढीवर ठेवून घ्या आणि मला द्वारकेंतल्या एखाद्या पेढीवर हुंडी द्या."

आपली आणि त्या ब्राह्मणाची कुणीं तरी निर्दय थट्टा केली आहे हें नरसी मेहत्यानें ओळखलें. पण त्या ब्राह्मणाला विन्मुख पाठवणें त्याला बरें वाटलें नाहीं. त्यानें तें द्रव्य ठेवून घेतलें आणि द्वारकेंतल्या सामळशा नांवाच्या सावकारावर हुंडी लिहिली. हा सावकार म्हणजे खुद्द द्वारकेचा राणाच होता. त्यानें त्या हुंडींत भगवंताला लिहिलें.

"देवा चक्रपाणि, तूं परमउदार आणि करुणासागर आहेस. सुदामा ब्राह्मग तुझ्या भेटीला आला, तर तूं त्याला सोन्याची नगरी बनवून दिलीस. तुला भक्तांचें अपार कौतुक आहे. म्हणून मीं या ब्राह्मणाचे सातशें रुपये ठेवून घेऊन त्याला हुंडी दिली आहे. त्या हुंडीचें द्रव्य ब्राह्मणाला द्वारकेंत पोंचतांच मिळालें पाहिजे. देवा, माझें हसें होऊं देऊं नको, एवढीच तुझ्या चरणीं प्रार्थना."

नरसीनें हुंडी केशवभट्टाच्या हातीं दिली. लगेच गांवांतले याचक आणि वैष्णवजन बोलावून आणले आणि त्या ब्राह्मणाच्या देखतच ठेव म्हणून घेतलेलें सारें द्रव्य त्यानें वैरून टाकलें. केशवभट्टाला हा प्रकार चमत्कारिकच वाटला. तो संशयित मनःस्थितींतच द्वारकेला गेला. त्यानें प्रथम गोमतीचें स्नान केलें. नंतर द्वारकानाथाचें दर्शन घेतलें. आणि मग पुजाऱ्याला विचारलें.

"द्वारकेंत सामळशा नांवाचा सावकार कुठं रहातो?"

त्यावर पुजारी म्हणाला, कीं 'इथें कोणी सामळशा नाहीं. काय काम होतं तुमचं?'

" जुनागडच्या नरसी मेहत्यानें त्याच्यावर सातशें रुपयांची हुंडी लिहून दिली आहे. देवकृत्य करण्यासाठीं मला ती रक्कम द्यायची आहे."

त्यावर पुजारी हसूं लागले. त्यांनीं केशवभट्टाला म्हटलें, कीं ' बरा सावकार भेटला तुम्हांला. अहो, नरसीची हुंडी म्हणजे वाऱ्यावर वरात. चांगलं ठकवलं त्यानं तुम्हांला.'

केशवभट्ट रडकुंडीस आला. त्याचा मूळचा संशय दृढ झाला. आपण नागवले गेलों असें त्याला वाटलें. तशाच परिस्थितींत तो देवळांतून बाहेर पडला. पण भक्तवत्सल परमात्म्याला आपल्या भक्ताची लाज राखायची होती. देवानें लगेच सामळशाचें रूप घेतलें. सातशें रुपयांची थैली भरून घेऊन तो एका घोड्याच्या गाडींत बसला आणि समोरच्या रस्त्यानें केशवभट्टापुढें आला.

" जुनागडाहून आलेले केशवभट्ट ते तुम्हीच काय ? " त्यानें विचारलें.

" होय, मीच तो. सामळशा सावकाराचा शोध करीत हिंडतों आहें. जुनागडच्या नरसी मेहत्यानं मला त्याच्यावर हुंडी दिली आहे." ब्राह्मणानें म्हटलें.

" अहो, मीच तो सामळशा. पण मी सावकार मात्र नव्हे बरं का ! मी गुमास्ता आहें नरसी शेटजींचा. आणा ती हुंडी इकडे ! "

ब्राह्मणानें आपल्या उपरण्याच्या पदराला बांधलेली हुंडी सोडून सामळशाच्या हातीं दिली. सामळशानें तिथल्या तिथें सातशेंची थैली ब्राह्मणाच्या पदरांत घातली. केशवभट्टाला परम समाधान झालें. त्याचबरोबर त्याची जिज्ञासाहि बळावली. त्यानें सामळशाला विचारलें.

" एक विचारतों, रागावूं नका. नरसी मेहता गरीबदुबळा दिसतो. तुम्ही त्याचे गुमास्ते म्हणतां; पण तुमचा थाटमाट सगळा श्रीमंतांचा आहे. सेवक थोर आणि स्वामी अनाथ, हें दृश्य विपरीतच नाहीं का ? सूर्यानें

निस्तेज असावें आणि पांगळया अरुणानें जग प्रकाशित करून टाकावें, तशांतलाच हा प्रकार."



सामळशा ब्राह्मणाला द्रव्य देतो.

त्यावर सामळशारूपी भगवान् हसला आणि म्हणाला.

"आपण लहान राहून आश्रितांना मोठं करणं हेंच खरं थोरपण. आणि तें नरसी मेहत्याजवळ पुरेपूर आहे. त्यांना द्रव्य म्हणजे कःपदार्थ वाटतं. त्यांनीं व्यवहाराचा सर्व भाग आमच्यावरच सोंपवला आहे. त्यामुळें आम्हांला पेशा संभाळून पगदस्तानं रहावं लागतं. आणि तें पाहून लोकांना वाटतं, कीं त्यांच्यापेक्षां आम्हीच मोठे."

तेवढ्यावर तो संवाद संपला. केशवभट्टाची चिंता दूर झाल्यामुळें तो सामळशाला नमस्कार करून आपल्या रस्त्यानें निघून गेला. द्वारकाधीशहि घेतलेलें सोंग उतरून पुनश्च आपल्या मंदिरांत दाखल झाला.

पण एवढ्यावरच भागलें नाहीं. त्याला आणखी एकदा भक्ताची लाज राखण्यासाठीं ऐन वेळीं असेंच सोंग घ्यावें लागलें. भक्ताच्या धाव्याला धावून जावें लागलें.

प्रसंग होता नरसी मेहत्याच्या मुलीच्या फलशोभनाचा. तिच्या सासरहून नरसीला बोलावणें आलें. नरसी तिथें गेला. व्याह्यांनीं पाहिलें, कीं सुनेचा बाप हात हालवीत आला आहे. या प्रसंगानें त्याच्याकडून मुलीला, जांवयाला आणि घरच्या सर्व मंडळीला लेणीं, लुगडीं मिळतील; नाना प्रकारचे आहेर मिळतील, रुसूनफुगून त्याच्याकडून आणखीहि बरेंचसें उकळतां येईल, अशी त्या लोकांची कल्पना होती. पण नरसी मेहता कफल्लक आल्यामुळें त्या सर्वांची निराशा झाली. त्यांनीं नरसीचें स्वागत करण्याऐवजीं त्याचा परोपरीनें उपहासच केला. नरसीची मुलगी बापाला बाजूला बोलावून म्हणाली.

"तुम्ही अगदीं रिकाम्या हातांनीं कसे आलांत? तुमच्याकडून मनाजोगतं मिळालं नाहीं, तर माझ्या सासरची मंडळी माझी चेष्टा करतील. पदोपदीं मला हिणवतील. मला या घरांत सुख लाभणार नाहीं. माझा नवराहि माझ्यावर माया करणार नाहीं. एखाद्या दासीबटकीप्रमाणें मला या घरांत आयुष्य घालवावं लागेल."

बोलतां बोलतां मुलीच्या डोळ्यांतून अश्रू गळूं लागले. त्या अश्रूंनीं प्रेमळ पित्याचें अंतःकरण विरघळलें. निदान या मुलीच्या सुखासाठीं तरी आपल्याजवळ द्रव्य असायला पाहिजे होतें, असें त्याला वाटलें. त्यानें मुलीच्या पाठीवरून हात फिरवला. आपल्या उपरण्यानें तिचे अश्रू पुसले आणि तिला म्हटलें. 'देव तुझा हेतु सफळ करील. जा तूं घरांत.'

नरसीचा देवावरच विश्वास होता. त्यानें भगवंताला सांकडें घातलें. 'देवा, मुलगी माझी नव्हे; तर तुझा आहे. तिचा हा फलशोभनाचा समारंभ तूं तुझ्या ऐश्वर्यानें साजरा कर.' आणि नरसी मेहता पुनश्च सदरेवर आला. त्यानें व्याही मंडळीला जवळ बोलावलें.

" कोणाकोणाला काय काय अहेर हवा तो सांगा. यादीच करून द्या माझ्याकडे."

त्यासरशीं एक उत्साही माणूस दौत-टाक अन् कागद घेऊन पुढें आला. त्यानें यादी लिहायला सुरवात केली. कोणाला सलकड्या, कोणाला आंगठ्या, कोणाला पागोटें, कोणाला शालूशेले, कोणाला पुतळ्यांची गळसरी, कोणाला कांहीं, कोणाला कांहीं. त्या माणसानें सगळी यादी नांवनिशीवार लिहिली. ती पाहून शेवटीं नरसी मेहत्यानें म्हटलें.

"यादी लिहिणारा तूं. आतां तुला काय हवं तें लिही ना !"

त्यावर तो कारकून म्हणाला, ' माझ्यासाठीं एक मोठा थोरला दगड आणा. ' त्यासरशी लहानथोर सर्व जण खो खो हसले. ही यादी म्हणजे त्यांच्या दृष्टीनें नरसीच्या मर्मभेदक थट्टेचाच एक प्रकार होता. तें कुचाळकीचें हसणें नरसीच्या जिवाला लागलें आणि नरसीच्या आधीं देवाच्या जिवाला लागलें.

योग्य वेळीं फलशोभनाच्या कार्याला सुरुवात झाली. नरसीची मुलगी आणि जांवई हें जोडपें पाटावर बसलें. ब्राह्मणांनीं पुण्याहवाचन म्हटलें. पुढं शांति, होमहवन इत्यादि संस्काराचीं सर्व कृत्यें, सर्व कांहीं यथास्थित पार पडलें. तेवढें झाल्यावर अहेरओस्यांची वेळ येणार होती आणि त्याच वेळीं पुन्हां एकदा सर्व मंडळी नरसी मेहत्याला लाजवणार होती. नाना प्रकारचे कुचेष्टेचे बोल बोलणार होती.

पण नेमका त्याच वेळीं एक गृहस्थ दारांत येऊन उभा ठाकला. त्याच्या मागें वस्त्रांचीं दिंडें आणि पेटारे डोक्यावर घेतलेले कांहीं गडी होते. त्या गृहस्थानें तें सारें सामान दारांत उतरून घेतलें. लोकांना कुतूहल झालें. सर्व मंडळी त्या सामानाभोंवतीं गोळा झाली. तो आलेला गृहस्थ म्हणाला.

" अहेराची वेळ टळून गेली नाहीं ना ? आमचे शेटजी मला सर्व व्यवस्था सांगून पुढें आले होते ; पण सगळी जमवाजमव होईपर्यंत एवढा उशीर लागला. "

पण त्याचे हे शब्द कोणाला ऐकूंच गेले नाहींत. सर्वांचें ध्यान लागलें होतें तें त्यानें आणलेल्या सामानावर. तीं उंची उंची वस्त्रं, तीं शेले-पागोटीं, ते सोन्यामोत्यांचे अलंकार, तीं नाना प्रकारचीं भांडींकुंडीं, हें सर्व पहातांना लोकांचे डोळे दिपून गेले. त्यांचा आशाळभूतपणा पराकोटीला पोंचला. जो तो हें मला हवें, तें मला हवें असें म्हणूं लागला. त्या गृहस्थानें ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणें ज्याला त्याला अहेर केले. नरसीच्या मुलीला अन् जांवयाला तर उदंड दिलें.

सर्वांना देऊन झाल्यावर त्याला वाटलें कीं, अजून आपण नरसीला कांहींच दिलें नाहीं. त्याला तरी घरचा अहेर करायलाच हवा कीं ! म्हणून मग त्यानें एक लहानशी करंडी उघडली. त्यांतून एक तुळशीच्या मंजिऱ्यांची माळ बाहेर काढली आणि ती नरसीच्या गळ्यांत घवघवीतशी घालून वर नमस्कार केला. त्याच्या या औदार्यानें नरसीची सर्व व्याही मंडळी लाजून चूर झाली. आपण थोडा दम धरायला हवा होता, नसतें बोलून त्याचें उणेंदुणें काढायला नको होतें, असें आतां त्यांना वाटलें. मग त्याच्या सत्काराला काय उणें! नरसी कुठें बसला अन् कुठें उठला ! सर्वांच्या नजरा त्याच्यावर. सगळे त्याच्या सरबराईला उभे. नरसी मात्र मनांत म्हणत होता, कीं 'हा सत्कार माझा नव्हे. तो आहे द्रव्याचा अन् वस्त्रभूषणांचा.'

आपल्या मुलीकडचा संस्कारसमारंभ उरकून नरसी मेहता जुनागडला आला. त्याचा भजनकीर्तनाचा नित्य क्रम सुरू झाला. दिवसेंदिवस त्याचें भजन अधिकाधिक प्रेमळ होऊं लागलें. त्याची श्रद्धा वज्रलेपासारखी दृढ झाली. त्याच्या कीर्तनांत जसे सुंदर, तसे गंभीर विचार प्रगट होऊं लागले. तो आपली नव्हे, तर देवाची भाषा बोलूं लागला. शुक–नारद, सनत्कुमार जणूं त्याच्या हृदयांत संचरले. त्याचें स्वतःकडे लक्षच नसे. सर्वभूतीं भरून राहिलेल्या भगवंताखेरीज त्याला जणूं निराळें अस्तित्व उरलें नव्हतें. तो दुसऱ्याच्या दुःखानें कळवळत होता आणि दुसऱ्याच्या सुखानें

उचंबळत होता. परपीडेच्या नुसत्या कल्पनेनेंहि कासावीस होत होता त्याची कीर्तनगंगा भक्तिप्रेमाच्या, सेवेच्या अन् त्यागाच्या रसानें दुथडी भरून वहात होती. त्याच्या कीर्तनाला बसलेली मंडळी प्रेमानें डोलत होती आणि अश्रूंनीं पाझरत होती. साक्षात् भगवंतालाहि त्याच्या कीर्तनाचें वेड लागलें होतें. प्रत्येक कीर्तनप्रसंगीं देव एक चमत्कार दाखवीत होता. देवाच्या गळ्यांतील माळ येऊन नरसीच्या गळ्यांत पडत होती. लोकांना आश्चर्य वाटत होतें. नरसी मेहत्यावर भगवंताची कृपा आहे, तो देवाचा आवडता आहे, हें आतां सर्वांना कळून चुकलें होतें. त्यामुळें नरसी मेहता जुनागडांतला परमेश्वर झाला होता. माणसें त्याच्या दर्शनाला येत होतीं. कीर्तनाला बसत होतीं. आणि सेवेलाहि धडपडत होतीं. नरसीची सेवा ही देवाची सेवा आणि नरसीचे उपचार ही देवाचीच पूजा, असें त्यांना वाटूं लागलें होतें.

दुसऱ्या बाजूनें त्याला निंदकहि निर्माण झाले होते. नरसीनें गांवांत भोंदूगिरी चालवली आहे. टिळा-टोपी-माळा करून तो लोकांना लुबाडतो आहे. तो महा नाटकी आहे. कीर्तनांत हसतो काय, नाचतो काय, रडतो काय ! लोकांना वाटावें, कीं साक्षात् नारदच अवतरला आहे. अशा रीतीनें ते लोक नरसीच्या कुचाळक्या करीत गांवांत खोटेनाटे प्रवादहि उठवीत.

एकदा तर त्यांनीं तिथल्या राजाच्या कानापर्यंत आपली चुगली नेली. राजाच्या मनांत नको त्या गोष्टी भरवून दिल्या. राजा खुद्द उठून कीर्तनाला आला. त्यानें प्रथम देवाच्या गळ्यांत हार घातला. मग पुजाऱ्याला सांगितलें, कीं 'सुईदोरा घेऊन या.' त्यांनीं लगेच सुईदोरा आणला. राजा त्यांना म्हणाला. 'हा हार मूर्तीच्या अंगरख्याला दोहीं अंगीं शिवून टाका. चांगले घट्ट टाके घाला. देवाच्या गळ्यांतला हार नरसीच्या गळ्यांत पडतो काय ! या भोंदू बुवाला देव प्रसन्न होतो काय ! मला प्रचीतीच पाहूं दे. मी आतां कीर्तनाला बसणार आहें आणि जर नरसीच्या

क्र. २१०३५ ... दि. ...
... १०६३ ... नों. दि. ...

गळ्यांत हार आला नाहीं, तर एक गुन्हेगार म्हणून नरसीला कडक शासन करणार आहें.'

तेवढें करून राजा कीर्तनाला बसला. नरसीला ह्या बनावाची कल्पनाहि नव्हती. तो कीर्तनरंगांत रंगून गेला होता. त्याची आणि देवाची सलगी चालली होती. तो श्रोत्यांना उद्देशून बोलत होता, म्हणजे जणूं देवालाच आळवीत होता. त्याच्या वांट्याला सगळें जगच ईश्वरमय झालें होतें. मधेंच कीर्तन, मधेंच निरूपण, मधेंच जयघोष, असा तो रसाळपणाचा आवा सगळीकडे मांडला होता. सगळे श्रोते त्या प्रवाहांत वहात होते, पोहत होते. कांठावर होता तो फक्त राजा. तो ताठ होता आणि डोळ्यांत तेल घालून पहात होता. पण जेव्हां ठरलेल्या वेळीं देवमूर्तीच्या गळ्यांतला हार अलगद येऊन नरसीच्या गळ्यांत पडला; तेव्हां मात्र तो चपापला. नुसता चपापला नव्हे तर घाबरलासुद्धा. त्याला भीति वाटली ती ही कीं, आतां देव आपल्याला कडक शासन करील! एवढा मोठा राजा; पण कुठलें काय! एका क्षणांत हीनदीन झाला. त्यानें सरळ उठून नरसीचे पाय धरले.

"भक्तराजा, मला क्षमा कर. माझा अपराध मनावर घेऊं नको. तूं वैष्णववीर आहेस. मी फुकाचा गर्व वाहणारा दुबळा जीव आहें. ज्ञानानं आंधळा अन् श्रद्धेनं पांगळा. क्षमा कर मला..."

नरसी मेहत्यानें राजाला कडकडून क्षेम दिलें. सन्मानानें आपल्यापुढें बसवून घेतलं. 'श्रीहरि हा करुणेचा सागर आहे. मात्र त्याला सर्वभावें शरण गेलें पाहिजे.' असा त्याला सदुपदेश केला. त्याच विषयावर कीर्तनांतलें निरूपण पुढें चालू केलें. त्या कीर्तनांत भक्तिप्रेमाचा सुकाळ करून सोडला. तो जणूं ईश्वराची वाणी बोलत होता —

**'तरिच जन्मा यावें। दास ईश्वराचें व्हावें॥'**

तें कीर्तन ऐकून घरोघर जाणारी मंडळी म्हणत होती. "आजच्या-सारखं कीर्तन कधीं ऐकलं नाहीं. असा रंग कधीं भरला नाहीं. धन्य नरसी भगत!"

# श्रीहर्ष

संस्कृत भाषेंत जीं पंचमहाकाव्यें आहेत, त्यांत ‘नैषध’ किंवा ‘नैषधीयचरितम्’ नांवाचें एक महाकाव्य आहे. महाभारतांतल्या नल–दमयंतीच्या रसाळ आख्यानाच्या आधारें हें महाकाव्य लिहिणारा महाकवि म्हणजे श्रीहर्ष होय. हा मूळ काशीचा रहाणारा. घराणें पिढीजात पंडिताचें. बाराव्या शतकाच्या उत्तरार्धांत हा जन्मला. मोठा पंडित झाला. जयचंद गाहडवाल या कनोजच्या राजाचा ह्याला आश्रय होता. ‘विजयप्रशस्तिः’ या नांवाचें एक काव्य जयचंदाच्या प्रशंसेसाठींच त्यानें लिहिलें आहे. ‘अर्णववर्णनम्’ हें एका चालुक्य राजाच्या प्रशस्तीचें काव्य आहे. ‘छिंदप्रशस्तिः’ हा त्याचा ग्रंथ गयेच्या छिंद घराण्याचें वर्णन करणारा आहे. काव्याशिवाय ‘खंडनखंडखाद्यम्’ नांवाचा त्याचा वेदांतावर एक ग्रंथ असून तो विद्वानांच्या प्रशंसेला पात्र झाला आहे. ह्या महाकवीला अनेक राजदरबारांतून मान्यता आणि संभावना मिळाली होती. ह्याच महाकवीची कथा पुढें दिली आहे—

★ ★ ★

काशी नगरींत एक वृद्ध ब्राह्मण आपल्या घरीं मृत्युशय्येवर पडला होता. त्याचें नांव ‘हीर पंडित.’ त्याला औषधोपचार चालू होते; पण गुण मात्र पडत नव्हता. एकेका दिवसानें तो वद्यपक्षांतल्या चंद्रासारखा क्षीण होऊं लागला. त्याच्या आत्म्याच्या एकेक कळा मावळूं लागल्या. हीर पंडित म्हातारा असला तरी, तसा कांहीं अतिवृद्ध नव्हता. पण जयंतचंद्राच्या राजदरबारांत एका पंडितानें त्याला वादांत पराभूत केलें आणि वर अपमानाच्या टोचण्याहि दिल्या, ही गोष्ट त्याच्या जिवाला झोंबली होती. त्या दिवसापासून तो निस्तेज पडला. त्याला जीवनांत

कांहींच राम वाटेनासा झाला. हळूहळू त्याचा अशक्तपणा वाढूं लागला. पुढें त्यानें अंथरूण धरलें. आणि अखेर तो मरणाच्या दारीं येऊन ठेपला.

अगदीं शेवटच्या घटकेला त्यानें आपला मुलगा श्रीहर्ष याला जवळ बोलावून घेतलें. त्याचा हात आपल्या हातांत घेऊन आणि डोळ्यांत पाणी आणून त्याला म्हटलें.

" बाळा, श्रीहर्षा ! मी आतां थोड्याच घटकांचा सोबती आहें. जीवनांत आतां कोणत्याहि गोष्टीची आशा उरली नाहीं ... पण तरीहि प्राण घुटमळत आहेत. एक शल्य काळजांत सारखं खुपतं आहे. माझ्या मुला, तें शल्य तूं उपटून काढण्याचं वचन देशील, तरच माझे पंचप्राण अनायासानं जातील. "

" काय करूं बाबा ? " श्रीहर्षानें डोळ्यांत आंसवें आणून गद्गद स्वरानें विचारलें.

त्यासरशीं म्हातारा उत्तेजित झाला. त्याचा स्वर खोल गेला होता, तो एकदम खणखणीत झाला. डोळ्यांत ज्योत पेटली. पिकुंटलेल्या चेहऱ्यावर लाली आली. तो म्हणाला.

" काय करूं म्हणतोस ? सांगतों. खूप विद्या शीक. सहा शास्त्रांत पारंगत हो. तुझ्या बुद्धीला धार चढव. आणि ज्या राजदरबारांत ज्या पंडितानं माझा अपमान केला, त्याच दरबारांत त्याच पंडिताला तूं वादांत जिंकून मान खालीं घालायला लाव. आपलं तोंड शालजोडींत लपवायला लाव. त्याला अन्य पंडितांच्या तुच्छतेला पात्र कर. एवढं करीन असं वचन दे मला. म्हणजे मी सुखानं मरेन. वचन...वचन... "

" हें घ्या वचन. तुमच्या पायाची शपथ घेऊन सांगतों, कीं मी तुमचं हृदयशल्य उपटून काढीन. तुमचं मुख स्वर्गांत उजळ करीन ! " श्रीहर्षानं बापाच्या गार पडत चाललेल्या हातावर आपला रसरशीत उबदार हात दाबला.

आणि दुसऱ्याच क्षणीं हीर पंडिताचें प्राणोत्क्रमण झालें !

अवघा चौदा-पंधरा वर्षांचा श्रीहर्ष; पण पित्याचें छत्र फाटून गेल्यामुळें तो पोरका झाला. पण त्या पोरकेपणाचें दुःख आळवीत बसायला त्याला सवड नव्हती. त्यानें बापाला वचन दिलें होतें. कितीहि दानें दिलीं किंवा कितीहि पिंड दिले, तरी पराभवाचें दुःख दूर झाल्यावांचून पित्याचा आत्मा मुक्त होणार नाहीं, स्वर्गांत जाणार नाहीं, असें त्याला वाटलें. त्याची आई 'मामल्ल देवी' विधवा होऊन अंधारांत बसली होती. तिला आतां श्रीहर्ष हाच एकमेव आधार होता. पण तो मातृभक्त असूनहि तिच्या मायापाशांत अडकला नाहीं. वचनपूर्तीसाठीं त्यानें आपलें लोण्यासारखें मन दगडासारखें केलें. आईच्या उपजीविकेची तेवढी व्यवस्था करून त्यानें तिला म्हटलें.

"आई, मी विद्याभ्यासासाठीं घर सोडून चाललों आहें. मी पंडित होऊन येईन आणि तुला दर्शन देईन. बाबांचा अपमान करणाऱ्या त्या पंडिताचा भर दरबारांत पराभव करीन आणि मगच त्यांचं श्राद्ध करीन. तूंहि मन कठोर करून मला निरोप दे."

त्याला आईची अनुज्ञा मिळाली. तो घरांतून निघाला. अनेक गुरूंच्याकडून त्यानें अनेक शास्त्रांचें अध्ययन केलें. न्याय, व्याकरण, साहित्य, संगीत, ज्योतिष इत्यादि अनेक विषयांत तो पारंगत झाला. प्रत्येक विषयांत त्याची प्रज्ञा विजेसारखी तळपूं लागली. नवेच तर्क, नवेच सिद्धांत, नव्याच विचारप्रणाली, त्याच्या बुद्धींत स्फुरूं लागल्या. त्याची बुद्धि त्यालाच अनावर झाली.

तो अनेक राजांच्या दरबारांत गेला—आला. अनेक प्राज्ञ पंडितांशीं त्याच्या गांठीभेटी झाल्या. अनेकांशीं त्यानें शास्त्रार्थहि केले. पण गंमत अशी व्हायची, कीं तो काय बोलतो हें समोरच्या पंडिताला कळायचेंच नाहीं. श्रीहर्ष त्या सर्व शास्त्रीपंडितांना दुर्बोध, अगम्य झाला. ते म्हणत, 'तुमचा आशय जरा स्पष्ट शब्दांत मांडा.' तो तसा प्रयत्न करी; पण

बुद्धीच्या तरलत्वामुळें त्याचें स्पष्टीकरणहि अधिकच अवघड होई. पंडित त्याच्यापुढें हात टेकीत. पण ते 'वादांत हरलों' म्हणून नव्हे; तर 'तुमचं विधान आम्हांला आकलन करतां येत नाहीं' म्हणून. त्यामुळें त्याचे दोन हात कोणाशींच होत ना. त्याची बुद्धि जणूं त्यालाच रानांत नेऊन घालूं लागली. त्याला हात देण्याच्याऐवजीं अधांतरींच लोंबत ठेवूं लागली. बुद्धीचा तो प्रकाश कित्येकदा त्यालाहि सहन होईना. त्याला वाटे, कीं जणुं आपलं तन-मन भाजून निघत आहे. त्यामुळें तो स्वतःच चिंतेंत पडला.

आणि अखेर वादविवादाची होस सोडून त्यानें कुठल्यातरी एकांत स्थळीं सरस्वतीची उपासना सुरू केली. ती उपासना विलक्षण खडतर होती. देह आणि प्राण आटवणारी होती. दिवसांमागून दिवस गेले. महिन्यांमागून महिने लोटले. आणि अखेर एका रात्रीं सरस्वती साक्षात् त्याच्यापुढें प्रगट होऊन म्हणाली. 'भक्ता, वर माग.'

श्रीहर्षानें चरणीं मस्तक ठेवून तिला विनवलें.

"माते, माझ्या प्रज्ञावेलीचे फोंफावणारे अंकुर तूं खुडून टाक. बुद्धीची अधिकता नव्हे; अतितीव्रता हाच आतां माझ्या विद्येंत एक दोष उत्पन्न झाला आहे. माझं बोलणं पंडितांना आकळत नाहीं. माझीच बुद्धि मला अरण्यांत टाकते. तेव्हां ती थोडीशी कमी कर. ती वर्षा ऋतूंतल्या उमाळ्यासारखी उमळते, उचंबळते, ती जराशी स्थिर कर, गंभीर कर."

सरस्वतीला त्याच्या बोलण्याचें हसूं आलें. ती दयार्द्र होऊन म्हणाली.

"मी सांगतें तो उपाय कर. आतां पुढें थंडीचे दिवस येतील. ज्या दिवशीं कडाक्याची थंडी पडेल, त्या दिवशीं मध्यरात्रीं डोक्यावर गार पाणी ओत. वाडगाभर दहीं पी. आणि झोपीं जा. त्यामुळें तुझ्या शरिरांत त्रिदोषांपैकीं कफाची वृद्धि होईल आणि तुझ्या बुद्धीला किंचित् जडत्व प्राप्त होऊन तिला वजन येईल. ती मंद होणार नाहीं; पण स्थिर होईल.

आणि मग तुझं बोलणं लोकांना समजूं लागेल. तें त्यांच्या आवाक्यांत येईल.”

श्रीहर्षानें त्याप्रमाणें केलें आणि त्यांत त्याला यशहि मिळालें. त्याची बुद्धि स्थिर झाली. सिद्धांत पक्के बसले. अनुमानें शास्त्रशुद्ध होऊं लागलीं. विद्याकला त्याच्या अंतरांत प्रतिष्ठित झाल्या.

आणि मग एके दिवशीं तो परत काशी नगरीला यायला निघाला. जयंतचंद्राचा पुत्र जयचंद राठोड हा त्या वेळीं राज्यावर बसला होता. काशी ही त्या राजवंशाची दुसरी राजधानी होती. श्रीहर्षानें मार्गांतूनच जयचंद्राला निरोप पाठवला. ‘राजा, हीरपंडिताचा पुत्र श्रीहर्ष सकल विद्यांत पारंगत होऊन आपल्या वडिलांची जागा घेण्यासाठीं राजधानीला येत आहे.’

तो निरोप पोंचतांच जयचंद राजा शास्त्रीपंडितांना घेऊन त्याला सामोरा गेला. नगराच्या वेशीवर दोघांची गांठ पडली. जयचंदानें श्रीहर्षाला प्रेमभरानें आलिंगन दिलें. श्रीहर्षानें एक क्षणभरच राजाच्या मुखमुद्रेवर दृष्टि लावली आणि सहजगत्या राजप्रशंसेचा एक सुंदर संस्कृत श्लोक रचून म्हटला. त्या श्लोकांत जयचंदाच्या प्रतापाचें वर्णन होतें —

‘कामदेव हा एखाद्या वीरपुंगवाला जिंकून आपल्या पायाशीं लोळण घ्यायला लावण्यासाठीं स्त्रीला आपलें अस्त्र बनवतो. पण हा जयचंद राजा अस्त्र धारण करणाऱ्यांनाहि हां हां म्हणतां ‘स्त्री’ बनवून सोडतो.’

राजा, प्रधान आणि इतर विद्वज्जन या सर्वांनाच ती काव्यमय प्रशंसा आवडली. ‘अस्त्री आणि स्त्री’ या दोन शब्दांनीं निर्माण केलेला तो कोटिक्रम त्यांना एकदम पसंत पडला. राजानें त्याचें वेशीवर स्वागत केलें आणि दरबारांत आणून त्याचा सत्कारहि केला.

श्रीहर्ष रोज दरबारांत जाऊं लागला. त्याच्या बापाचा अपमान करणारा तो पंडित अजूनहि तिथें होताच. श्रीहर्षाच्या रोषाचे कटाक्ष त्याच्यावर नेहमीं पडूं लागले. राजाला त्याच्या राजकारणांतून सवड मिळेल तेव्हां

पंडितांशीं संवाद करणें आवडे. अशा प्रत्येक वेळीं श्रीहर्ष त्याला आपल्या प्रज्ञेचे चमत्कार दाखवून संतुष्ट करी. इतर पंडितहि त्याच्या मुखांतून कोणत्या अर्थचमत्कृतीचा फुटाणा उडतो, त्यासाठीं कान लावून बसत. थोड्याच दिवसांत त्यानें आपल्या विद्वत्तेनें, प्रतिभेनें आणि हजरजबाबानें सर्व दरबारी पंडितांना भारून टाकलें. ते त्याच्याशीं बोलत, चर्चा करीत; पण अगदीं जपून. त्याला वादविवादाचें स्वरूप येऊं नये, यासाठीं ते कमालीची दक्षता घेत.

अशा रीतीनें दरबारी पंडितांवर स्वतःच्या विद्वत्तेचा वचक बसवून एक दिवस श्रीहर्षानें आपल्या वडिलांच्या प्रतिस्पर्धी पंडिताला वादाचें आह्वान दिलें. हा प्रसंग कधीं तरी येणार, हें तो जाणूनच असावा. पण जेव्हां तो आला तेव्हां मात्र त्याची त्रेधा उडाली. तें आह्वान त्याला स्वीकारतां आलें नाहीं. साऱ्या पंडितसभेसमक्ष पडत्या वाणीनें तो श्रीहर्षाला बोलला.

“पंडितराज, तुमच्या बुद्धिमत्तेची झेप अनाकलनीय. आम्ही केवळ ठराविक अनुमानं आणि ठराविक खंडनमंडनं घोटून टिळा लावलेले पंडित. तुमच्याशीं आमचा टिकाव लागायचा नाहीं. मी माझा पराभव मान्य करतों.”

श्रीहर्षाला त्या वेळीं खरोखरच आकाश ठेंगणें झालें. आनंदानें त्याचा आत्मा जणूं चैत्रांतल्या चाफ्यासारखा फुलला. वडिलांना दिलेलें वचन आपण पूर्ण केलें, त्यांचें हृदयशल्य उपटून काढलें, त्यांच्या घुटमळत्या आत्म्याची स्वर्गांत पाठवणी केली, या जाणिवेनें त्याला कृतकृत्यता वाटली. प्रतिज्ञापूर्तीचा आनंद किती गहिरा असतो, त्याचा त्याला अनुभव आला. पुत्रकर्तव्य पार पाडल्याचें समाधान उपभोगीत हर्षयुक्त अंतःकरणानें तो आपल्या घरीं आला. घरीं येऊन त्यानें आपल्या आईचे पाय धरले आणि तिच्या प्रेमाश्रूंचा अभिषेक आपल्या मस्तकावर घेतला.

पुढें एक दिवस जयचंद राजानें त्याला म्हटलें.

"पंडितराज, तुम्ही दरबारांत अनेकदा प्रासंगिक श्लोक रचून म्हणतां; त्यामुळें आम्हांला काव्यानंदाचा लाभहि होतो. पंडितजनहि संतोष पावतात. पण एवढ्यानं माझं समाधान नाहीं. तुम्ही एखादं महाकाव्य रचावं आणि महाकवि म्हणून युगानुयुगें अजरामर रहावं, असं आम्हांला वाटतं. तरी त्या दृष्टीनं कांहीं विचार करा. महाकाव्याचा आशय आणि विस्तार पेलण्याचं सामर्थ्य तुमच्या प्रतिभेंत निश्चित आहे."

जयचंद राजाचें हें बोलणें श्रीहर्षाला मानवलें. आपल्या मनांत अशी प्रेरणा आजवर कां बरें झाली नाहीं, असेंहि त्याला वाटलें. महाकवि म्हणून अमर होण्याची कल्पना किती हृदयंगम आणि किती उत्तेजक होती! आपण उगाच आजवर किरकोळ विषयांना काव्याचीं लेणीं चढवीत बसलों. आतां असें करायचें नाहीं. महाकाव्यच लिहायचें. बस्स, ठरलें!


पण पुढें प्रश्न आला तो विषयाचा. महाकाव्य रचायचें, तर कथाप्रसंगहि भावगंभीर व नवरसपूर्ण हवा. त्यासाठीं कोणतें आख्यान निवडावें या विवंचनेंत त्याचे बरेच दिवस गेले. खूप धरसोड झाली. आणि या अवधींत त्या राज्यांत एक महान् समरप्रसंग घडला.

जयचंद राठोड याची संयोगिता नांवाची मुलगी होती. जशी देखणी तशीच चतुर. जशी प्रेमळ तशीच धीराची. दिल्लीपति पृथ्वीराज चव्हाण याच्यावर तिचें प्रेम जडलें. जयचंद व पृथ्वीराज म्हणजे एकमेकांचे हाडवैरी. त्या दोघांमधून विस्तवहि जात नसे. पण तरीहि संयोगितेनं पृथ्वीराजाचीच मूर्ति आपल्या अंतःकरणाच्या मखरांत बसवली.

जयचंदाला हें आवडलें नाहीं. त्यानें आपल्या मुलीचें स्वयंवर मांडलें. देशोदेशींच्या राजपुत्रांना त्यासाठीं निमंत्रण केलें. पण पृथ्वीराजाला मात्र वगळलें. इतकेंच नव्हे; तर जमलेल्या राजमंडळांत पृथ्वीराजाची अप्रतिष्ठा करावी म्हणून त्याचा एक पुतळा बनवून तो स्वयंवरमंडपाचा द्वारपाल म्हणून मांडवाच्या दारांत उभा केला. संयोगिता राणीवशांतून स्वयंवर-

मंडपांत आली. आपल्या बापाचें हें उन्मत्तपणाचें अपकृत्य तिला आवडलें नाहीं. तिनें अन्य कोणत्याहि राजपुत्राकडे नजरहि न वळवतां सरळ पुढें जाऊन पृथ्वीराजाच्या त्या पुतळयालाच माळ घातली.

त्या गोष्टीनें मंडपांत सर्वत्र हलकल्लोळ माजला. संयोगितेला विश्वास होता कीं, आपला पति आपल्याला या राजमंडळांतून उचलून घेऊन जाईल. आणि झालेंहि तसेंच. पृथ्वीराज अचानक तिथें उगवला आणि सगळे राजपुरुष टकमक पहात असतां संयोगितेला उचलून घोड्यावर बसवून तिथून पसार झाला...



पृथ्वीराज व संयोगिता

श्रीहर्षानें हें अद्भुत स्वयंवर आपल्या डोळ्यांनीं पाहिलें. तो प्रसंग त्याच्या हृदयांत ठसला. त्याच्या कविमनाला त्यांतले प्रसंग जितके उदात्त तितकेच रोमहर्षक वाटले. त्याच क्षणीं त्यानें ठरवलें कीं, महाकाव्य लिहायचें तें स्वयंवराचा प्रसंग ज्यांत असेल असेंच लिहायचें. आणि त्याला त्याच क्षणीं महाभारतांतल्या नल-दमयंती स्वयंवराचें स्मरण झालें. मग त्यानें वेळ दवडला नाहीं. त्यानें त्या आख्यानाची काव्यदृष्ट्या

सर्गवारीनें मांडणी केली आणि एका सुमुहूर्तावर त्याचा पहिला श्लोक लिहिला—

" पुण्यश्लोक आणि तेजोराशि असा नल नांवाचा एक राजा होता. त्याच्या कथेचें पान करीत असतां विद्वज्जनांनीं अमृतालाहि तुच्छ लेखलें."

दिवसादिवसानें त्याचें काव्य वाढूं लागलें, फुलूं लागलें. भावसुगंधानें दरवळूं लागलें. अखेर तें एक दिवस पूर्णहि झालें. तें घेऊन मग तो राजाकडे गेला. राजसभेंत आणि पंडितांच्या उपस्थितींत त्या काव्याचें वाचन झालें. बाव्वीस सर्गांचें तें महाकाव्य म्हणजे त्यानें बांधलेली ती एक भव्य आणि सुंदर अशी इमारत होती. रसिकांच्या प्रीतीनें, तृप्तीनें आणि प्रशंसेनें त्या काव्यशिल्पावर यशाची धवल पताका चढणार होती.

पण दरबारांतले पंडित पडले वृत्तीनें कद्रू. प्रशंसेच्या ऐवजीं ते त्या महाकाव्याची निंदाच करूं लागले. श्लोकरचना दुर्बोध आहे, शुष्क आहे, अनेक ठिकाणीं उगीच कांहीं तरी खटपट लटपट केलेली आहे, असलीं वाक्यें ते आपापसांत कुजबुजूं लागले आणि राजालाहि ऐकवूं लागले.

पण श्रीहर्ष खंबीर होता. आपल्या प्रतिभेचा वकूब तो ओळखून होता आपण जें निर्माण केलें तें कोण्या सोम्यागोम्यानें 'हुंः! यांत काय आहे!' म्हणून उडवून लावावें इतकें तुच्छ खास नाहीं. त्यांत किती तरी काव्य-गुण प्रकर्षानें तळपत आहेत आणि त्यांतला प्रतिभेचा विलास दरिद्री नसून वैभवशाली आहे, याची त्याला खात्री होती. म्हणूनच एक दिवस तो निंदकांना सडेतोडपणें बोलला.

"माझं महाकाव्य दरिद्री आहे असं म्हणणारा माणूस स्वतःच दरिद्री ठरेल. तें दुर्बोध नाहा; पण कठिण खास आहे. त्यांत कित्येक ठिकाणीं शब्दार्थांच्या निरगांठी आहेत. त्यांचा उकल करणारा माणूस रसिक तर हवाच; पण त्याबरोबरच तो साक्षेपी आणि व्युत्पन्नहि हवा. एवढी ताकद असेल, त्यानेंच या खोल पाण्यांत शिरावें आणि काव्यानंदाच्या लाटांवर यथेच्छ तरंगावें."

जयचंद राजाला श्रीहर्षाचें बोलणें गर्विष्ठपणाचें वाटलें नाहीं. कारण तो त्याची योग्यता जाणत होता. पण तरीहि एक दिवस राजानें त्याला सांगितलें, कीं 'तुम्ही काश्मीरला जा आणि तुमचं हें महाकाव्य तिथल्या सरस्वतीदेवीच्या हातीं द्या. तीच त्याबद्दल योग्य तो निर्णय देईल.'

काश्मीरच्या सरस्वतीदेवीची अशी प्रसिद्धि होती, कीं एखादा ग्रंथ तिच्या हातावर ठेवल्यावर तिला जर तो आवडला नाहीं, तर तो ती फेकून देते आणि आवडला असल्यास आपल्या मस्तकीं धारण करते. तिचा तो निर्णय अखेरचा म्हणून पंडितजन मान्य करतात.

ह्या राजाज्ञेप्रमाणें श्रीहर्ष आपलें महाकाव्य काखेंत मारून सरळ काश्मीरला गेला. पहिल्याप्रथम तो सरस्वतीच्या मंदिराकडेच वळला. त्यानें आपला ग्रंथ आत्मविश्वासानें सरस्वतीच्या हातावर ठेवला आणि तिला प्रणाम करून तो तिच्यापुढें उभा राहिला. पण काय आश्चर्य सांगावें !

सरस्वतीनें तें हस्तलिखित काव्याचें बाड दुसऱ्याच क्षणाला दूर फेकून आपले हात झटकले.

श्रीहर्ष चकित झाला. त्याचे डोळे विस्फारले. तोंड उघडलें. श्वास रोधला. त्याच्या मनबुद्धींना एक विलक्षण स्तंभ आला. ही गोष्ट, हा अनादर त्यानें अपेक्षिलाच नव्हता. त्यामुळें त्याच्या उभ्या देहाला कंप सुटला, जीभ लुळी पडली आणि त्याला कांहीं बोलतांहि येईनासें झालें. कांहीं काळ अशा सुन्न अवस्थेंत गेल्यावर मग कुठें त्याची वाणी जाग्यावर आली. तो देवीला तळमळून म्हणाला.

"देवी सरस्वती, तूं माझा ग्रंथ फेकून दिलास. पण तरीहि त्याची योग्यता मी कमी समजत नाहीं. मला फक्त एवढंच वाटतं, कीं तूं आतां म्हातारी झाली आहेस आणि 'साठी अन् बुद्धि नाठी' म्हणतात, त्याप्रमाणें तुझी बुद्धि मंद झाली आहे."

साक्षात् सरस्वतीला हे शब्द सुनावणाऱ्या या महाकवीचा आत्मविश्वास

केवढा जबरदस्त असेल त्याची कल्पना करा. सरस्वतीलाहि त्या गोष्टीचा अचंबा वाटला. ती म्हणाली.

"तुझं महाकाव्य असेल चांगलं. पण मला काय करायचं आहे? तूं त्यांत माझ्यावर अन्याय केला आहेस. तुला माहीत नाहीं, मी कुमारी आहे तें?"

"आहे कीं! नाहीं कोण म्हणतो?" श्रीहर्ष म्हणाला.

"मग अकराव्या सर्गातल्या सहासष्टाव्या श्लोकांत तूं मला विष्णुपत्नी ठरवून माझा अपमान केला आहेस. माझ्या सर्वश्रुत कौमार्याचा उपमर्द केला आहेस."



सरस्वती महाकाव्य मस्तकीं धारण करते

"राग मानूं नको देवी. एका अवतारांत आपण विष्णुपत्नी व्हावं, अशी आकांक्षा तूं धरली नव्हतीस? तुझं हें वर्म इतर कोणाला माहीत नसलं तरी मी तें जाणतों."

श्रीहर्षाच्या या उत्तरानें सरस्वती वरमली. त्यानें लिहिलेली ती गोष्ट सत्य होती. त्यामुळें तिला आपला राग आवरावाच लागला. तिनें सत्याला मान दिला आणि त्याबरोबरच श्रीहर्षाचें महाकाव्यहि स्वतः उचलून आपल्या मस्तकीं धारण केलें.

ती गोष्ट काश्मीरांत सगळीकडे झाली. श्रीहर्षानें मग तिथल्या अनेक

पंडितांच्या गांठीभेटी घेतल्या. ते गोड बोलत, आदर दाखवीत; पण काश्मीरनरेश माधवदेव यांच्याकडे हर्षाची वर्णी लावायला मात्र कोणीहि पुढें होईना. तिथल्या पंडितांतहि हेवेदावे कांहीं कमी नव्हते. श्रीहर्षाचें काव्य त्याच्या मुखानें ऐकल्यावर त्यांना त्याच्याबद्दल आदरापेक्षां मत्सरच अधिक वाटला. हा माणूस एकदा राजदरबारांत उगवेल, तर सूर्योदयींच्या ताऱ्यांसारखी आपली गत होईल, अशी त्यांना भीति वाटली. आणि म्हणूनच ते डोळ्यांवर कातडें ओढून बसले.

श्रीहर्ष काश्मीरच्या त्या सुंदर आणि समृद्ध प्रदेशांत भिकाऱ्यासारखा भटकत राहिला. त्याची कोणी कदर करीना किंवा त्याला राजवाड्याचें दारहि उघडेना. सरस्वतीनें त्याचा बहुमान केला होता; पण लक्ष्मी अजून तोंड फिरवूनच बसली होती. व्याकरणानें भूक भागत नाहीं आणि काव्य-रसानें तहान शमत नाहीं; या सुभाषिताचा तो रोज अनुभव घेत होता. असे कांहीं महिने लोटले आणि मग त्याच्या दैवाचें चक्र फिरलें.

सकाळची वेळ होती. काश्मीरच्या बर्फाच्छादित पर्वतशिखरांवर सूर्य-किरणांनीं रुपेरी माया पसरली होती. सर्वत्र फुललेल्या गुलाबाच्या वासानें वातावरण धुंद झालें होतें. वारा झुळझुळत होता. नदी खळखळत होती. आणि तिच्या कांठीं बसून श्रीहर्ष आपल्या चिंतामणि मंत्राचा जप करीत होता. तो बसला होता ती जागा पाणवठ्याची होती. काश्मीरी ग्रामललना डोक्यावर नि कमरेवर घडे घेऊन तिथें पाणी भरण्यासाठीं येत होत्या. मैत्रिणींशीं त्यांचे सांसारिक सुखदुःखांचे संवाद चालत होते.

एवढ्यांत कांहीं तरी बिघडलें. दुधांत मिठाचा खडा पडला. दोन बायका प्रथम खेळीमेळीनें बोलत होत्या, त्या एकदम वर्दळीवर आल्या. त्यांच्या गोऱ्यापान मुखमुद्रा जास्वंदासारख्या लाल झाल्या. शब्द कमी पडले, तशी त्यांनीं एकमेकींच्या झिंज्या पकडल्या. आपल्या नाजुक हातांनीं एकमेकींना कठोर प्रहार केले. एकमेकींच्या अंगांतून रक्त काढलें. आणि अशा रीतीनें आपल्या भांडणाचा अगदीं कळस केला.

त्या घरीं गेल्या; पण तिथेंच थांबल्या नाहींत. त्यांनीं राजाच्या न्यायासनाकडे धाव घेतली. दोघीहि आपलें समर्थन आणि दुसरीवर आक्षेप करूं लागल्या. ही म्हणे, 'तिला शिक्षा द्या' ती म्हणे, 'हिला शिक्षा द्या.'

त्या दोघींत खरी कोण आणि खोटी कोण, आगळीक कोणीं केली, भांडणाचें मूळ कारण काय, हें राजाला यथातथ्य कळेना. तो म्हणाला.

"या प्रकरणाला कोणी साक्षी आहे का?"

दोघींनींहि सांगितलें. 'होय, आहे. एक ब्राह्मण नदीकांठीं जप करीत बसला होता, त्यानं हें सर्व कांहीं ऐकलं आहे अन् पाहिलं आहे.'

काश्मिरनरेशानें मग त्या ब्राह्मणाला बोलावण्यासाठीं राजदूत पाठवले. श्रीहर्ष सरकारी आज्ञेनें आणि कोणाच्याहि वशिल्याशिवाय राजापुढें येऊन पोंचला. राजानें त्याच्याकडे एकवार पाहिलें. राजाला तो पुरुष कांहीं निराळाच वाटला. त्यानें नांव गांव विचारून त्याला म्हटलें.

"या दोन बायकांच्या भांडणाला तुम्ही साक्षी आहांत काय?"

"होय." श्रीहर्ष म्हणाला.

"मग आम्हांला सांगा, कीं या दोन बायकांपैकीं कोण कोणाला काय काय बोललं?"

"महाराज, दुर्दैवाची गोष्ट ही आहे, कीं मीं ऐकलं असूनहि कोण काय बोललं, हें मला सांगतां येणार नाहीं. मी परप्रांतांतला माणूस आहें. काश्मीरी भाषा मला कळत नाहीं."

"मग मोठी आपत्तिच आहे म्हणायची."

"आपत्ति तर खरीच; पण मी एक गोष्ट करूं शकेन. या दोघी बायका काय बोलल्या, हें जरी मला कळलं नसलं, तरी त्यांनीं कोणता शब्द कोणत्या ध्वनीनं उच्चारला हें मी सांगूं शकेन."

"तेवढं सांगितलंत तरी पुरे आहे." राजा म्हणाला.

आणि मग श्रीहर्षानें त्यांचें तें भांडण जसेंच्या तसें अथपासून इतिपर्यंत

घडाघड म्हणून दाखवलें. त्यावरून मग राजानें निवाडाहि दिला. तें प्रकरण निकालांत निघालें; पण त्याच वेळीं श्रीहर्षाच्या असामान्य धारणशक्तीनें काश्मीरचा राजा अगदीं भारून गेला. त्याची खात्री झाली कीं, हा पुरुष अलौकिक आहे. त्यानें मग श्रीहर्षाची बारकाईनें चौकशी केली. त्यांत त्याला कळलें, कीं श्रीहर्ष हा महाकवि आहे. त्याचें काव्य श्रीसरस्वतीनें शिरीं झेललें आहे. त्याचा सर्व वृत्तांत ऐकून घेतल्यावर राजानें दरबारांतल्या पंडितांना दोष देऊन म्हटलें.

" एवढा महाकवि, एवढा महापंडित आपल्या राज्यांत आला, तुम्हांला भेटला, पण तुम्हीं त्याची जरासुद्धा वास्तपुस्त केली नाहीं, ही केवढी लांछनास्पद गोष्ट! काय म्हणावं तुमच्या या असहिष्णु वृत्तीला! एक मोठा कलावंत माझ्या राज्यांत गेले चार महिने आदराला तर सोडाच; पण अन्नोदकालाहि महाग होऊन वणवण भटकला, याचं मला परम दुःख होतं. आणि याला जबाबदार तुम्ही. "

मग काश्मीरनरेशानं श्रीहर्षाची क्षमा मागितली आणि त्याला आपल्या राजवाड्यांत ठेवून घेतलें. त्याचें काव्य आणि त्यावरचें विवरण ऐकून तो मोहित झाला. त्यानें त्याचा खूप मोठा सत्कार केला. त्या सत्कारप्रसंगीं लाजेकाजेस्तव का होईना; तिथल्या पंडितांना श्रीहर्षाचीं स्तुतिस्तोत्रें गावीं लागलीं. श्रीहर्षानें कृतज्ञापूर्वक राजाचे आभार मानले. तिथल्या पंडितांनाहि आपल्या प्रगल्भ वाणीनें गौरविलें. मग पंडितांनीहि त्याला आपापल्या घरीं नेऊन त्याचा यथोचित आदरसत्कार केला. कांहीं काळ तो तिथल्या विद्वानांचा आणि कवींचा मुकुटमणि बनला. त्याच काश्मीरांतले ते दिवस परम भाग्याचे ठरले.

अशा रीतिनें धन आणि मान दोन्ही संपादून श्रीहर्ष काशीक्षेत्रीं परत आला. त्यानें जयचंद राजाची भेट घेतली. राजानें त्याच्या सत्काराचा मोठा समारंभ केला. त्याला 'कलासर्वज्ञ' अशी पदवी बहाल केली. आपल्या दरबारी पंडितांत त्याला मानाचें स्थान देऊन त्याचा राजाश्रय कायम

केला. आतां त्याला कसलीहि वाण नव्हती. वचनपूर्ति झाली होती. महाकाव्य हातून निर्माण झालें होतें. साक्षात् सरस्वतीनें त्याचा गौरव केला होता. त्याला जीवनाची कृतकृत्यता लाभली होती. उरलेलें आयुष्य सुखासमाधानानें राजदरबारांत आणि विद्यादानांत घालवणें एवढेंच आतां त्याच्या वांट्याला उरलें होतें.

पण —

पण एक विपरीत घटना घडली आणि श्रीहर्षाला याहून अगदीं वेगळें जीवन जगण्याची पाळी आली.

जयचंद्राची एक राणी मोठी विदुषी म्हणून प्रसिद्ध होती. तिला लोक 'कलाभारती' या उपाधीनें गौरवीत. तिला काव्यशास्त्रांतलें कांहीं तरी कळत होतें. आणि जें कळत होतें तें तिला उदंड वाटत होतें. ती आपल्या विद्येच्या गर्वानें खूपच फुगली होती. तिचा हा ताठरपणा दरबारांतल्या अनेक पंडितांनाहि बोंचत होता. त्यांना कित्येकदा तिला उत्तर देण्याचें सामर्थ्य असूनहि निरुत्तर व्हावें लागत होतें. 'कशाला या घमेंडी बाईचा राग ओढवून घ्या!' अशा वृत्तीनें केवळ आत्मसंरक्षणासाठीं ते मूग गिळून स्वस्थ बसत होते. काश्मीरहून आल्यावर श्रीहर्षाचा काशींत जो मोठा बोलबाला झाला, तो या मत्सरी स्त्रीला सहन झाला नाहीं. तिला वाटलें, कीं याचाहि आपण पाडाव करायला हवा.

असा दुष्ट हेतु मनांत धरून तिनें एक दिवस श्रीहर्षाला आपल्या महालांत बोलावलें. प्रथम त्याचा गौरव केला. ती खूप मिठास बोलली. मग सहज म्हणून तिनें श्रीहर्षाला प्रश्न केला.

"कविराज, आपली पदवी काय?"

तिची पठाडी गोम त्याला कळली नाहीं. तो म्हणाला.

"मला 'कलासर्वज्ञ' अशी उपाधि आहे."

"छान! म्हणजे आपण सकलकलांचे मर्मज्ञ आहांत तर!"

" हो. महाराणीच्या कृपेनें आहें थोडाबहुत. "

" मग तुम्ही माझीं पादत्राणं माझ्या पायांत चढवूं शकाल. तीहि एक कलाच आहे, नाहीं का? हं, हा माझा पाय, अन् हें पादत्राण—"



श्रीहर्ष राणीच्या पायांत जोडा चढवतो

तिच्या या कुटिल आणि उन्मत्त शब्दांनीं श्रीहर्षाच्या मनाला सहस्र विंचू डसले. इतर कोणी पुरुष असता, तर त्याच पादत्राणानें त्यानें त्याचा मुखभंग केला असता. पण ही पडली स्त्री. तशांत राजाची राणी. पादत्राण तिच्या पायांत चढवावें, तर त्यापरता दुसरा अपमान नव्हता. स्वतःच्या हातानें स्वतःच्या प्रतिष्ठेवर धोंडा पाडणें हाच त्याचा सरळ अन् स्पष्ट अर्थ होता. पादत्राण तिच्या पायांत न चढवावें, तर त्याच्या कलासर्वज्ञतेला बाध येत होता. तिनें त्याला लगेच डिवचलें असतें. 'मग तुम्ही कसले सर्वज्ञ? तुम्हांला कलासर्वज्ञ ही पदवी फुकटच दिली म्हणायची...'

श्रीहर्षानें तिचें तें रंगीत नखरेदार पादत्राण मुकाट्यानें उचललें आणि राणीच्या पायांत हलक्या हातानें चढवलें.

" झालं समाधान ? " तो विषण्ण स्वरांत म्हणाला. राणी नुसती ओठांतल्या ओठांत हसली.

श्रीहर्ष तिथून बाहेर पडला, तो सरळ घरीं आला. त्याचें वैराग्य एकदम प्रबळ झालें. त्याला सगळ्याचा वीटच आला. त्यानें या जगाच्या कुटिल व्यवहारापासून सात योजनें दूर रहायचें ठरवलें. नको हा भव-जंजाळ, नको त्या प्रशंसा, नको ते हेवेदावे असें त्याला वाटलें. त्यानें लागलीच संन्यास घेतला. तो खऱ्या अर्थानें संन्यासी म्हणजे सर्वसंग-परित्यागी बनला. पुनश्च तो राजवाड्याची पायरी चढला नाहीं. त्यानें गंगातीरावर आपली मठी उभारली आणि आपलें उर्वरित आयुष्य अत्यंत शांत, विरक्त मनानें आत्मसाधनांत सार्थकीं लावलें.



# तिरुवल्लुवर

मद्रास आणि त्याच्या आवतींभोवतींचा प्रदेश ह्याला तमिळनाड म्हणतात. या भागांत तमिळ भाषा चालते. ही भाषा फार प्राचीन आहे. हिचें साहित्यहि समृद्ध आहे. या प्रदेशांत अठराशें वर्षांपूर्वी तिरुवल्लुवर हा प्रतिभावान् नीतिशास्त्रज्ञ होऊन गेला. त्यानें 'कुरळ' नांवाच्या छंदांत एक ग्रंथ रचला, त्याचें नांव 'तिरुकुरळ' असें आहे. ह्या ग्रंथाला आजहि त्या भागांत फार मोठा मान आहे. त्याला 'तमिळ वेद' असंच म्हणतात. धर्म, अर्थ आणि काम असे याचे तीन विभाग आहेत. एकूण कविता १३३० एवढी आहे. अध्याय १३३ आहेत. या ग्रंथांत मानवी स्वभावाचें खोल संशोधन आहे. यांतलीं वचनें सर्व देशांत आणि सर्व कालीं लागू पडणारीं आहेत. जगांतल्या अनेक भाषांतून याचे अनुवाद झाले आहेत. मराठींत श्री. साने गुरुजींनीं याचें भाषांतर केलें आहे. अशा या महान् ग्रंथाच्या कर्त्याचें जीवनचरित्र पुढें दिलें आहे—

* * *

मद्रास हें भारतांतलें एक प्रमुख शहर आहे. तिथले लोक तमिळ भाषा बोलतात. तामिळ भाषा ही भारतांतली एक प्राचीन तशीच समृद्ध भाषा आहे. दोन हजार वर्षांचा तिचा इतिहास आपल्याला सांपडतो. मद्रास ज्या भागांत आहे त्याच भागांत प्राचीन कालीं चोल राजांची राजधानी होती. हें नगर मोठें वैभवशाली होतें. तिथून समुद्रमार्गें पर-देशांशींहि व्यापार चालत असे. तिथल्या पेठा समृद्ध होत्या. बाजार गजबजलेले होते. तिथें लाखांच्या घडामोडी होत होत्या. लोक उद्योगी होते, म्हणूनच सुखीहि होते.

असाच एक दिवस बाजार भरला होता. हजारों माणसें खरेदी-विक्रीचे

व्यवहार करण्यासाठीं त्या ठिकाणीं जमा झालीं होतीं. त्यांतच कांहीं हौशी जवानहि उगीच टिवल्याबावल्या करीत गर्दींतून हिंडत होते. त्यांत तिथल्या एलेक्का नांवाच्या एका श्रीमंत व्यापाऱ्याचा तरुण मुलगा होता. बापानें दिवसभर व्यापारधंद्यांत जीव आटवायचा आणि पोरानें नगरभर उनाडक्या करीत हिंडायचें, अशी त्या बापलेकांची स्थिति होती. श्रीमंत बापाचा मुलगा असल्यामुळें त्याच्या भोंवतीं समान वयाच्या तरुणांचें नेहमीं एक टोळकेंच असायचें. त्यांनीं नगरांत हवें तिथें हिंडावें आणि आपले पराक्रम गाजवावे. आपल्यामुळें कोणाचें नुकसान होतें का, आपल्यामुळें कोणाला त्रास होतो का, याची त्यांना मुळींच फिकीर नसे.

आतांहि बाजारांतून हिंडतां हिंडतां ते कडेच्या जरा विरळ भागांत आले. तिथें एक मध्यम वयाचा माणूस बसला होता. त्याचे कपडे साधेच पण स्वच्छ होते. शेलाटी अंगकाठी अन् सावळी सुरत. मुद्रेवर प्रसन्न सात्त्विकता. दोहीं डोळयांत दयार्द्र भाव. जगाच्या जंजाळांत रहात असूनहि जणूं जगापासून अलिप्त. त्याच्यासमोर दोन लुगड्यांच्या घड्या एकाला एक लावून ठेवलेल्या होत्या. तो विणकर होता आणि आपण विणलेलें तें नाजूक सुंदर सणंग त्यानें बाजारांत विक्रीसाठीं आणलें होतें. उनाडत फिरणाऱ्या त्या सावकारपुत्राची नजर सहज त्याच्याकडे गेली. तो आपल्या सवंगड्यांना म्हणाला.

"तो पहा एक विणकर दोनच लुगडीं घेऊन विकायला बसला आहे."

त्यावर त्याचा एक मित्र म्हणाला. 'त्याला नुसता विणकर म्हणूं नको. नगरांतले आणि आसपासच्या खेड्यांतले सगळे लोक त्याला संत म्हणतात.'

"असं ? कसलं संतपण आहे याच्या अंगीं ?"

"तो कधींहि कोणावर रागावत नाहीं. नेहमींच मृदु बोलतो, मधुर बोलतो. आगळीक करणाऱ्यावरहि प्रेम करतो."

" माणूस आणि रागावत नाहीं ? हें कसं पटावं ? चला आपण प्रचीतिच बघूं. "

सगळे मिळून त्याच्याकडे गेले. विणकराच्या तोंडून मधासारखे गोड शब्द उमटले. ' या, मुलांनो, देव तुमचं भलं करो ! काय पाहिजे तुम्हांला ? '

" मला हें लुगडं पाहिजे. काय किंमत याची ? " सावकारपुत्रानें ऐटींत विचारलें.

" दोन रौप्यमुद्रा. " विणकर म्हणाला.

सावकारपुत्र लगेच पुढें झाला. त्यानें लुगडें हातांत उचललें. फस्सादिशीं उलगडलें. त्याची घडी विसकटून टाकली. मग निम्म्या घडीवर धरून तें टर्रदिशी फाडलें. त्याचीं दोन अर्धुकें केलीं. आणि विणकऱ्याला म्हटलें.

" मला अर्धंच पाहिजे. काय किंमत याची ? "

" एक रौप्यमुद्रा. " विणकर शांतपणें बोलला.


सावकारपुत्रानें त्या अर्ध्या लुगड्याचे आणखी दोन तुकडे केले आणि त्यांतला एक हातांत धरून विचारलें. ' याची किंमत ? '

" अर्धी रौप्यमुद्रा. " विणकर तितक्याच शांतपणें म्हणाला.

त्याच्या या शांतवृत्तीनें सावकारपुत्र जिद्दीस पेटला. विणकरानें खूप संतापावें, शिव्या द्याव्या, मारायला धावावें, नुकसानभरपाई मागावी आणि मग आपण त्याच्या आगींत तेल ओतावें, असा सावकारपुत्राचा मनोदय होता. तो त्याला असामान्य कोटींतून सामान्य कोटींत आणूं पहात होता.

पण विणकराच्या मुद्रेवरची शांति रतिमात्र ढळली नाहीं. संतापणें सोडाच ; पण कपाळावर एक लहानशी आठीसुद्धा चढली नाहीं. तो जितका शांत होता, तितकाच प्रसन्न होता. तो जणूं त्या पंचविशींतल्या उसळत्या रक्ताचें कौतुक पहात होता. पण सावकारपुत्रानें तरी तेवढ्यावरच थांबावें

कीं नाहीं? पण नाहीं. त्यानें त्या लुगड्याच्या फाडून फाडून धांदोट्या केल्या.



सावकारपुत्र सणंगाच्या चिंध्या करतो

" बघ, आतां या लुगड्याच्या चिरफाळ्या झाल्या. आतां माझ्या हें काय कामाचं ? "

" तुझं म्हणणं खरं आहे बेटा. आतां हे तुकडे तुझ्या कामीं येणार नाहींत. कोणाच्याच कामीं येणार नाहींत. " विणकरानें अगदीं हसत हसत उत्तर दिलें. जणूं लहान मुलानें एखादें खेळणेंच मोडावें अन् कनवाळू बापानें त्याच्याकडे कौतुकानें पहावें, तशा वृत्तीनें तो त्या नाठाळ सावकारपुत्राकडे पहात होता.

शेवटीं तो सावकारपुत्रच लाजला. आपण केलेलें नुकसान भरून द्यावें या हेतूनें त्यानें त्याची पुरी किंमत म्हणून दोन रौप्यमुद्रा त्याच्यापुढें केल्या. त्याला नाण्यांची खिसगणती नव्हती. किती तरी सोन्याचीं, रुप्याचीं नाणीं त्याच्या कशांत खुळखुळत होतीं. पण विणकराला तरी कुठें त्याची पर्वा होती ! तो म्हणाला.

" किंमत देण्याची जरुरी नाहीं. मी हे तुकडे कोणत्या तरी प्रकारें जोडीन आणि हें सणंग उपयोगांत आणीन. तुला मात्र तें शक्य नाहीं. वस्तु जर तुझ्या कामीं येत नसेल, तर तिचे दाम मी कसे घेऊं ? "

ठाणें.
अनुक्रम २७८३५ दि
८८३ नोंद दि

"अरे बाबा, माझ्याकडे खूप नाणीं आहेत. दोन गेलीं काय अन् राहिलीं काय; मला त्याची पर्वा नाहीं. कांहीं झालं तरी मी तुझं सणंग खराब केलं आहे. मला त्याचं नुकसान भरून दिलंच पाहिजे."

आतां मात्र विणकराच्या शब्दांत कारुण्य निर्माण झालं. तो कळकळीनें म्हणाला.

"ही नुकसानी तूं भरून देऊं शकणार नाहींस बेटा! तुला असं का वाटतं, कीं दोन रौप्यमुद्रांनीं ही नुकसानी भरून निघेल? थोडं निराळ्या दृष्टीनं या गोष्टीकडे पहा. शेंकडों शेतकरी शेतांत राबले, तेव्हां त्यांच्या श्रमांतून कापूस फुलला. त्या कापसाचं माझ्या बायकोनं मान मोडून सूत कातलं. तें सूत मीं रंगवलं. मग मागावर ताणलं. आणि कांहीं दिवसांच्या परिश्रमानें हें सणंग तयार केलं. हें लुगडं एखादी स्त्री नेसली असती, तर या सर्व लोकांचे श्रम सफल झाले असते. वस्तु उपयोगांत आली असती. तूं तर तिचे फाडून तुकडे केलेस. त्यामुळें इतक्या सगळ्या लोकांची मेहनत वायां गेली. हें नुकसान फार मोठं आहे. चांदीच्या दोन तुकड्यांनीं तें भरून निघणार नाहीं."

विणकराच्या स्वरांतलें हें कारुण्य सावकारपुत्राला जाणवलें. तो रागावून बोलत नव्हता; तर बापानें मुलाला समजावून सांगावें, तसा बोलत होता. त्या बोलण्याचा त्या युवकावर खूप परिणाम झाला. ते शब्द वरवरचे नव्हते. त्यांत खोल अर्थ भरलेला होता. व्यवहारी जग नेहमीं बोलतें त्यापेक्षां अगदीं वेगळ्या भाषेंत तो बोलत होता. ती भाषा माणसाची नव्हती. ती कृपाळू परमेश्वराची भाषा होती. त्या भाषेनें सावकारपुत्राच्या डोळ्यांत पाणी आणलें. त्याचा दर्प कुठल्या कुठें विरून गेला. त्यानें सरळ पुढें होऊन विणकराचे पाय धरले आणि त्याची क्षमा मागितली. विणकरानें त्याला उठवलें आणि हृदयाशीं कवटाळलें. त्याच्या मस्तकावर हलक्या हातानें थोपटीत तो म्हणाला.

"बेटा, मीं जर त्या दोन चांदीच्या तुकड्यांचा लोभ धरला असता,

तर या लुगड्याची जी दशा झाली, तीच तुझ्या जीवनाची झाली असती. तुझं हें उभारीचं जीवन, तुझं हें गोड अंतःकरण, या लुगड्यासारखंच चिंध्या होऊन फुकट गेलं असतं. यापुढें तूं अशी चूक करणार नाहींस, कुठलीहि वस्तु सोन्या-रुप्याच्या नाण्यानें तोलणार नाहींस, याची मला आतां खात्री झाली आहे. अरे लुगड्याचं काय घेऊन बसलास! एक लुगडं खराब झालं, तर त्याच्या ऐवजीं दुसरं घेतां येतं, विणतां येतं. पण जीवनच खराब झालं, तर तें कुठून आणशील? "

" खरं आहे महाराज! अगदीं खरं आहे! तुम्हीं आज मला एक नवाच प्रकाश दाखवलात. मला अधिक बोलवत नाहीं. मी जातों आतां."

सावकारपुत्र तिथून सरळ घरीं आला. त्यानें आपल्या बापाला म्हणजे एलेक्काला हा सर्व वृत्तांत सांगितला. त्याला आश्चर्यच वाटलें. आपला मुलगा कांहीं उद्योग करीत नाहीं, व्यापारधंद्यांत लक्ष घालीत नाहीं, तो केवळ उनाडक्या करीत हिंडतो, या गोष्टीचें बापाला अतिशयच दुःख होत होतें. तो अनेकदा त्याच्यावर रागें भरला होता. अनेकदा त्यानें त्याला प्रेमानें समजावण्याचाहि प्रयत्न केला होता. पण तें सगळें व्यर्थ ठरलें होतें. मुलगा दिवसेंदिवस बिघडतो आहे आणि आपण त्याला कशाहि प्रकारें ताळयावर आणूं शकत नाहीं, ही चिंता त्याला अहोरात्र जाळीत होती.

पण आज एका अज्ञात विणकऱ्यानें तो चमत्कार करून दाखविला होता. मुलानें आपण होऊन 'यापुढें सन्मार्गानें वागेन' अशी त्याला कबुली दिली होती. त्यामुळें एलेक्काचा आनंद पोटांत मावेना. त्याला वाटलें, कीं त्या विणकराची एकदा भेट घेऊन आपली कृतज्ञता व्यक्त केलीच पाहिजे. त्यानें मुलाला विचारलें. 'तूं माझ्याबरोबर येतोस का?' मुलानें 'हो' म्हटलें. बापलेक दोघेहि त्याला भेटायला निघाले. बाजारांत येऊन पहातात, तों पूर्वींच्या जागीं तो नव्हता. सावकार निराश झाला त्यानें आजूबाजूच्या दुकानदारांना त्याचें नांवगांव विचारलें. कोणींतरी त्याला सांगितलें कीं, त्याचें नांव 'वल्लुवर' आहे.

"तो राहतो कुठें हें ठाऊक आहे?"

"रहात असेल महारवाड्यांत." दुसरा एक जण म्हणाला.

"महारवाड्यांत?"

"तर मग दुसरीकडे कुठें राहील! त्याची आई महार होती आणि बाप ब्राह्मण होता. आईचं नांव 'आदि' आणि बापाचं नांव 'भगवान.' आईला पोरकेपणीं एका ब्राह्मणानेंच बाळगली होती. ती ब्राह्मणासारखंच बोले, वागे. भगवान ब्राह्मणाला ती आवडली. त्यानें तिच्याशीं लग्न केलं. त्या दांपत्याला एकंदर सहा मुलं झालीं. त्यांतला हा एक वल्लुवर. हा म्हणे पूर्वी एका राजाच्या दरबारांत अधिकारी होता. पुढें त्या कामाचा कंटाळा येऊन त्यानं अधिकारपद सोडलं आणि तो आतां या गांवांत येऊन राहिला आहे. विणकाम करतो आणि आपलं पोट भरतो. अगदीं संत आहे संत. कधीं कोणावर रागवत नाहीं. नेहमीं हसतमुख. सदा आपल्या उद्योगांत मग्न. पोटापुरतंच द्रव्य मिळवतो. अधिकाची हांव धरीत नाहीं. त्याच्या लेखीं कोणी बडा नाहीं कीं कोणी छोटा नाहीं. सारे समान. सगळींच ईश्वराचीं लेकरं. तो खूप शिकला आहे. अनेक भाषा बोलतो. एखाद्या वेळीं सहजपणें असा कांहीं विचार बोलून जातो, कीं माणसानं एक प्रहर त्याच्यावर चिंतन करावं. एका अस्पृश्य स्त्रीच्या पोटीं असं संतान निपजावं, हें खरंच मोठं आश्चर्य आहे......"

वल्लुवरविषयीं एवढें सर्व ऐकल्यावर एलेलाच्या मनांतला त्याच्याविषयींचा आदरभाव दुगुणा चौगुणा झाला. वल्लुवरला केव्हां एकदा जाऊन भेटेन, असें त्याला झालें. पण एवढ्या खटाटोपांत दिवस संपला. रात्रीच्या अंधारांत आणि त्यांतून महारवाड्यांत वल्लुवरचा पत्ता शोधून काढणं कठीण आहे, असें वाटून एलेला घरीं परतला. दुसऱ्या दिवशीं उजाडतांच त्यानें त्या कामगिरीवर जायचें ठरवलें. सकाळीं उठतो, तर त्याचा मुलगा न्हाऊन धुवून कपडे करून तयार. जो मुलगा रोज प्रहर दिवस झाला तरी अंथरुणांत लोळत पडायचा, ज्याला धोरावून उठवावें

लागायचें, तो आज इतक्या सकाळीं कोणीं न सांगतां उठून तयार होतो, म्हणजे केवढी आश्चर्याची गोष्ट होती! वल्लुवरच्या शब्दांचें सामर्थ्य त्यावरून त्याला कळलें. त्यानें मुलाचें कौतुक केलें आणि त्याला घेऊन तो बाहेर पडला.

ती सकाळची वेळ मोठी प्रसन्न होती. सूर्य नुकताच उमाठ्यावर येत होता. पूर्व दिशा गुलाबी साडी लेऊन सूर्याचें स्वागत करीत होती. रस्त्याच्या कडेच्या गवतावर आणि घरांच्या छपरांवर दंव पडलें होतें. थंडी अजून गेली नव्हती. वारा कुंपणांतलीं आणि बागेंतलीं फुलें उमलवीत झुळझुळत होता. सृष्टींतला हा उल्हास एलेक्काच्या मनांतहि संचरला होता. बापलेक दोघेहि देवदर्शनाला जावें, तितक्या भक्तिभावानें वल्लुवरच्या वस्तीकडे निघाले होते.

नांव विचारीत विचारीत ते गेले आणि एका साध्यासुध्या घरापुढें उभे राहिले. घराचें दार उघडें होतें, त्यांतून आंत शिरले. वल्लुवर पाठमोरा बसला होता आणि मागावर सणंग विणीत होता. खटक् खटक् असा त्याचा धोटा लयींत चालला होता. त्याच्या बायकोचें नांव 'वासुकी' असें होतें. ती वल्लुवरच्या मागाजवळच चरख्यावर सूत कातीत बसली होती. कोणीं बोलत नव्हतें, चालत नव्हतें. दोघांचीहि आपापल्या व्यवसायांत लय लागली होती. दोन माणसें दारांतून आंत येऊन आपल्या-जवळ उभीं राहिलीं आहेत, याचा त्या दोघांनाहि पत्ता नव्हता. पण एलेक्कानेंहि त्यांना आपल्या आगमनाची जाणीव दिली नाहीं. तोहि त्यांची तंद्री बघतच राहिला. उद्योगांत निमग्न असतांना झालेलें वल्लुवरचें दर्शन त्याला मोठें प्रिय वाटलें, अपूप वाटलें. त्या दांपत्याची ती उद्योग-समाधि मोडावी, हें त्याला बरें वाटेना.

एवढ्यांत वल्लुवरच्या ताण्यांतला एक धागा तुटला. त्यासरशी त्याचा धोट्याचा हात थांबला. त्यानें डोकें वर उचलून मागें वळवलें.

पहातो तों कुणी तरी मातबर पाहुणा आणि त्याच्याबरोबर कालचा तो अवखळ उन्द्धट मुलगा.

"यावं यावं महाराज." असें म्हणत वल्लुवर मागावरून खालीं उतरून प्रसन्न मनानें पुढें झाला. एवढ्यांत वासुकीहि उठली. तिनें चटकन् उठून चटई आंथरली. वल्लुवरनें पुढें जाऊन आधीं त्या मुलाची पाठ थोपटली.

"काय बेटा, इतक्या सकाळीं कसा काय आलास? आणि हे कोण तुझ्याबरोबर? तुझे वडील काय?"

सावकारपुत्रानें मानेनेंच होकार दिला. बापलेक दोघेहि चटईवर बसले. एलेक्का आणि वल्लुवर यांच्या गोष्टी सुरू झाल्या. दोघांनींहि थोडक्यांत आपली जानपछान करून दिली. वासुकी घरांत गेली होती ती एवढ्यांत बाहेर आली. तिनें कांहीं फळें आणि दोन ताकाचे पेले आणून पाहुण्यांच्या पुढें ठेवले. वल्लुवर एलेक्काला म्हणाला.

"महाराज, आपल्या एकंदर चालण्याबोलण्यावरून आपण मोठे श्रीमंत दिसतां. पण गरिबाच्या घरचा हा अल्पसा पाहुणचार आपण प्रेमानं स्वीकारावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे."

"कशाला एवढी तसदी घेतलीत?" एलेक्कानें म्हटलें.

"तसदी कसली त्यांत? गृहस्थाश्रम आहे ना? आल्या अतिथीचा असेल त्यांत परामर्श करणं हें गृहस्थाचं पहिलं कर्तव्य आहे."

वल्लुवरच्या स्निग्ध आणि नम्र भाषणानें एलेक्काला खूप समाधान झालें. तो आदरानें बोलूं लागला.

"महाराज! माझ्यावर आपले फार उपकार आहेत आणि त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं मी आज मुद्दाम आलों आहें. हा माझा मुलगा घरांत कोणाचंहि ऐकत नव्हता. वाह्यातपणा करीत मन मानेल तसं वागायचं अशा मार्गानं स्वारी चालली होती. माझ्या घरांत संपत्तीला तोटा नाहीं. पण गृहस्थाची पुत्र हीच खरी संपत्ति असते, नाहीं का?

तिच्याच पाखाळीं कीड लागली होती. पण ही कीड एका क्षणांत तुम्हीं काढून टाकलीत. त्याच्या विचारांचा आणि जीवनाचा ओघच बदललात. हें तुमच्या शब्दांचं सामर्थ्य ! तेव्हां प्रथम तुमचे आभार मानतों आणि पुढें अशी विनंती करतों, कीं या माझ्या मुलाला तुम्हीं व्यवहाराचं आणि नीतीचं योग्य तें शिक्षण द्यावं. मी त्याला रोज तुमच्याकडे पाठवीत जाईन."

"मीं आनंदानं त्याला शिकवीन. ज्ञान ही अशी एक वस्तु आहे कीं, जी दिल्यानें घटत नाहीं; तर उलट वाढतेच. ज्ञान ही अशी संपत्ति आहे कीं, तिच्यापुढें जगांतली सारी भौतिक संपदा ओवाळून टाकावी. तसं म्हटलं तर मी काय त्याला ज्ञान देणार ! मन हें नदीच्या वाळवंटासारखं असतं. त्यांत पाणी असतं; पण तें खोदल्यावांचून मिळत नाहीं. मात्र तें ज्याचं त्यानं खोदायला हवं. तुमचा मुलगा तसा प्रयत्न करील तर तो खात्रीनं ज्ञानी होईल..."

त्या दिवसापासून एलेक्काचा मुलगा वल्लुवरचा शिष्य झाला. पित्यापेक्षांहि त्याचें गुरूवर अधिक प्रेम जडलें. त्यालाच कशाला, खुद्द एलेक्कालासुद्धा वल्लुवरच्या सहवासाची गोडी लागली. एवढा मोठा मातबर माणूस. नगरांतला एक नांवाजता व्यापारी. उंच हवेलींत राहणारा. पण तोहि वेळ मिळेल तेव्हां वल्लुवरच्या मोडक्या तोडक्या घरीं येऊन तासन्‌तास बसूं लागला. तो आला कीं वल्लुवर विविध विषयांवर त्याच्याशीं बोले. जीवनाविषयीं मूलभूत विचार सांगे. कधीं उघड तर कधीं गूढार्थानें शब्द उच्चारी. आणि मग एलेक्का तासन् तास त्यावर विचार करीत राही. त्याचा सल्ला मोठा मार्मिक असे. एक दिवस एलेक्कानें त्याला विचारलें.

"महाराज, माझ्याजवळ सोन्याचा सांठा बराच जमला आहे. मी त्याचं काय करूं ?"

"समुद्रांत वाहवून टाक." क्षणाचाहि विलंब न लावतां वल्लुवरनें उत्तर केलें.

एलेका आश्चर्यचकित झाला. त्याला वाटलें, कीं याला काय सल्ला म्हणायचें ! सोन्याचा संग्रह करायचा तो काय समुद्रांत वाहवण्यासाठीं? अन्य किती तरी मार्गांनीं त्याचा सदुपयोग होऊं शकेल कीं...पण वल्लुवरचे निश्चित शब्द कोणते बरं ? ' समुद्रांत वाहवून टाक. ' सोनं समुद्रांत वाहूं शकेल ? छे: ! तें बुडून तळाशीं जाईल...आणि त्याला वाटलें, कीं त्या शब्दांचा अर्थ कांहीं तरी वेगळा असावा. विचार करतां करतां त्याला तो उलगडला. सोनें समुद्रांत वाहवायचें म्हणजे नवीं जहाजें बांधून समुद्रमार्गें आपला व्यापार वाढवायचा. होय, हाच अर्थ आहे त्याचा. ... आणि एलेका लगेच त्या उद्योगाला लागला. थोड्याच महिन्यांत त्याचा व्यापार खूप वाढला. निरनिराळ्या देशांतून धनदौलत चालत येऊन त्याच्या खजिन्यांत पडली. वल्लुवरचा सल्ला फळाला आला.

पुढें कांहीं दिवसांनीं त्या नगरींत मोठा दुष्काळ पडला. पाऊस कुठें बेपत्ता झाला. शेतें सुकलीं. जलाशय आटले. खेड्यापाड्यांतून हजारों लोक 'भूक भूक' असा आक्रोश करीत नगरांत येऊन भरले. तीं आबाल-वृद्धांचीं करुण आक्रंदनें वल्लुवरला ऐकवत ना. त्याचें कोवळें काळीज शतधा विदीर्ण झालें. त्या बिचाऱ्याजवळ लोकांना द्यायला कांहीं नव्हतें. जनतेची ही विराट भूक शमवायला तो असमर्थ होता. पण त्याचा मित्र कुबेरासारखा श्रीमंत होता. त्याच्यापाशीं धान्यसांठाहि विपुल होता. त्यानें एलेकाला न कचरतां सांगितलें.

" तुझं भांडार खोल. तुझ्याजवळ जेवढी म्हणून संपत्ति असेल, तिचं धान्य खरेदी कर आणि मुक्त हस्तानं ह्या कंगाल जनतेला वांट. जनता-जनार्दनाचा आशीर्वाद घे. "

एलेका जरा कचरला. त्याला एकदम होय म्हणवेना. तो भीत भीत बोलला.

" मीं माझी सारी जिंदगी अशा रीतीनं लुटवली, तर उद्या माझं काय ?"

वल्लुवरनें त्यावर निश्चयपूर्वक उत्तर दिलें.

"मेघ पृथ्वीवर जलाची वृष्टि करतो आणि तसं करतांना स्वतःसाठीं एक थेंबहि शिल्लक ठेवीत नाहीं. पण तरीहि मेघाचं कांहीं नुकसान होत नाहीं. अनंत अपार सागर पुन्हा आपल्या जलानं त्याला भरून टाकतो आणि होता तसा श्रीमंत करतो. तूंहि तसाच मेघ हो. तुला पश्चात्ताप करावा लागणार नाहीं."

एलेक्कानें त्याच्यावर विश्वास ठेवला आणि त्यानें आपली सारी संपत्ति भुकेकंगालांसाठीं वेचून टाकली. विश्वजित यज्ञ करणाऱ्या रघुराजाप्रमाणें तो सर्वस्वीं रिता झाला. पण त्यामुळें त्याची कीर्ति देशांत सर्वत्र पसरली. ज्याच्या त्याच्या मुखीं एलेक्का झाला. लोक त्याला देव समजूं लागले. पुढें कांहीं कालानें उदंड पाऊस पडला. तापून तापून सकस झालेली धरणी किती तरी पटींनीं फलद्रूप झाली. शेताशेतांतून अमाप धान्य पिकलें. एलेक्काचीं कोठारें पुनश्च होतीं तशीं भरलीं. त्याशिवाय जनतेनें एका हातानें घेतलेलें अनंत हस्तांनीं त्याला परत केलें. आणि मग एलेक्काला पटलें, कीं वल्लुवरचा सल्ला अत्यंत योग्य होता. आतां तर तो वल्लुवरचा भक्तच बनला.

त्याचा मुलगाहि वल्लुवरच्या तालमींत खराखुरा माणूस बनूं लागला होता. वल्लुवर त्याला शिकवी; पण तें पोथीच्या आधारें नव्हे. तो म्हणे, 'घोकंपट्टी करण्यापेक्षां खूप ऐकत जा. ऐकलेल्याचं मनन कर. प्रत्येक गोष्टीच्या आणि घटनेच्या मुळाशीं जाण्याचा प्रयत्न कर.' आणि मग सावकारपुत्र मनापासून तसा प्रयत्न करी. तो आतां एकटाच त्याच्याकडे जात नव्हता, तर त्याचे अनेक मित्रहि त्याच्याबरोबर वल्लुवरचा सहवास करीत होते. वल्लुवर सर्वांनाच शिकवीत होता.

एलेक्का पुष्कळदा वल्लुवरशीं खेळीमेळीनें वागे. आपल्या अनेक शंका त्याला मोकळ्या मनानें विचारी. त्यानें एक दिवस वल्लुवरला विचारलें. 'श्रीमंतांच्या हवेलींत न आढळणारं सुख–समाधान तुमच्या घरांत खेळतं, हें कसं काय?'

त्यावर वल्लुवरनें आपली पत्नी वासुकी हिच्याकडे बोट दाखवून म्हटलें. "याला कारण ही माझी पत्नी. ही किती गुणी आहे म्हणून सांगूं! तिनें एक गोष्ट ठरवली आहे. नवऱ्यानं सांगायचं अन् आपण ऐकायचं. मीं तिची अनेकदा परीक्षा घेतली आहे. एक उदाहरण सांगतों. एकदा मीं विचार केला, कीं हिची जरा गंमत करावी. मी मागावर विणीत बसलों




वल्लुवर पत्नीला दिवा आणायला सांगतो

होतों. तिला म्हटलं. 'अग, दिवा लावून आण. माझा धागा तुटला आहे नि तो मला सांधायचा आहे.' भर दिवसा मागावर चक्क सूर्यप्रकाश पडला असतांना आपला नवरा दिवा लावून मागतो, म्हणजे याला वेडबिड लागलं कीं काय; असा विचार तिच्या मनांत खरं म्हणजे यायचा. पण तो आला नाहीं. ती उठली अन् सरळ दिवा घेऊन आली. याचा अर्थ ती मूर्ख आहे असा नव्हे; तर तिनं माझ्या आत्म्याशीं आपला आत्मा जोडून टाकला

आहे. माझ्यावेगळं तिनं आपलं अस्तित्वच ठेवलं नाहीं. आणि म्हणूनच मीहि तिची खूप काळजी वाहतों. तिचा योग्य तो आदर करतों. मी माझं सर्वस्व तिला केव्हांच अर्पण करून बसलों आहें. आमच्या घरांत सुख-शांतीला वाण नाहीं ती यामुळें."

या निमित्तानें मग गृहस्थधर्म, पतिपत्नींचे संबंध, सांसारिक सुख इत्यादि किती तरी गोष्टींविषयीं वल्लुवरनें सुंदर विवेचन केलें. वल्लुवर म्हणजे विचारांचा जिवंत झराच होता. त्याचे विचार एकांगी नव्हते. ते विश्वाच्या समस्त जीवनाला व्यापून उरले होते. ते त्रिकालाबाधित होते. त्यांचें हें महत्त्व जाणून एक दिवस एलेक्कानें वल्लुवरला एक विनंती केली.

"महाराज, आपल्या पवित्र आणि समर्थ वाणीनें माझा मुलगा सुधारला. पण जगांत असे किती तरी लोक आहेत, कीं जे अंधारांत चाचपडत आहेत आणि गोते खात आहेत. त्यांना कोण सन्मार्ग दाखवील? आपण दयाळू आहां. तरी तुमचे हे जीवनविषयक विचार तुम्ही ग्रंथरूपानें लिहून काढा आणि अनंत अज्ञानी जीवांसाठीं त्यांचा ज्ञानदीप पाजळून ठेवा."

वल्लुवर थोडा वेळ स्तब्ध राहून नंतर म्हणाला.

"देवाच्या दयेनं मीं जीवनाचे कित्येक पैलू पाहिले आहेत. पुष्कळसं वाचलं आहे, ऐकलं आहे. लहानमोठ्या सर्वांकडून कांहीं ना कांहीं ज्ञान-कण गोळा केले आहेत. जगाकडून मिळवलं तें सजवून नटवून जगाला परत देणं हा माझा धर्मच ठरेल. तुमचा आग्रह ही मी भगवंताची प्रेरणाच समजतों."

आणि त्याच दिवसापासून वल्लुवरनें ग्रंथलेखनाला प्रारंभ केला. तो ग्रंथ काव्यमय होता. एकेका कवितेंत तो आपले अनुभविक सिद्धांत संस्कारयुक्त वाणीनें मांडूं लागला. धर्म, अर्थ आणि काम या तीन पुरुषार्थांवर त्यानें खरा भर दिला. मोक्ष या चौथ्या पुरुषार्थाविषयीं त्यानें कांहीं लिहिलें नाहीं. एलेक्कानें त्याबद्दल विचारलें, तेव्हां तो म्हणाला. "मोक्षा-

विषयीं मला कांहीं ठाऊक नाहीं. मला फक्त धर्माविषयीं थोडं कळतं. माझा विश्वास आहे, कीं मनुष्य जर दृढनिष्ठेनें स्वधर्म आचरील, तर त्याला मोक्ष आपोआप मिळून जाईल. धर्मसिंहासनावर दृढ असलेल्या माणसानें मोक्षाची काळजी करण्याचं कारण नाहीं. ”

दीड ओळीची एक कविता, दहा कवितांचा एक गुच्छ, अशा रीतीनें त्यानें आपल्या विचारांची व्यवस्थित मांडणी केली. प्रत्येक शब्द मापलेला, तोललेला. जागजागीं मनोहर अन् समर्पक दृष्टांत. विश्वाचें मंथन करून वर आलेल्या विचारांचीं तीं सूत्रबद्ध वाक्यें होतीं. शब्दांच्या फाफटपसाऱ्यापेक्षां थोड्या शब्दांत अर्थ ठाशीव भरण्याकडे त्याचें अधिक लक्ष होतें. एकशेंतेहतीस अध्याय झाले आणि त्यानें आपला ग्रंथ समाप्त केला. मग ती पोथी एलेक्काच्यापुढें ठेवून म्हटलें. ‘ हा घे ग्रंथ. मथियलें सार नवनीत. ’

एलेक्का एकेक अध्याय वाचूं लागला. वाचतां वाचतां त्याची समाधि लागली. त्याला वाटलें, कीं केवढें हें ज्ञानभांडार ! हें आजवर एकाच्याच हृदयांत होतें तें आतां जगाला उपलब्ध झालें. एलेक्का समाधान पावला खरा; पण केवळ स्वतःच्या समाधानावर त्याची तृप्ति नव्हती. त्या ग्रंथाला विद्वन्मान्यता मिळावी, त्याचा सर्वत्र प्रसार व्हावा, अशी त्याची अपेक्षा होती. त्या काळीं मदुरा नगरींत पांड्य राजांच्या आश्रयानें एक विद्वत्सभा स्थापित झाली होती. मोठमोठे शास्त्री, पंडित, कवी आणि तत्त्वज्ञानी त्या सभेचे सदस्य होते. तमिळ भाषेंत एखाद्यानें ग्रंथरचना केली, कीं तो आपला ग्रंथ त्या सभेपुढें आणून ठेवी. मग सगळे एकत्र जमून त्याचें वाचन करीत, त्यावर चर्चा करीत आणि ग्रंथ त्यांच्या परीक्षेंत उतरल्यास त्यावर सभेच्या मान्यतेची मुद्रा करीत. वल्लुवरचा ग्रंथ त्या सभेपुढें जावा, तिथें त्याला मान्यता मिळावी आणि सर्वप्रथम पंडितांच्या तोंडून त्याची प्रशंसा व्हावी, अशी एलेक्कानें इच्छा धरली आणि पुन्हा एकवार वल्लुवरला प्रार्थना केली.

" महाराज, आपण निरिच्छ आणि निःस्पृह आहां, हें मी जाणतों. पण तरीहि तुम्हीं हा ग्रंथ घेऊन मदुरेला विद्वत्सभेपुढें जावं असं मला वाटतं. त्यांत फार मोठं हित होणार आहे. तुमचं नव्हे; तर जनतेचं. तिथल्या विद्वानांनीं एकदा या ग्रंथाची भलावण केली, कीं मग जनता आदरानं आणि निःशंक मनानं त्याचा स्वीकार करील. तुमचा ग्रंथलेखनाचा हेतु सफळ होईल. माझी एवढी विनंती ऐकाच. "

वल्लुवरनें त्याची तीहि विनंती मानली. तो आपला ग्रंथ घेऊन मदुरेला गेला आणि सभेपुढें उपस्थित झाला. विद्वत्सभा बसली होती. भिन्नभिन्न संप्रदायांचे आणि भिन्नभिन्न रुचीचे कवी आणि पंडित त्या सभेंत बसले होते. सगळेच तमिळ भाषेचे मर्मज्ञ आणि जाणकार होते. त्यांची संख्या एकूणपन्नास होती. पन्नासावें आसन सर्वांपेक्षां जास्त उंच होतें— सुशोभित होतें; पण रिकामें होतें. तें सरस्वतीसाठीं मांडलेलें होतें. सरस्वती अव्यक्तरूपानें त्यावर बसून सभेवर देखरेख ठेवते, अशी त्या विद्वत्सभेची धारणा होती. वल्लुवरनें जेव्हां आपला ग्रंथ नम्रतापूर्वक सभेपुढें ठेवला, तेव्हां सभाप्रमुखानें त्याला विचारलें.

" कोणत्या विषयावर तुम्हीं ग्रंथ लिहिला आहे ? "

" जीवनावर. " वल्लुवरनें म्हटलें.

" जीवनाच्या कोणत्या अंगावर ? "

" जीवनाच्या सर्व अंगांवर. " जीवनाचा एकांगी विचार करतांच येत नाहीं. "


" तर मग तुमचा ग्रंथ म्हणजे समग्र जीवनाचं शास्त्र, असं तुम्ही मानतां का ? "

" होय. माझी दृष्टि जिथवर पोंचली, तिथवर मीं मानवी जीवनाचा या ग्रंथांत सर्वांगीण विचार केला आहे. "

वल्लुवरच्या या विधानानें त्या भरल्या सभेवर विविध प्रतिक्रिया झाल्या. कोणी आश्चर्यचकित झाले. कोणी अविश्वासानें कुजबुजले. कोणी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम वि ........
क्रमांक ........................ नों: दि: ..............

उपहासानें हसले. कोणी मुग्ध राहिले. पण कांहीं झालें तरी त्यांना पुढें आलेल्या ग्रंथाचा परामर्श घेणेंच भाग होतें. 'ग्रंथाची परीक्षा करायची काय?' असा सभाप्रमुखानें प्रश्न टाकला. सर्वांनीं 'होय' असें उत्तर दिलें. ग्रंथांत ज्ञान आढळलें नाहीं, तरी ग्रंथकाराच्या अज्ञानानें थोडीशी करमणूक तरी करून घेतां येईल, असा त्यांनीं विचार केला. खरं म्हणजे हा फाटका माणूस हें फार मोठें धाडस करतो आहे, असेंच त्यांना वाटलें.



मदुरेंतली विद्वत्सभा

सभाप्रमुखानें त्याची पोथी पुढें घेतली. तिच्यांत प्रथमारंभीं ईश्वराचें स्तवन होतें. त्यांतली एक कविता सहजपणें त्यानें वाचली. तिचा अर्थ असा होता —

"ज्ञानस्वरूप परमात्म्याची तूं पूजा करणार नसशील, तर तुझ्या त्या ज्ञानाचा उपयोग काय?"

सभा म्हणाली, 'अस्सं.' पण तिनें मान डोलवली नाहीं. पुढें निघालें सदाचाराचें प्रकरण. त्यांत पुढील पंक्ती होत्या.

" सदाचारानें जो आनंद मिळतो, तोच आनंद खरा. बाकीचे आनंद आणि सुखें शेवटीं रडवतात आणि फजीत करतात."

कोणी तरी नकळत उद्गारलें, 'वाहवा !' त्याच्यापुढें निघालें क्षमेचें प्रकरण. त्यांत पुढील पंक्ति होती —

" सूडाचा आनंद एक दिवस टिकतो. क्षमा करणाऱ्याचें यश चिरंजीव होतें."

त्यापुढें निघालें प्रेमप्रकरण. त्यांत पुढील पंक्ती झळकत होत्या—

" प्रेमाचे दरवाजे बंद करणारा अडसर कुठें आहे? प्रेमाची कळा नसलेलें हृदय म्हणजे वाळवंटांतलें सुकलेलें खोड. अशा माणसाला भाग्य मिळायचें नाहीं. प्रेम म्हणजे जीवनाचें जीवन. ज्याच्याजवळ प्रेम नाहीं, तो अस्थिचर्मांचा केवळ सांगाडा."

आतां मात्र साऱ्या सभेनें कान टवकारले. सभाप्रमुख जेव्हां इथला एक घास, तिथला एक घास असें करूं लागला, तेव्हां पंडित म्हणाले.

" असं नका करूं. साद्यंत प्रकरण वाचा."

सभाप्रमुखानें मग समग्र प्रकरण वाचलें. सभेनें जिज्ञासा दाखविली म्हणून आणखी एक वाचलें. तेवढ्यानेंहि तृप्ति होईना, म्हणून वाचन पुढें सुरू केलें. सभा रंगली, तल्लीन झाली. एकेका वाक्यानें त्यांच्या अंतःकरणाचा एकेक कप्पा उघडूं लागला. वल्लुवरच्या ग्रंथानें त्या पंडितांना जणूं कुठल्या तरी उच्च लोकांतल्या दिव्य उद्यानांत नेऊन सोडलें. त्या सभेंत वल्लुवरच्या समग्र ग्रंथाचें अधाशासारखें वाचन आणि श्रवण झालें.

ग्रंथ वाचून संपला; पण त्यावर चर्चा करायला कोणाचें तोंडच उघडेना. ते अवाक् झाले, स्तिमित झाले. वल्लुवरच्या फाटक्या देहांत वास्तव्य करणारा आत्मा किती शुद्ध, किती पवित्र, किती प्रेमळ आणि किती प्रकाशमय आहे, याची त्यांना कल्पना आली. त्याचें हृदय म्हणजे मानवजातीच्या प्रेमानें काठोकाठ भरलेलें मानस सरोवर आहे, असें त्यांना वाटलें. साऱ्या पंडितांनीं मग त्याला अभिवादन केलें. त्याला उठवून

आपल्या मध्यभागीं बसवलें. कोणी म्हणाले, कीं हा ग्रंथ म्हणजे तमिळ भाषेचा वेद आहे. कुणी म्हणाले, वामनानें तीन पावलांत त्रिभुवन व्यापावें त्याप्रमाणें वल्लुवरनें या छोट्याशा ग्रंथांत साऱ्या जीवनाची लांबी, रुंदी आणि खोली मापली आहे. सर्वांनीं एकमतानें मान्य केलें, कीं 'तमिळ भाषेंत आजवर असें ग्रंथरत्न निर्माण झालें नाहीं.' त्यानंतर वल्लुवरचा त्या सभेंत जो कांहीं सत्कार झाला त्याचें वर्णन कसें करावें!

वल्लुवरनें ज्या छंदांत ग्रंथ लिहिला होता, त्याचें तमिळ भाषेंतलें नांव 'कुरळ' असें होतें. पंडितांनीं 'कुरळा'च्या मागें 'तिरु' ही पूज्यतादर्शक उपाधि लावली आणि 'हा ग्रंथ म्हणजे तिरुकुरळ आहे,' अशी मुक्तकंठानें घोषणा केली. त्याबरोबरच वल्लुवरलाहि 'तिरु' ही श्रेष्ठतादर्शक पदवी जोडली. आधीं विद्वत्सभा, मग मदुरेंतले लोक आणि त्यानंतर सारी तमिळनाडमधली जनता त्या महाभागाला 'तिरुवल्लुवर' म्हणून गौरवूं लागली. त्या ग्रंथाचें यश दिवसेंदिवस वाढतच गेलें. मदुरेंतले पंडित तिरुवल्लुवरला मदुरेंतच राहून सरस्वतीची सेवा करण्याबद्दल विनवूं लागले. पण तो म्हणाला.

"मी कोणी कवि किंवा पंडित नाहीं. मी एक सामान्य माणूस आहें. मला जें अनुभवानें आणि चिंतनानें थोडंबहुत जीवनाचं आकलन झालं, तें मीं या ग्रंथांत छंदोबद्ध केलं एवढंच. यापुढें मला कसलीहि कविता रचायची नाहीं. आपण सर्वांनीं माझ्या ग्रंथाचं कौतुक केलंत, याबद्दल मी सर्वांचा कृतज्ञ आहें."

REFBK-0009478

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २१८३५ वि: ५/५/८२
क्रमांक ८७३ नों: दि: २२/५/५८